शांततेचे नोबेल पारितोषिक विजेती

# मलाला

बाबा भांड



''एक मूल, एक शिक्षक, एक पुस्तक आणि एक पेन हे जग बदलेल.''
- मलाला

साकेत प्रकाशन

शांततेचे नोबेल पारितोषिक विजेती

# मलाला



शांततेचे नोबेल पारितोषिक विजेती

# मलाला

**बाबा भांड**

साकेत प्रकाशन

मलाला
चरित्र
बाबा भांड
□
प्रकाशन क्रमांक - 1682
□
प्रकाशक
साकेत बाबा भांड,
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
115, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - 431 005,
फोन- (0240)2332692/95.
www.saketpublication.com
info@saketpublication.com
•
पुणे कार्यालय
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
ऑफिस नं. 02, 'ए' विंग, पहिला मजला,
धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, 373 शनिवार पेठ,
कन्या शाळेसमोर, कागद गल्ली, पुणे -411 030
फोन- (020) 24436692

बालशिक्षणाचं स्वप्न पाहणारी मलाला
आणि तिच्या जगभरातील मित्र-मैत्रिणींना सलाम...

## लेखक बाबा भांड : अल्पपरिचय

जन्म वडजी, पैठणजवळील खेड्यात, २८ जुलै १९४९. बालपणापासून कमवा व शिका हा संस्कार. शिक्षण एम. ए. इंग्रजी. आठवीत बालवीर चळवळीत राष्ट्रपतीपदकाने सन्मानित. दहावीत जागतिक स्काउट-गाइड मेळाव्याच्या निमित्तानं अमेरिका-कॅनडा आदी दहा देशांचा प्रवास. लेखकच व्हायचं स्वप्न होतं. सहावीपासून लेखनास सुरुवात. १९७५ साली पत्नी सौ. आशाच्या मदतीनं धारा व नंतर साकेत प्रकाशनाची सुरुवात. आतापर्यंत अठराशे पुस्तकांचे प्रकाशन.

बाबा भांड यांच्या आतापर्यंत नऊ कादंबऱ्या, दोन कथासंग्रह, चार प्रवासवर्णनं, चार ललित गद्य, चार आरोग्य व योग, नऊ संपादनं, चार अनुवाद, पंधरा किशोर कादंबऱ्या, एकोणावीस बालकथा संग्रह, तीन एकांकिका, सत्तावीस नवसाक्षरांची पुस्तके प्रकाशित.

साहित्य अकादमीचा बालसाहित्य, महाराष्ट्र शासनाचे अकरा, महाराष्ट्र फाउंडेशन, दमाणी आणि इतर पंधरा पुरस्कार. त्यांच्या साहित्यावर पाच विद्यार्थ्यांची पीएच.डी., अभ्यासक्रमात पुस्तके व पाठ.

जन्मगावी पाणलोटक्षेत्र विकास, वाचनालय, गरीब अपंग-मूकबधिर मुलांसाठी निवासी शाळा, योगसाधना संस्थेत विश्वस्त, समाजोपयोगी कामात सहभाग. प्रकाशनाच्या कमाईतून वरील कामासाठी पंचवीस लाखांहून अधिक मदत. लेखन-प्रकाशनासोबत शेती, प्रवास आणि फोटोग्राफीचा छंद. महत्त्वाचं जग फिरून झालंय.

# शांततेची दूत मलाला!

गेल्या तीन चार वर्षांपासून पाकिस्तानच्या स्वात प्रांतातील मलालाचं नाव ऐकू येऊ लागलं. मुलींच्या शिक्षणासाठी तिनं शांततेच्या मार्गानं आवाज उठविण्यास सुरुवात केली. तालिबान्यांनी हुकूम काढला, मुलींना शाळेत पाठवायचं नाही आणि ही मलाला हिमतीनं सांगत होती, ''दहशतवाद्यांचं हे कृत्य आपल्या पवित्र कुराणाच्या शिकवणीविरुद्ध आहे. वृत्तपत्रं, इंटरनेटवर मोठ्या कौतुकानं मी तिच्याबद्दल वाचत होतो. मला तिच्याबद्दल अभिमान वाटू लागला. गेल्यावर्षी शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी तिचं नाव सुचविलं गेलं आणि मी तिच्यासंबंधीच्या वृत्तपत्रांतील बातम्या, लेख, इंटरनेटवरील माहिती संकलित केली. टिपणं काढू लागलो. त्यावेळी तिला नोबेल पुरस्कार मिळाला नव्हता; पण जगभरातील अनेक पुरस्कार मिळू लागले. यावर्षी पुन्हा तिचं नाव या पुरस्कारासाठी पुढं आलं आणि कैलास सत्यार्थीसोबत तिला शांततेचे नोबेल पारितोषिक जाहीर झाले. या बातमीनं मला दुहेरी आनंद झाला. बालकामगारांसाठी आयुष्यभर काम करणारे सत्यार्थी आणि आयुष्याची सुरुवात मुलींच्या शिक्षणासाठी करणारी सोळा वर्षांची मलाला ही खूप चांगली जोडी पुरस्कार समितीनं निवडली.

मलालाची गोष्ट लिहावी असं वाटू लागल्यानं तिच्यासंबंधीची जुनी फाइल मी बाहेर काढली. अलीकडे मलालाचं 'आय अॅम मलाला' हे पुस्तक आलं. ते आणि बाजारातील मराठी-हिंदी पुस्तकं वाचली. मलालाची वेबसाईट, फेसबुकवरून माहिती वाचली आणि प्रेरित होऊन झपाटल्यासारखी मलालाची ही गोष्ट लिहून काढली. आतापर्यंत मी लिहिलेल्या अनेक पुस्तकांत सर्वांत कमी वेळात हे एकटाकी लेखन करताना मला खूप आनंद मिळाला. पुस्तक लिहून झालं; पण 10 डिसेंबर, 2014ला मलालाला शांततेचं नोबेल पारितोषिक मिळणार होतं. त्या दिवशी ते स्वीकारल्यानंतर तिचं भाषण वाचण्याची माझी उत्सुकता होती. इंटरनेटवर दुपारनंतर शोधूनही पाहिलं. ओस्लो येथे कार्यक्रम होणार आहे आणि ओस्लोची वेळ आपल्यापेक्षा किती तास पुढे आहे हे देखील मला नक्की आठवेना. त्यामुळे सायंकाळीच सातच्या बातम्यासाठी टी.व्ही. सुरू केला. त्यावेळी मलालाचं भाषण सुरू होतं.

''मी एकटी नाही. मी म्हणजे अनेकजण आहोत. मी म्हणजे जगातील सगळया मुली आहेत ज्यांनी अजून शाळेचा उंबरा ओलांडला नाही. त्या शाळेबाहेरच आहेत. आज निम्मं जग उद्योगधंद्यांच्या प्रगतीनं आधुनिकतेची अन् प्रगतीची फळं चाखत आहे; पण निम्मं जग गरिबी, भूकबळी, अन्याय आणि जगण्याचा संघर्ष करत आहे. पहिल्या जागतिक युद्धास शंभर वर्षं होत आहेत; पण या युद्धाच्या विनाशाचा धडा आजही आम्ही शिकलो नाही.

आधुनिक काळात मानवानं चंद्रापर्यंत झेप घेतली आहे. मानवीशक्ती आणि तंत्रज्ञानापुढं आज काहीच अशक्य नाही. जगातील सगळया मुलांना चांगलं शिक्षण देण्याचं स्वप्न पूर्ण करण्याचा आपण सर्वांनी निर्धार केला पाहिजे. जगातील एकही मूल शाळेशिवाय राहणार नाही, बालकामगार म्हणून त्याचं शोषण होणार नाही, बालविवाहाचे शिकार बनणार नाही, युद्धात त्यांची आहुती पडणार नाही, मुलांना शिकविणे हा गुन्हा ठरणार नाही, या उज्ज्वल भविष्याची ज्योत आताच पेटवू या. मित्रांनो, आताचीच ही वेळ आहे.''

समस्त मानवकल्याणाची शांततेची ज्योत हाती घेऊन मलाला बोलत होती. तिच्या साध्या-सरळ, स्पष्ट शब्दांतून जगातील शाळा न शिकू शकणाऱ्या वंचितांसंबंधीची कणवच ओसंडून वाहत होती. मलालाचं बोलणं सुरू असताना तिच्या शब्दाशब्दांना सभागृहातून टाळयांनी प्रोत्साहन मिळत होतं. मलालाचे शब्द ऐकणाऱ्यांच्या मनाचा तळ गाठत होते आणि त्याच्या प्रतिक्रिया चेहऱ्यावर परिवर्तीत होत होत्या. त्यात होते मलालाचे आनंदाश्रू पुसणारे तिचे आई-बाबा, मैत्रिणी आणि सभागृहातील अनेकजण. हे सगळं बघून मलाही गलबलून आलं.

मलालानं बोलणं संपविलं आणि सारं सभागृह तिला सन्मान देण्यासाठी आदरानं उभं राहिलं. बराच वेळ टाळयांचा कडकडाट सुरू होता. शांत चेहऱ्यावरचं हसू आवरीत मलालानं सभागृहावर कृतज्ञतेची नजर फिरविली. छातीवर हात ठेवून नम्रपणे पुढं झुकून सर्वांबद्दल आदर आणि कृतज्ञता व्यक्त करून ती आपल्या आसनाकडं चालू लागली.

तिच्या शब्दांनी सगळं सभागृह मंत्रमुग्ध झालं. वंचितांच्या कल्याणाची शांततेची मशाल हाती घेऊन निघालेली ही आजच्या काळातली जोन ऑफ आर्च होती. तिची ही बहादुरी आणि मानवकल्याणाची कणव असलेली ही गोष्ट आपणास नक्कीच आवडेल.

- बाबा भांड

# मलाला - सावित्रीची एक लेक

"शिक्षणापासून वंचित असलेल्यांच्या हक्कासाठी मी उभी आहे. ज्यांना शिक्षण मिळत नाही त्यांचा आवाज जगापर्यंत पोहोचविण्यासाठी मी काम करते."

या भूतलावर राहणारे मनुष्य-प्राणी आणि वनस्पती हजारो वर्षं निसर्गचक्राच्या अलिखित नियमांनी बांधलेले आहेत. ऊन, पाऊस, थंडी हे चक्र निसर्गनियमांच्या चौकटीत अव्याहत सुरू आहे. निसर्गनियमांनी सृष्टीवरचं जीवन सुरू होतं. निसर्गाचा नियम मोडला की, तो शिक्षा करतो. यातून अवर्षण, अतिवृष्टी, भूकंप, प्रलय, त्सुनामी या संकटांच्या शिक्षा तो करत आलाय. निसर्गनियमांचं पालन करत येथील संतुलन माणसांनी राखावं असा नियमच आहे. काही वर्षं माणसांनी हे पाळलं. यानंतर मात्र सत्ता, संपत्तीच्या लोभानं आणि धर्माच्या नावाखाली माणसं निसर्गनियम मोडू लागली. स्वार्थानं सगळया क्षेत्रात घसरण सुरू झाली. मानवताधर्म आणि निसर्गधर्माच्या विरुद्ध हे घडू लागलं.

यावेळी निसर्ग सुरुवातीला थोडी प्रतिक्रिया देऊन धोक्याची घंटा वाजवून पाहतो; पण स्वार्थानं आत्मविश्वासाचा वारू लोभाच्या गतीनं दौडू लागला की, चांगल्या वाइटांच्या सीमारेषांची सरमिसळ होत जाते आणि शेवटी निसर्गनियम मोडल्याच्या कर्माचं फळ पदरात पडतं. निसर्गचक्रातील हे फळ कधी अवर्षण, दुष्काळ, कधी प्रलय, तर कधी भूस्खलनाच्या रूपानं प्रतिक्रिया देऊ लागतं. असह्य झालं की, धरणीमातेच्या आंतरिक कंपानं तो व्यक्त होतो. मग इथं कोणाचीही सुटका नाही.

कधी भौतिक स्वार्थानं, तर कधी सत्तेच्या मोहानं माणसं नातेसंबंधाचे बंध तोडून एकमेकांच्या जीवावर उठतात. यात धर्म, जात, वर्ण अशा भेदांचे रंग मिसळून माणुसकीचा प्रवाह बिघडवून टाकतात. हा संघर्ष वेगवेगळया नावांनी सुरूच असतो. याच्या मुळाशी स्वार्थाचा विषारी सर्प वेटोळे घालून बसलेला असतो. संधी मिळाली की, फणा उभारून तो आपलं रूप दाखवतो. हा आहे मानवीसमाजाचा हजारो वर्षांचा इतिहास.

असं असलं तरी, रात्रीच्या काळोखाला मायेच्या सहनशीलतेने पोटी बाळगून पहाटेचं स्वप्न पाहणारी एक आई वर्षानुवर्षे नवचैतन्याला जन्म देत आली आहेच ना!

जेव्हा जेव्हा समाजात मरगळ येते तेव्हा तेव्हा एक सावित्री जन्म घेत असते. कधी ती पुराणकथांतील सत्यवानसावित्रीच्या रूपाने असते, तर कधी ती वंचितांच्या मुलींना शिकविते म्हणून दगडधोंडे अन् शिव्याशाप निडरपणे अंगावर झेलणारी असते, तर कधी जंगल हे आकाशातल्या परमेश्वरानं आम्हाला जिवंत ठेवण्यासाठी निर्माण केलेली संजीवनी आहे. त्यातील झाडाझुडुपांवर माया करा नसता माणसाला निसर्गकोपाच्या संकटाला तोंड देतादेता उजाड व्हावं लागेल, असं सांगणारी आफ्रिकेच्या जंगलातील वंगारी मथाई जमिनीवर अवतरते.

पुराणातल्या सावित्रीनं पती-पत्नीच्या पवित्र आणि जबाबदारीच्या नात्याचं महत्त्व

आपणास सांगितलं. जातीपातीपलीकडे, निराधाराची सेवा हेच व्रत आहे, असं मदर तेरेसांनी कृतीनं दाखवून दिलं. निसर्गनियम मोडले तर आम्हाला शिक्षा होणारच! हा जगण्याचा निसर्ग नियमच वंगारी मथाईनं सांगितला. स्त्री म्हणजे संसाराच्या बैलगाडीचं एक चाक आहे. जीवनप्रवासातील खाचखळग्यातून प्रवास होण्यासाठी दोन्ही चाकं सारखी पाहिजेत. जीवनप्रवासासाठीचं हे चाक भक्कम व्हायचं असेल तर, मुलींना उत्तम शिक्षण द्यायला हवं.

या आहेत सावित्रीबाई फुले यांच्या मार्गाने जाणाऱ्या लेकी. आणखी एक सतरा वर्षांची सावित्री उभी राहिली आहे. मानवीकल्याणाचा वसा घेतलेली आजची मानवतेची परी आहे. या सावित्रीचं नाव आहे- मलाला! तिची ही कथा

सबंध मानवजातीला प्रेरणा देणारी आहे.



मलाल म्हणजे दु:ख.

माणसाच्या जगण्याची प्रेरणा आनंद आणि दु:ख या दोन टोकांनी सांधलेली असते. भगवान गौतम बुद्ध सांगून गेले, दु:खी माणसाच्या जीवनात एखादा आनंदाचा क्षण निर्माण करा, तुमचा आनंद दुप्पट होईल. हेच काम ही सावित्री- मलाला करत आहे.

शांततेची दूत असलेली मलाला मुलींच्या शिक्षणाची मशाल हाती घेऊन निर्भयपणे निघाली आहे. तिचा मंत्र आहे, "शस्त्रास्त्राने नव्हे, शिक्षणाने जगात शांतता नांदेल", मानवीकल्याणाचा ध्यास घेतलेली ही आजची आम्हा सर्वांची सावित्रीची लेकच झाली आहे.

आमच्या या पाकिस्तानच्या सावित्रीच्या लेकीला जेव्हा शांततेचे नोबेल पारितोषिक जाहीर झाले, जगातील सर्वांना इतका आनंद झाला की, त्यांना तो आपला पुरस्कार वाटू लागला. या सन्मानातील अर्धे वाटेकरी आमचे कैलास सत्यार्थी आहेत, ही तर दुधात साखर पडण्याइतकी गोड घटना घडली.

वायव्य पाकिस्तानातील स्वित्झर्लंड म्हणून ख्याती असलेल्या स्वात खोऱ्यातील ही कन्या आजच्या वर्तमानातील एक चमत्कार आहे. दोघांना मिळालेला शांततेचा नोबेल हा पुरस्कार भारत-पाक संबंधाच्या पुढील मैत्रीच्या वाटचालीचीही नांदी ठरणार आहे.

स्वात खोऱ्याचा इतिहास दोन हजार वर्षांहून अधिक आहे. येथे वसाहती केलेल्या मूळ रहिवाशांनी सुंदर रचना असलेली छोटी छोटी शहरं वसवली होती. जगज्जेता अलेक्झांडरने इ. स. पू. 327 च्या सुमारास या भागातून जात उदेग्राम आणि बारीकोट येथील लढाया जिंकल्या होत्या. या संदर्भात ग्रीक इतिहासकारांनी ओरा व बाजिया या शहरांचा उल्लेखही केलेला आहे. इ.स. पू. दुसऱ्या शतकात स्वात खोऱ्यात शांतता आणि प्रसन्नतेची बौद्ध राजवट सुरू झाली. पाच-सहा शतके बौद्ध संस्कृती इथं रुजली. त्या काळातील कौशल्यपूर्ण मूर्ती, वास्तुकलेचे उत्तम नमुने आजही भग्नावशेषातून दिसून येतात.

आठव्या शतकात गाबरी स्वातीपश्तून या जमातीनं आणि पुढे मुस्लिम राजवटीनं हिंदू आणि बौद्ध राजवटीचा पाडाव केला. यानंतर अनेक मुस्लिम घराण्यांची इथं सत्ता होती. अकराव्या शतकात महंमद गझनीनं हा भाग ताब्यात घेतला.
स्वात ही बुद्धांची पवित्रभूमी मानली जाई. बौद्ध धर्माचा आणि संस्कृतीचा प्रचार इथं होऊन अनेक वर्षं बुद्धांची दया आणि शांततेची शिकवण जगाला दिली गेली. यामुळे जगभरातील बौद्ध धर्मीयांसाठी स्वात हे पवित्र यात्रेचं स्थळ झालं होतं. एकेकाळी या भागात 1400हून अधिक बौद्धस्तुप होते. सहा हजारांहून अधिक सुवर्णवर्खाने मढवलेल्या बुद्ध देवता अनेक बौद्ध मंदिरात होत्या. पुरातत्व विभागानं 160 चौ. कि. मी. भागात चारशेहून अधिक बौद्ध मंदिरांची ठिकाणं शोधून काढली आहेत. महंमद गझनीच्या काळात बौद्ध संस्कृतीच्या लोकांना सक्तीने मुस्लिम करण्याचा प्रयत्न सुरू झाला.
स्वातमध्ये सत्तेसाठी एकोणिसाव्या शतकातही या भागातील सरदार, राजे यांच्या अनेक वर्षं लढाया सुरूच होत्या. छत्रपती शिवरायांच्या मृत्यूनंतर छत्रपतींच्या वारसदारांमध्येही भाऊबंदकी सुरू झाली. सातारा विरुद्ध कोल्हापूरची कौटुंबिक लढाई जशी झाली, तोच प्रकार स्वातमधील मुस्लिम सरदारांतही सुरूच होता. अखुंद साहिब या राजानं मुस्लिम कायद्यानुसार या भागात शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. पुढं ब्रिटिशांनी एक-एक भाग ताब्यात घेणं सुरू केलं. त्यावेळेस हा मुलूखही ब्रिटिश आधिपत्याखाली आला. ब्रिटिश हिंदुस्थान सोडून गेल्यानंतर पुढे स्वात हा पाकिस्तानचा भाग बनला.



अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यामधल्या वायव्य सरहद्द प्रांतातील निसर्ग सुंदर स्वात जिल्ह्यामध्ये मिंगोरा मोठं शहर आहे. अतिशय दुर्गम आणि डोंगराळ भूभाग असलेल्या या ठिकाणी अनेक आदिम जमाती राहत होत्या, त्यातील युसुफझाई ही एक जमात. हातावर पोट असलेली ही माणसं वर्षानुवर्षं गरिबी, अन्याय आणि अत्याचार सहन करणारी आहे. इथला निसर्ग मात्र संपन्न आहे. पांढरेशुभ्र बर्फानं नटलेले डोंगरमाथे, त्यातून उड्या मारत खळाळणारे धबधबे, जागोजागी मोत्यासारखी चकाकणारी पाण्याची छोटी-मोठी तळी आणि निसर्गाचा विपुलतेने नटलेला खजिना इथली खरी संपत्ती होती. स्वातचं खोरं जणू भूतलावरील स्वर्गातील आनंदाची खाणच होती. या स्वात खोऱ्यास पूर्वी उद्यान म्हणजे मोठा बगीचा म्हटलं जाई. या भागातील रंगीबेरंगी जंगली फुलं, जंगलातील फळबागा, रत्नांच्या खाणी आणि पाण्याच्या खळाळणाऱ्या नद्या ही नैसर्गिक समृद्धी होती. सुफी संतांचा संगीताचा वारसा होता. आशियातील हे स्वित्झर्लंड होतं.
अशा स्वात जिल्ह्याच्या मिंगोरा शहरात झियाउद्दीन युसुफझाई नावाचे कवी राहत होते. तसं हे शहर लाख-दीडलाख वस्तीचं मोठं गावच होतं. निसर्गानं आजूबाजूला निसर्गसंपत्तीची उधळण केली असली तरी या खोऱ्यातील माणसांच्या वाट्याला सतत गरिबी, अत्याचार, अडचणींमुळे शेकडो वर्षं फरफटच वाट्याला आली होती. दोन वेळची

पोटाची आग भागविण्यासाठी इथल्या माणसांना करावे लागणारे कष्ट अन् धडपड ते बघत होते. त्यात आपल्याच माणसांनी निर्माण केलेल्या दहशतीची भर पडली. यामुळे स्त्रियांच्या सुरक्षिततेचा, त्यांच्या स्वातंत्र्याचा अन् अब्रुरक्षणाचाही प्रश्न निर्माण झाला. अशा या शहरात राहणारे झियाउद्दीन हे स्वप्नाळू कविकल्पनेत गुंतून न पडता, या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी मुलामुलींना शिकविणं हा एकच मार्ग आहे, असं स्वप्न पाहत होते. हाच मार्ग गरिबी अन् अन्यायातून सोडवणूक करणारा आहे, हे ओळखून त्यांनी शाळा काढण्याचा विचार केला. झियाउद्दीन यांनी 'खुशाल पब्लिक स्कूल' नावाची शाळा सुरू केली. त्यांच्या पत्नी तुर्पेकईंची त्यांना साथ मिळू लागली. त्या निरक्षर होत्या; पण पतीच्या कामात मदत करू लागल्या. भाड्याचं घर, शाळेची जागाही भाड्याची होती. शून्यातून सुरुवात केली. मुलं-मुली शाळेत यायला लागली. या दाम्पत्याला मुलगी झाली अन् त्यांच्या स्वप्नाला धुमारे फुटू लागले.

मलाला ही आमच्यासाठी भाग्यवान मुलगी आहे. तिच्या जन्मानंतर आमचं भाग्य बदललं, असं तिचे वडील झियाउद्दीन म्हणू लागताच घरातल्या सगळयांना आनंद झाला.

सर्वांत जास्त आनंद झाला तिच्या आईला. नऊ महिने अपत्यप्रेमानंच नव्हे, तर येऊ पाहणाऱ्या बालकाचं स्वप्न उदरात वाढविताना आईला जो आनंद मिळत असतो तो मुलगी की मुलगा या एका भेदानं विरून जातो. ही अवस्था तिच्या वाट्याला आली नाही, यामुळे ती आणखीनच सुखावली.

झियाउद्दीन यांचं एक स्वप्न होतं- मुलांना शिकविण्याचं. त्या स्वप्नाचा पाठपुरावा ते मागास स्वात व्हॅलीत शाळा काढून करत होते. जेव्हा हे काम त्यांनी सुरू केलं त्यावेळी शून्यातून सुरुवात केली. जेमतेम परिस्थिती असल्यानं पदोपदी आर्थिक गोष्टींना लगाम लावत ते मार्ग काढत होते. त्यांनी सुरू केलेल्या शाळेत वर्ग झाडणं, मुलांचं बाथरूम स्वच्छ करणं, शाळेच्या भिंतींना चुना मारणं, मुलांना शिकविणं, सहकाऱ्यांना मदतीला घेऊन प्राचार्य म्हणून जबाबदारी सांभाळत हिशोब ठेवण्याचंही काम एकहाती करत होते. या संसारखर्चाची तोंड मिळवणी म्हणून घरात सगळे बिन दुधाचा चहा चवीनं पीत असत. याचं कारण दूध विकत घेणं परवडत नव्हतं.

जगभरातील धर्मात, वेगवेगळया जाती-जमातीत आणि समाजात नवजात बालकाचा जन्म झाल्यानंतर काही दिवसांपर्यंत सांस्कृतिक विधी केले जातात. यास त्या विशिष्ट भागातील सांस्कृतिक संदर्भ असतात. स्वात खोऱ्यातील पश्तून समाजात बाळाच्या सातव्या दिवशी वोया विधी केली जाई. नातेसंबंधातील माणसं एकत्र जमत. नवबालकास आशीर्वाद देत. येणाऱ्या पाहुणे मंडळीस बोकड आणि भाताच्या बिर्याणीचं भोजन देण्याची पद्धत होती. मलालाच्या जन्मानंतर सातवीला कार्यक्रम करायचा म्हणून झियाउद्दीनसमोर खर्चाचा प्रश्न निर्माण झाला. मलालाच्या आजोबांनी मार्ग काढला. ते म्हणाले, "मुलगा जन्मला की बोकडाचं जेवण देणं हा रिवाज आहे. मुलगी जन्मली ही चांगली गोष्ट आहे; पण आता तो कार्यक्रम करायची गरज नाही." त्यांनी आप्तेष्टांना बोलावलं. प्रेमानं बिनदुधाचा चहा करून पाहुणचार केला. एवढेच नाही तर कवीमनाचे वडील अफगाण-ब्रिटिश युद्धातील गोष्ट सांगू लागले.

व्यापारासाठी एका हातात तराजू आणि दुसऱ्या हातात संरक्षणाचं शस्त्र हाती घेऊन

आलेली गोरी माणसं काळ्या पाण्याचा समुद्र ओलांडून पूर्व आणि पश्चिमेकडे हळूहळू पाय रोवत गेली. हिंदुस्थानातही समुद्रकिनारी व्यापाराच्या जशा वखारी उघडल्या तसाच विस्तार अफगाणमध्येही त्यांनी केला. ते व्यापारातून फोडा आणि तोडा या भेदनीतीचं शस्त्र वापरून छोटीमोठी राज्य गिळंकृत करू लागले. याकाळात मूळचे रहिवासी, सत्ताधारी राजे आणि जनतेनं संघर्ष केला. अफगाणिस्तानच्या कंदहार शहराजवळ मैवांद नावाचं एक शहर होतं. *1880* सालची ही गोष्ट. इंग्रज फौजांनी मैवांद शहरावर हल्ला केला. या परकीय आक्रमणाला अफगाणिस्तानातून जोरदार विरोध झाला. जुलै महिन्यातील सत्तावीस तारखेला लढाईचं तोंड फुटलं. कडवे अफगाणी शत्रू हल्ला परतून लावण्यासाठी पेटून उठले.

मैवांद गावात *19* वर्षांच्या एका धनगराच्या मुलीचं लग्न होतं. तिचं नाव मलालाई! लग्नाच्या दिवशी युद्ध सुरू झाल्याने मलालाईचे आई, बाबा यांनी मुलीच्या लग्नापेक्षा देशाचं रक्षण महत्त्वाचं समजून युद्धात उडी घेतली. लग्नासाठी आलेला नवरदेवही यात सामील झाला. त्या काळात युद्धात जखमी झालेल्या सैनिकांची देखभाल, औषधपाणी देण्याचं काम महिला करत. लग्नाच्या बोहल्यावर चढणाऱ्या मलालाईनं या कामात स्वत:ला झोकून दिलं.

मलालाई उत्तम गायक होती. ती उत्स्फूर्त गीतं तयार करायची. गोड आवाजातली तिची गाणी सैनिकांना शत्रू विरुद्ध लढण्याचं बळ देऊ लागली. ती आपल्या गाण्यातून राष्ट्रप्रेमाचा संदेश देऊ लागली. ती म्हणायची,

"देशाचं रक्षण करणं हे पवित्र काम आहे. तुम्ही त्याकरिता जिवाची बाजी लावा. तुमचा विजय ठरलेला आहे. तुम्ही जर मागे फिरलात तर मात्र मी तुम्हाला कधीच क्षमा करणार नाही."

या घनघोर युद्धात एक अफगाणी सैनिक गंभीर जखमी झाला. त्याच्या हातातलं निशाण जमिनीवर पडलं. ही बहादूर मलालाई चटकन पुढे आली. तो ध्वज उचलून खांद्यावर घेतला. मलालाईचा पराक्रम बघून सैन्याला स्फुरण चढलं. सैनिक शत्रुपक्षावर तुटून पडले. यामुळे इंग्रजी सैनिकांची पिछेहाट होऊ लागली. इंग्रजी सेनापतीने मलालाईला लक्ष्य करायचं ठरविलं. एक बहादूर मुलगी आपली कोंडी करत आहे, तिचा काटा काढला पाहिजे, हे बेरकी अधिकाऱ्यांनी ओळखलं. त्यांनी मलालाईला घेरलं. ही पराक्रमी कन्या शहीद झाली; पण तिच्या शब्दांनी सैन्यास हत्तीचं बळ आल. ब्रिटिश सैन्य जेरीस येऊन त्यांचा पराभव झाला. युद्ध संपलं.

अफगाणिस्तानच्या घराघरात मैवांदच्या मलालाईचं नाव घेतलं जाऊ लागलं. ती अमर शहीद झाली. इतिहासाच्या सोनेरी पानात या बहादूर लक्ष्मीचं नाव कथा, गोष्टी अन् गीतातून गायिलं जाऊ लागलं. अन्याय, अत्याचार आणि संघर्षात तिचं नाव घेतलं जाऊ लागलं. मलालाई शहीद झाली; पण तिच्या शौर्यानं शेकडो तरुणात प्रतिकाराची प्रेरणा निर्माण केली. यातून जग जिंकायला निघालेल्या ब्रिटिश सैनिकांचा पराभव झाला. अफगाणिस्तानमधील राजाला या धनगराच्या बहादूर कन्येचा अभिमान वाटू लागला. मैवांदमध्ये तिच्या पराक्रमाचं स्मारक उभारलं गेलं. पश्तून खोऱ्यातली ही वीरनायिका लहान-थोरांसाठी जणू देवता झाली. पश्चिमेकडच्या जोन ऑफ आर्चच्या कथेसारखी

अफगाणच्या मलालाईची कथा प्रसिद्ध झाली. तिच्या नावानं या भागात शाळा सुरू होऊ लागल्या. शाळेच्या अभ्यासक्रमातही तिच्या शौर्याची गोष्ट शिकविली जाऊ लागली. तिच्या गौरवाची गाणी-लोकगीतं लहान-मोठ्यांच्या तोंडी पसरली होती. या मलालाई शब्दाचा अर्थ होता दु:ख. गांजलेल्या पश्तुनीयांच्या दु:खानं तळमळणारी. मलालाई हा या भागातील प्रेरणा देणारा शब्द झाला होता.

मलालाईची गोष्ट सांगून झाल्यावर झियाउद्दीन म्हणाले, आता आपण सगळे मिळून त्या मलालाईचं एक गाणं म्हणू या!

अफगाण-ब्रिटिश युद्धातील बहाद्दूर मलालाईच्या शूरपणाचं गाणं त्यांनी मंडळींना ऐकवलं. ते म्हणाले,

''आमची ही जन्मलेली मुलगी मलालाच आहे. मलाला म्हणजे सर्वांत आनंदी.''

जन्माच्या सातव्या दिवशी बारशात बाळाचं नाव मलाला ठेवण्यात आलं. यावेळी जमलेली सगळी मंडळी मलालाईची गाणं म्हणत आपापल्या घराकडं परतू लागली. मलालाची आई आपल्या बाळाला मांडीवर घेऊन आजूबाजूला बघू लागली. तिच्या नजरेला गावाची राखण करणारी पश्चिमेकडची डोंगराची रांग दिसू लागली. वर्षातून अधिकांशवेळेस डोंगरमाथ्यावर बर्फाचा फेटा गुंडाळलेला असायचा. अंगावर काळीशार शेरवानी घातलेला धिप्पाड पहाड जणू गावाची पाठराखण करी. डोक्यावर निळं आकाशाचं मायेचं छत्र होतं. डोंगरपायथ्याशी जंगलाच्या हिरवाईचा दुपट्टा उठून दिसे. सकाळी सूर्य उगवला की, पूर्वेकडची सोनेरी किरणं काळया पहाडाच्या डोंगरमाथ्यावर पडली की, पांढऱ्या बर्फाचा रंग सोनेरी दिसू लागे. गोष्टीतली परी सोनेरी मुकुट डोक्यावर चढवून या निसर्गसंपन्न स्वात परिसरातून खळाळणारा नद्यांच्या प्रवाहासोबत आनंदानं फिरायची.

पत्नीशेजारी बसलेले झियाउद्दीन म्हणाले,

''स्वातमधील हे पांढरेशुभ्र डोंगर हे शांततेचं फडफडणारं निशाण आहे. या निसर्गदृश्यानं जणू आपल्या मलालाचं स्वागतच केलं आहे.''

आणि स्वप्नाळू झियाउद्दीनच्या डोळयासमोर आपलं दूरवरचं खेडं फिरू लागलं. ते बायकोला म्हणाले,

''आपलं खेडं, तिथली आपली माणसं, त्यांचं निसर्गाशी असलेलं अतूट नातं हा आपला समृद्ध वारसा आहे. आता आपण मिंगोरा या मोठ्या गावात आहोत; पण आपली पाळंमुळं ज्या गावामध्ये रुजलेली आहेत, ते नातंही आपल्याला सांभाळायचं आहे. त्या भागातील आणि इथल्या मुलांना शिक्षण देऊन ऋणातून थोडा मुक्त होण्याचा मार्ग आपण शाळेच्या माध्यमातून स्वीकारला आहे.''

पतीच्या कामाबद्दल, निष्ठेबद्दल, समाजाच्या शिक्षणाच्या तळमळीबद्दल तुर्पेकाईंना विश्वास होता. इतरांहून ही व्यक्ती अगदी वेगळी आहे, याचं मनस्वी समाधानही होतं. त्याच्या कामात अधिक मदत करण्यासाठी आपणही शिकले पाहिजे हा विचारही तिच्या मनात डोकावू लागला.

अशा ध्येयवेड्या कुटुंबात वडिलांचा आदर्श मानणारी मलाला घरात रांगू लागली, वाढू लागली. दोन खोल्यात सगळं एकत्र कुटुंब राहत होतं. आई स्वत: सरपण आणायची,

चुलीवर स्वयंपाक करायची. छोटी मलाला चालू लागताच वडिलांसोबत शाळेत जाऊ लागली. तीन-चार वर्षांची झाली नाही तोच पहिल्या वर्गात येऊन बसू लागली. त्या वर्गात तिच्याहून मोठ्या वयाच्या मुली असायच्या. आपल्या पाटीवर ती लेखणीनं रेषा काढू लागली. रेषांची चित्रं होऊ लागली. अक्षरांशी मैत्री सुरू झाली.

झियाउद्दीन मंगोरात राहत असले तरीही संधी मिळताच किंवा निमित्त असेल तेव्हा आपल्या कुटुंबासह आपल्या मूळ गावी खेड्यात जात. गावातील नातेमंडळीस भेटत. सगळे मलालाचं कौतुक करायचे. गावकऱ्यांचं कष्टमय जीवन, अडचणीचं जगणं, आहे त्यात समाधान मानणं हा जगण्याचा भाग होता. सकस मातीबद्दलची कृतज्ञता व निसर्गाबद्दलचा प्रेमाचा संस्कार होता. शाळेत जाऊ लागलेली मलाला सुट्टीत वडिलांसोबत गावी आली की, तिच्या वयाची, नात्यातली मुलं तिच्याकडं कौतुकानं बघायची. तिच्याशी बोलायला संकोच करायची. त्यांच्या अंगावरचे कपडे, त्यांचं ग्रामीण उच्चारांचं बोलणं ऐकताना तिला मजा वाटायची. तिची काकू तिला विचारायची, "तुला खायला काय आवडतं, बेटी मलाला? चिकण बिर्याणी बनवू का?" यावर चेहऱ्यावरचे भाव बदलत ती म्हणायची, "नको नको! चिकन बनवायला कोंबडी कापावी लागते. त्यामुळं बिचारीचा जीव जातो. कोणाचा जीव घेऊन बनवलेलं अन्न मला नाही आवडणार!" तिच्या या उत्तरावर तिची काकू, काका, चुलतभाऊ मनसोक्त हसत. वयाच्या मानाने जास्त समज आलेल्या मुलीचं सगळे कौतुक करत; झियाउद्दीन मात्र आपल्या लेकीच्या उत्तराने अल्लाला दुवा देत म्हणत,

"तुझी लेक आहे. तूच आता तिला सांभाळ!"

झियाउद्दीन शाळेच्या प्रगतीसाठी झपाटल्यासारखे काम करत होते. मुलांना शिकवून शहाणं करणं हाच गरिबी अन् अस्थिर परिस्थिती दूर करण्याचा मार्ग आहे, असं त्यांना मनापासून वाटत होतं. एका धर्माची माणसं स्वार्थ आणि हितसंबंधासाठी निरपराधांना वेठीस धरून दहशत निर्माण करीत आहेत, याबद्दलही ते अस्वस्थ होते. सर्वसामान्यांची फरफट ही मूळ अज्ञानामुळेच आहे. त्यातून सुटका होण्यासाठी शिक्षणाइतका समर्थ मार्ग दुसरा नाही, हे उमजल्याने ते या कामाकडे पाहत होते. किरायाच्या जागेत सुरू केलेल्या त्यांच्या शाळेस चांगला प्रतिसाद मिळू लागल्यानं त्यांचा उत्साहही वाढला होता.

2001 च्या सप्टेंबर महिन्यातील दुपारची वेळ. झियाउद्दीन शाळेत नेहमीचं काम करत होते. एकजण घाबरतच पळत आला आणि म्हणाला, "गावात दंगल सुरू झाली आहे. माणसांचा क्षोभ उसळला. न्यूयॉर्क शहरातील एका इमारतीवर दोन आत्मघाती विमानांनी हल्ला केलाय." या हल्ल्यामुळे जगभरात उलटसुलट प्रतिक्रिया सुरू झाल्या. मिंगोरा शहरातही माणसं रस्त्यावर उतरली. झियाउद्दीन यांनी शाळेतील मुलांना घरी पोहोचते करण्याची काळजी घेतली. चार वर्षांची मलाला बाबांना विचारीत होती; पण त्यांच्यासमोर प्रश्न निर्माण झाला. काय सांगावं या चिमुरडीला? विमानांनी इमारतीवर आत्मघाती हल्ला केला एवढं सांगितलं तरी तिचे अनेक प्रश्न उभे राहिले. कोण होते विमानात? त्यांनी का पाडली इमारत? इमारतीवर धडकलेले वैमानिकही यात मेले असतील ना? आणि शेवटी यातून काय मिळणार आहे?

मलालाचं विश्व म्हणजे दोन खोल्यांचं घर आणि तिची शाळा एवढच होतं. यामुळे तिच्या

प्रश्नांची उत्तरं कशी द्यावीत, हा झियाउद्दीन यांच्यासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला. तरीही ते शांतपणे तिला समजावू लागले, “बेटा भांडणं हा माणसाचा गुणधर्मच आहे. माणूस भांडण्यासाठी सतत नवनवीन कारणं शोधत असतो. अल्लानं जगात स्त्री आणि पुरुष या दोन जाती निर्माण केल्या. नंतर माणसांनी रंगानुसार काळे, गोरे भेद निर्माण केले. अल्लाही एकच आहे; पण यातही वेगवेगळे धर्म निघत गेले. मानवाचं कल्याण हेच धर्मांचं मूळ उद्दिष्ट असूनही माणूस अज्ञान आणि स्वार्थामुळं पुन्हा भांडू लागला. हा अनेक वर्षांचा इतिहास आहे. तो बदलण्यासाठीच आपण मुलांना शिकवण्यासाठी शाळा सुरू केल्या.

वडिलांचं सांगणं मलालाला किती समजलं असेल माहीत नाही; पण तिचं समाधान करण्याचा आपण प्रयत्न केला, असं त्यांना वाटलं. त्यांना वाटायचं, आपण मुलींना-मुलांना शिकवायचं काम करतो; पण अफगाण आणि पाकिस्तानातील महिलांचं जगणं हा जिवंतपणीचा तुरुंगवासच आहे. मलाला जन्मली त्यावर्षी अफगाणिस्तानमध्ये धर्मांध तरुणांचा एक गट सक्रिय झाला. ही तालिबानची सुरुवात होती. पुढं एका मुल्लानं नेतृत्व स्वीकारून आपली हुकूमशाहीच सुरू केली. या मुल्लाचं पहिलं काम म्हणजे त्याने मुलांच्या शाळा बंद करण्याचा आदेश काढला. जी मंडळी त्यांचं ऐकत नव्हती, त्या शाळा पेटवून देणं सुरू झालं. शेजारच्या देशातील या बातम्यांनी झियाउद्दीन यांना वाईट वाटले. एवढेच नाही तर हे दुष्ट विचाराचं लोण आपल्या स्वातच्या खोऱ्यात पसरणार तर नाही ना, ही भीतीही त्यांच्या मनात वाढू लागली. मुलांना घरात बसवा. शिकवू नका. पुरुषांनी दाढी वाढवली पाहिजे आणि महिलांनी बुरख्यातच राहिले पाहिजे हे मुल्लाचे हुकूम धर्माच्या नावाखाली निघू लागले आणि या जुलमी नियमांच्या अंमलबजावणीचं काम तालिबानी तरुणांवर सोपविलं गेलं. या बंधनात टप्प्याटप्प्यानं भर पडत गेली. महिलांनी मोठ्यानं हसायचं नाही. पांढऱ्या रंगाच्या चपला वापरायच्या नाहीत; कारण तो रंग पुरुषांच्या बुटांचा आहे. महिलांनी सौंदर्य प्रसाधनांचा वापर करायचा नाही. एखादीनं नखाला पॉलिश जरी लावली तर तिला घरात कोंडून मारहाण केली जाई. महिलांचं हे लाजिरवाणं जगणं झियाउद्दीन यांना आवडत नव्हतं.

यामुळे ते आपल्या पत्नीला घरात सगळ्या गोष्टींचं स्वातंत्र्य देत होते; पण तुर्पेकई या खानदानी मुस्लिम स्त्रीप्रमाणे आपल्या मर्यादा पाळून त्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळीत होत्या.



भाऊ खुशालसमवेत वाचताना मलाला

झियाउद्दीन वरील गोष्टी समजेल अशा सोप्या पद्धतीनं मलालाला सांगायचे. त्यांचं स्वप्न होतं, माझी मुलगी शिकली पाहिजे. ते मनापासून सांगायचे, “मलाला! तुला मी कोणतीही बंधनं घालणार नाही. तू तुझ्या इच्छेप्रमाणे कर. तुझं स्वातंत्र्य हाच माझा आनंद असणार आहे. बेटी, सगळ्या पक्ष्यांना पंख असतात. सगळेच पक्षी उडतात; पण एखादा गरुड पक्षी

आकाशात उंच झेप घेतो. अशी उंच झेप तू शिक्षणाच्या माध्यमातून घ्यावी, असं माझं स्वप्न आहे. यासाठी देव तुला प्रचंड इच्छाशक्तीचं बळ देवो, अशी मी प्रार्थना करतो.

वडिलांच स्वप्नं पूर्ण करण्याची किमया मलालानं सातव्या वर्षीच करून दाखवली. ती वर्गात पहिली आली. वर्गात लहान असूनही तिची प्रगती इतरांना प्रेरणा देणारी होती. संस्थासंचालकाची मुलगी आहे म्हणून तिला प्रथम श्रेणी मिळाली नव्हती; तर तिच्या कष्टानं आणि जिद्दीनं तिनं ती मिळवली होती. एवढचं नाही तर अभ्यासात मागं असलेल्या मुलीला मदत करण्याची तिची वृत्ती बघून सगळे थक्क होत. यातूनच तिच्या मैत्रिणी मलाला म्हणजे अलौकिक मुलगी आहे, असे म्हणू लागल्या.

झियाउद्दीन आपल्या लेकीला फक्त लिहिणं, वाचणं शिकविण्याचं काम करत नव्हते; तर ते जगण्याचे उत्तम संस्कारही गोष्टी सांगून करू लागले. चांगलं वाईट काय आहे ते समजण्यासाठी छोटीछोटी स्वानुभवाचे उदाहरणं ते सांगत. यातून तिचं बालमन विकसित होत होतं. आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे ते मुलांचे अनाठायी लाडही करत नव्हते.

मुलांनी सगळ्या गोष्टींत बालपणापासून भाग घेतला पाहिजे असं झियाउद्दीन यांना वाटायचं. त्यामुळेच मलाला खेळ, गाणं, भाषण, नाटकात भाग घेई. त्यांच्या शेजारी एक मुलगी राहत असे. मलालाची तिच्याशी मैत्री वाढली. दोघी खेळायच्या; पण ही मैत्रीण मोठ्या घरची असल्यानं लाडात वाढलेली होती. तिच्याकडं अनेक खेळणी अन् बाहुल्या होत्या. झियाउद्दीन यांच्याकडे मोबाईल फोन होता. त्यांनी मलालासाठी खेळातला प्लास्टिकचा मोबाईल आणला. या मोबाईलवर ती खोटंखोटं बोलत राही. पुढं हा मोबाईल हरवला. काही दिवसांनी तो तिच्या मैत्रिणीच्या घरी मलालाला दिसला. तिने त्याबद्दल विचारताच ती म्हणाली, माझ्या बाबांनी दिलाय.

मलालाला मैत्रिणीचा राग आला. तिला धडा शिकवयाचा असं तिनं ठरवलं. मलाला तिच्या घरी अभ्यासासाठी जात असे. यावेळी एक-एक वस्तू गुपचूप खिशात घालून घरी आणू लागली. पहिली चोरी करताना तिच्या बालमनात भीती आणि या धाडसामुळं कंप फुटला. पुढे मात्र ती सवयीची गुलामच बनली. चोरीच्या वस्तू कपाटात वाढत गेल्या. एके दिवशी आईनं कपाट उघडलं. आईनं त्या वस्तू शेजाऱ्यांना नेऊन दिल्या. आईनं आपली चोरी पकडली, या भीतीनं मलालाच्या अंगाचा थरकाप उडाला. माफी मागावी म्हणून मलाला घाबरत-घाबरत आईला सामोरी गेली. "मैत्रिणीनं माझा मोबाईल चोरला. तिला धडा शिकवावा म्हणून तिच्या वस्तू आणल्या." मलाला आईला असे सांगू लागताच ती म्हणाली, "मैत्रीण मोठी आहे तुझ्याहून! तिने एक चूक केली. तू चांगलं वागून तिला धडा शिकवायचा सोडून तूसुद्धा चोरी केलीस. ही खूप लाजिरवाणी बाब आहे."

मलाला या अपराधानं रात्रभर बेचैन होती. तिनं मनाशी निश्चय केला. यापुढं अशी चूक पुन्हा करायची नाही. तिनं देवाला हात जोडले. "मला माफ कर!"

त्यादिवशी रात्री झोपताना गप्प झालेल्या मलालाला समजावित बाबा म्हणाले, "बेटी, माणसाच्या आयुष्यात लहान-मोठ्या चुका होत असतात. मोह आवरता येत नाहीत कधीकधी; पण चुकीची जाणीव होणं ही सुधारण्याची सुरुवात असते. जगातील अनेक थोर पुरुषांच्या बालपणात, त्यांच्या हातून चुका घडल्या; पण पुढं त्यांनी त्या दुरुस्तही केल्या. चूक कबूल करण्यात मोठे सामर्थ्य आहे बेटा! ते सामर्थ्य आपल्या महात्मा गांधींमध्ये होतं.

त्यांचे सत्याचे प्रयोग हे उदाहरण आहे. झोप आता! तुला उद्या पुन्हा काम करायचं आहे.'' ते मुलीला थोपटू लागले आणि स्वत:च्या अजाण मुलीला या अपराधभावनेतून कसं बाहेर आणायचं, या विचारात गढून गेले

❖ ❖ ❖

# अल्लाला साकडं घातलं

‘कुराण सांगते एका माणसाची हत्या मानवजातीची हत्या आहे.”
झियाउद्दीन आपल्या मुलीच्या सर्वांगीण वाढीसाठी लक्ष देऊ लागले. यावेळी ते तिला छोट्या-मोठ्या स्वानुभवाच्या गोष्टी सांगत. त्या गोष्टीतल्या जीवनानुभवांचे संस्कार तिच्यावर होऊ लागले. एकदा ते म्हणाले, “बेटी, कोणाबद्दलही मनात राग धरू नये. राग हा अंगावर साचलेल्या मळासारखा असतो. आपण मळ धुऊन टाकतो तसा रागही सोडून दिला पाहिजे.”
यावर मलाला विचारायची “एखाद्यानं चुकीची गोष्ट केली तरी माफ करायचं?” हसून बाबा म्हणायचे, “हो! माझ्या लहानपणी माझ्या खोडकर मित्रांकडून मला त्रास झाला; पण त्यांनी मला खूप मदतही केली. माझी आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. हेच मित्र वेळोवेळी मदतीला धावून आले. हे फार महत्त्वाचं आहे आणि तेच मी आज लक्षात ठेवलं.”
मलालाला सफिनाची आठवण आली. पालकांकडून लाडावलेली ही सफिना मलालाहून मोठी होती. तिनं मलालाचा खेळण्यातला मोबाईल चोरला. मैत्रिणीला धडा शिकविण्यासाठी मलालाने तिच्या घरातून वस्तू चोरल्या आणि ही गोष्ट आईला कळल्यानंतर तिला पश्चात्ताप झाला. पुढे ही सफिना मलालाची चांगली मैत्रीण झाली. मोनिबा नावाची आणखी एक मैत्रीण तिला मिळाली.
शाळेच्या अभ्यासात मलाला पहिली असायची. शाळेत मुलींच्या भाषणांच्या स्पर्धा असत. शिक्षक आणि पालक मुलींना भाषणे लिहून देत. मलालाचे बाबा तिला भाषण लिहून देत. बरेचदा मलाला या स्पर्धेत पहिली येई. एकदा अशीच स्पर्धा होती. सगळे विद्यार्थी तयारी करून आले. पहिला क्रमांक मिळाला मोनिबाला आणि मलालाला दुसरा.



शाळेत कथाकथन करताना मलाला

क्षणभर मलाला खट्टू झाली; पण तिला वडिलाचं सांगणं आठवलं. ते सांगायचे, “प्रत्येक मुलाला अथवा मुलीला वाटत असतं आपला पहिला क्रमांक यावा. तू नेहमीच पहिली आलीस तर इतरांना संधी कधी मिळणार? तू दोन-तीनदा पहिली आली आहेस. आता ही संधी दुसऱ्या मैत्रिणीस देण्यात खरा आनंद आहे. त्याशिवाय जिंकलेल्या तुझ्या मित्र-मैत्रिणींचं अभिनंदन कसं करणार?”
मलाला हसली. बाबाचं सांगणं तिला पटलं.
आई मलालाला सांगायची. तू आता मोठी झाली. घरातल्या कामाची सवय मुलीच्या जातीनं लहानपणापासून करायला हवी. यावेळी मलालाला बाबांचं सांगणे आठवायचं. ते म्हणायचे,
“कामच माणसाला जबाबदारी शिकवतं.”

एकदा असंच झालं. आई मलालास म्हणाली, ‘‘एवढा कचरा रस्त्यापलीकडच्या ढिगावर टाकून ये.’’ बटाट्याची साल, भाजीचे तुकडे आणि उकडलेल्या अंड्याची टरफलं होती एका पिशवीत. हे काम नेहमी तिचा भाऊ करायचा. तो आज घरात नसल्यानं आईनं ते काम मलालास सांगितलं. कचऱ्याची पिशवी घेऊन मलाला रस्त्यापलीकडच्या कचऱ्याच्या ढिगाकडं निघाली. रस्त्यानं चालताना तिच्या डोक्यात विचार सुरू होते. याच तंद्रित ती उकिरड्यापर्यंत पोहोचली. समोर कचऱ्याचं टेकाड पसरलेलं. त्यावर तऱ्हेतऱ्हेचा कचरा अस्ताव्यस्त पांगलेला. डाव्या हाताला तीन-चार डुकरं ढिगात तोंड खुपसून तोंडानं तऱ्हेतऱ्हेचे आवाज करत होते. तर उजव्या बाजूला कुत्र्यांची झुंडही त्यावर मस्ती करत खेळत होती. घाणेरडा दर्प सगळीकडं पसरला होता. हातातील पिशवीकडे बघत मलालानं ती समोरच्या ढिगाकडं भिरकावली. त्या सरशी एक आकृती कचऱ्यातून उभी राहिली. क्षणभर दचकून मलाला एक पाऊल मागं सरकली. बुटासह तिचा पाय गुडघाभर घाणीत रुतला. तिनं फेकलेला कचरा त्या मुलीच्या डोक्यावर पडल्यानं, तो तिनं उजव्या हातानं बाजूला सारला. जखमी हातानं डोक्याचे विस्कटलेले केसं सावरीत ती मुलगी हसली. तिच्या डाव्या हातात प्लॅस्टिकचं मोठं पोतं होतं.

मलाला हे दृश्य बघून मनातून हलली. बाबा एकदा म्हणाले होते, ‘‘समाजात अनेक गरीब मुलं दोन वेळेसचं जेवण मिळावं म्हणून उकिरड्यावरच्या घाणीतून कागद, प्लॅस्टिक आणि काच वेचतात. भंगाराच्या दुकानात विकतात. या कमाईतून त्यांचं घर चालतं.’’ मलालाच्या वयाची ही मुलगी बघून आपण जर तिच्या जागी असतो तर, असा विचार करू लागली.

कचऱ्याचा ढीग ओलांडून आणखी तीन-चार मुलं वर आली. त्या मुलांशी बोलावं असं मलालाला वाटू लागलं; पण पुन्हा भीती अन् संकोचानं तिला धीर झाला नाही. एक शब्दही न बोलता ती घराकडे परतली. ती घरी आली आणि त्या मुलांचा विचार करत बसून राहिली. आईनेही कामात असल्याने तिच्याकडे लक्ष दिले नाही.

दुपारी शाळा सुटल्यानंतर झियाउद्दीन घरी आले तेव्हा मलाला त्यांच्याजवळ परत येऊन म्हणाली, ‘‘बाबा, तुम्ही माझ्या बरोबर चला.’’ वडिलांनी विचारलं, ‘‘कुठं जायचं बेटा?’’

‘‘तुम्ही माझ्यासोबत आता चला-जेवण नंतर करा. सकाळी मला त्या मुलांशी बोलता आलं नाही.’’ ती म्हणाली. झियाउद्दीन मलालासोबत निघाले. रस्ता ओलांडून ती कचऱ्याच्या ढिगाकडे चाललेली बघून त्यांच्या मनात कुतूहल निर्माण झालं. समोर मोहल्ल्यातील कचऱ्याच्या ढिगावर मुलं काहीतरी शोधत होती.

‘‘मी सकाळी कचरा टाकायला इथं आले होते, तेव्हा या मुलांना पाहिलं.’’ ती म्हणाली. मलालाच्या पाठीवर हात ठेवत ते म्हणाले, ‘‘ही आपलीच मुलं आहेत. गरिबीमुळं त्यांना हे काम करावं लागतं.’’

‘‘त्यांना आपल्या शाळेत शिकायला जागा द्या.’’ मलाला म्हणाली. ते ऐकून झियाउद्दीनच्या डोळ्यात पाणी जमा झालं. त्यांनी त्या मुलांना आवाज दिला. आवाज ऐकून ती पोरं दचकली.

‘‘इकडे या मुलांनो! तुमच्याशी मला बोलायचं आहे’’ ते म्हणाले. घाबरलेली मुलं कचऱ्याच्या ढिगावरून खाली उतरली. मागं पाहत आपापलं कचऱ्याचं पोतं सांभाळीत दूर

पळाली.

‘‘आपल्यासारख्यांची त्यांना भीती वाटते बेटा! त्यामुळे ते न बोलता पळून चालले.’’ ते म्हणाले.

‘‘बाबा, त्यांच्या शिक्षणाचं काय?’’ मलालाचा प्रश्न त्यांना अस्वस्थ करून गेला. तिचा हात धरून ते घराकडे मूकपणे परतू लागले.

आई घरी वाट पाहत होती. जेवायला आलेले मलालाचे बाबा न जेवता बाहेर पडल्यानं त्या विचारात पडल्या होत्या. झियाउद्दीन पत्नीस म्हणाले, ‘‘तू मलालास कचरा टाकायचं काम सांगितलंस, ते बरं केलंस. भंगारातून काच, कागद वेचून काम करणारी मुलं तिनं बघितली. ती त्या मुलांना आपल्या शाळेत घ्या म्हणाली.’’ ते ऐकून मला आनंद झाला.

मलालाची आई शिकलेली नव्हती; पण पतीच्या कामात त्यांचा मोठा वाटा असल्यानं आपल्या मुलीचं सांगणं ऐकून त्यांना खूप समाधान वाटलं. ‘‘ती म्हणते ते करा.’’ त्या पटकन म्हणाल्या.

जेवणानंतर वडील पुन्हा कामावर गेले. मलालाने अभ्यासाची पुस्तके काढली. वही काढली. काय लिहावं? ती विचार करू लागली. उद्या शाळेत भाषण करायचे होते. नेहमी वडीलच भाषण लिहून द्यायचे. उद्याचं भाषण वडिलांकडून लिहून न घेता, स्वत: लिहावं असा तिने निर्णय घेतला. तिने वही उघडली. भाषणाच्या विषयाचा विचार ती करू लागली; पण तिच्या डोळयांसमोरून कचऱ्याच्या ढिगावर उभी असलेली मुलगी हलेचना! तिने पेन उघडला आणि वहीवर लिहू लागली.

‘‘प्रिय अल्ला,

आज शेवटी न राहवून तुला पत्र लिहायला बसले. तुला सगळं दिसतं. तू समजदार आहेस. सगळया जगातील किड्या मुंग्यांना अन् झाडं-झुडपांना तू वाढवतो, जगवतो. सगळयांची तुला काळजी आहे, असे बाबा नेहमी सांगत आले आहेत. असं असेल तरी अलीकडे अफगाणिस्तानावर बॉम्बहल्ले सुरू आहेत, त्यामुळे माणसं मरतात हे टीव्हीवर मी बघितलं आहे. स्वातमधील मुलींच्या शाळा बंद झाल्या आहेत. महिलांना बाहेर फिरायला बंदी आली असून त्यांना बुरख्यात अडकवून टाकण्यात आलंय. हे सगळं कशासाठी सुरू आहे? आज सकाळी मी जे चित्र बघितलं-कचऱ्याच्या ढिगातील घाणीतून ती मुलं दोन वेळेचा घास शोधतात. त्यानं मी अस्वस्थ झालेय. त्या मुलांची त्यातून मुक्ती कर. त्या मुलांना मला शिकवायचंय. त्याकरिता मला बळ दे. माझी एवढीच प्रार्थना आहे.

तुझी लेक,
मलाला.’’

तिने वही बंद केली. सतरंजीवर आडवी होऊन डोळे बंद केले. तिच्या पत्राचा अल्लाकडे प्रवास सुरू झाला होता आणि घाणीत उभी राहिलेली तिच्या वयाची मुलं तिला बोलावत होती.

झियाउद्दीन यांचे खुशाल पब्लिक स्कूल चांगले सुरू होते. किरायाच्या इमारतीत शाळा भरायची. मुलामुलींना शिकवायचं या ध्येयानं ते झपाटले होते. शिक्षणासोबत ते मुलींच्या शिक्षणाबद्दल आग्रही होते. महिलांच्या एकूण समाजातील घुसमटीबद्दलही त्यांचा

दृष्टिकोन उदारमतवादी होता. स्वात खोऱ्यात होणाऱ्या दहशतवाद्यांच्या अत्याचाराबद्दलही ते नाराज होते. पाकिस्तानात मुस्लिमात अनेक जाती-उपजाती होत्या. त्यांचे आपसांत झगडे सुरू होते. स्वार्थासाठी नातेसंबंध तोडून एक दुसऱ्याच्या जीवावर काहीजण उठत होते. गेली अनेक वर्षं ही भांडणं-तंटे सुरू आहेत. स्वातच्या खोऱ्यातही मुस्लिमांच्या अनेक जमाती आहेत. त्याही वेगवेगळया कारणांनी आपापले वैर भांडणातून व्यक्त करत असतात. अशा वातावरणात गावा-गावातील भांडणं मिटावीत म्हणून जिरगा नावाची संस्था काम करी. झियाउद्दीन यांची या संस्थेत महत्त्वाची भूमिका असे. आपापसात भांडून शत्रूंना मदत करू नका, असे ते या मंडळींना समजावून सांगत. त्यांचं हे काम काही लोकांना आवडत नसे. त्याकाळात गावोगाव काही मंडळी स्वत:ला मुफ्ती समजत.




'खुशाल पब्लिक स्कूल' मध्ये जाणाऱ्या विद्यार्थिनी

झियाउद्दीनच्या घरासमोरच्या मोठ्या घरात एक उंच देखणे मुल्ला राहत होते. ते स्वत:ला मुफ्ती म्हणत. इस्लाम धर्माच्या अभ्यासकास मुफ्ती समजलं जाई. कुराण आणि मुस्लिम धर्मतत्त्वांवर त्यांचा अधिकार असे; पण या मुल्लांचा काहीही अभ्यास नव्हता. दाढी वाढविली आणि पांढरा फेटा चढवला की, मुफ्ती असल्याचा आव आणणाऱ्यांपैकी ते होते. त्यांचा झियाउद्दीनच्या कामाबद्दल राग होता. त्यांना मुला-मुलींना शिकवणं आवडत नव्हतं. मुलींना शाळेत पाठवू नका, असं काही जुन्या विचारांची माणसं म्हणायची. खुशाल पब्लिक स्कूलमध्ये मुली ये-जा करताना बघून मुल्लांचं डोकं उठू लागलं.

शाळेची इमारत ज्या महिलेची होती, त्यांना मुल्ला भेटले. ‘‘तुम्ही तुमची जागा झियाउद्दीनच्या शाळेसाठी दिली, हे धर्माविरुद्ध काम आहे. बुरखा न घालता मुली शाळेत येतात. मुस्लिमांसाठी ही शरमेची गोष्ट आहे.’’ ते म्हणाले. एवढंच सांगून ते थांबले नाही. तुमची शाळेची इमारत खाली करून घ्या. मी इथं मदरसा सुरू करतो.

झियाउद्दीनला ही गोष्ट घरमालकिणीकडून समजली. मुल्लांचा सल्ला त्यांना आवडला नाही. झियाउद्दीनला या अर्धवट मुफ्तीचा रागही आला. अलीकडे सगळयाच क्षेत्रात अर्धवट ज्ञानाची चलती आहे, त्याकडे दुर्लक्ष करावं असं त्यांनी ठरविलं. खरं तर धर्मग्रंथ, कुराणात सहनशीलता बाळगा, असाच संदेश दिला आहे. या शांततेच्या मूल्यांचा धर्मांध मंडळींना विसर पडून ते जिहादला प्रोत्साहन देत आहेत. एवढंच नाही तर मुलींना शिकविणं हे धर्माविरुद्धचं काम आहे, असं पसरवित आहेत. झियाउद्दीन विचारात गढले.

धर्माच्या नावाखाली माणसं आंधळी बनत होती. हे मुल्ला आणि मुफ्ती त्यास आणखी खतपाणी घालण्याचं काम करत होते. या जुन्या विचारांचा पगडा एवढ्यावरच थांबत नव्हता तर न ऐकणाऱ्या विरुद्ध आततायी कारवाई ते करू लागले.

मिंगोराच्या रस्त्यावर बोर्ड लागले.
धर्मरक्षण महत्त्वाचे आहे. धर्मरक्षणासाठी जीवावर उदार होऊ शकणाऱ्या तरुणांची गरज आहे. अशा तरुणांसाठी आम्ही प्रशिक्षण सुरू करत आहोत. आमच्याशी संपर्क साधा. त्या फलकावर फोन नंबरही दिले होते. या प्रोत्साहनाला बळी पडून शाळा शिकणारी मुलं जिहाद प्रशिक्षणासाठी पाकव्याप्त काश्मिरात पाठविली जाऊ लागली.
पाकिस्तानास 14 ऑगस्ट, 1947 ला स्वातंत्र्य मिळाले; पण त्याचवेळी हिंदुस्थानची फाळणी होऊन दोन राष्ट्रे बनली. एवढेच नाही तर बहुसंख्य मुस्लिम वसती असलेल्या हिंदुस्थानातील पाकिस्तान व बंगाल असे दोन तुकडे झाले. पाकिस्तानच्या वायव्येकडचा सरहद्दप्रांत, स्वातही त्यावेळी स्वतंत्र राज्य होतं. 1969 साली स्वात पाकिस्तानचा भाग बनले; पण तेथील अस्थिरता आणि टोळयांमधील भांडण सुरूच होते. मलालाच्या जन्माअगोदर एक वर्ष काबूलवर तालिबानने ताबा घेतला. त्याचं लोण शेजारच्या स्वातमध्येही पसरत गेलं. पाकिस्तानातही अस्थिरता सुरूच होती. नवाब शरीफ जाऊन बेनझीरचं सरकार आलं आणि तेही पायउतार झालं. पुढे भुत्तोची हत्या झाल्यानंतर तालिबानची दहशत वाढत गेली.
या सर्व घडामोडींचा फटका स्वातमधील पश्तूनच्या भूमीलाही बसल्याशिवाय राहिला नाही. 2002 साली मुशर्रफ यांनी निवडणुका जाहीर केल्या. त्या अगोदर एक वर्षांपूर्वी 'अलकायदा' या दहशतवादी संघटनेच्या आत्मघाती विमानानं न्यूयार्कच्या इमारतींवर हल्ला केल्याने जगभर या घटनेचे तीव्र पडसाद उमटले होते. अमेरिकेने अफगाणवर जोराचा बॉम्बहल्ला करून तालिबान सरकार उलथून टाकले आणि 'अलकायदा'चा म्होरक्या ओसामा बिन लादेन अफगाणातून निसटून शेजारच्या पाक डोंगराळ भागात लपून बसला. या पार्श्वभूमीवर मुशर्रफ यांनी 'नियंत्रित लोकशाही'साठी निवडणुका जाहीर केल्या. स्वातमध्ये तर मुल्लांचं वर्चस्व असलेलं सरकार होतंच. धार्मिक पाठबळ असलेल्या पाच संघटना एकत्र येऊन मुत्तहिदा मजलिस अमल म्हणजे एमएमए नावाचा धार्मिक संघटनाचा एक पक्ष बनला. या पक्षानं स्वात निवडणुकीत यश मिळवलं आणि तालिबानी बंधनं कडक होऊ लागली. दाढी आणि फेटा हे पश्तुनी शौर्याचं आणि धर्मरक्षणाचं मानचिन्ह समजलं जाऊ लागलं.
तालिबानी हुकूमशाहीचा धर्मांध वरवंटा फिरू लागला. तालिबानी सैन्यानं झरदारींना कैद केलं आणि याच सुमारास 2005 मध्ये मौलाना फजलुल्लानं स्वातमध्ये एफ. एम. रेडिओ स्टेशन सुरू केलं. या रेडिओवरून ते जनतेला एका मागोमाग एक बंधनाचे आदेश देऊ लागले. या मानवीसंकटात नैसर्गिक संकटानं भर घातली. पाकिस्तानात भयंकर भूकंपानं थैमान घातलं. सत्तर हजारांहून अधिक माणसं बळी गेली. एक लाखाहून अधिक लोक गंभीर जखमी झाले. हजारो शाळा जमीनदोस्त झाल्या. तीन हजार चौरस किलोमीटर टापूमध्ये नुसता हाऽहाकार उडाला. शाळेत जाणाऱ्या अठरा हजार कोवळया बालकांच्या कळया खुडल्या गेल्या. दैवी आणि मानवीसंकटानं पाकिस्तानचं जनजीवन आणखी उद्ध्वस्त करून टाकलं. धर्माच्या नावानं माणसावर तऱ्हेतऱ्हेची बंधनं घालणाऱ्या संघटनांनी तर फर्मान काढलं, ही अल्लानं केलेली शिक्षाच आहे. या गोष्टी करू नका म्हणून सांगत आहोत; पण काही मंडळी ऐकत नाही. याचा परिणाम म्हणून ही निसर्गसंकटं

आपल्यावर चालून आली आहेत. आमचं ऐकलं नाही तर, याहूनही भीषण संकटाला सामोरं जावं लागेल, अशा धमक्याही वाढत होत्या.



वाचण्यात रमलेली मलाला

मलालाला गोष्टींची पुस्तकं वाचायला आवडायची. गोष्ट वाचू लागली की, त्यातील पात्रंच तिच्याशी बोलायची, खेळायची आणि कधी भांडायचीसुद्धा. परीकथा आणि भुताखेतांच्या गोष्टी तिला आवडायच्या. दुष्ट माणसाला शिक्षा करणारं भूत तिला खूप आवडायचं; पण निरागस माणसांचं रक्त पिणाऱ्या भुताबद्दल मात्र तिच्या मनात अढी निर्माण झाली होती. ती आता दहा वर्षांची झाली होती. तिची जिवलग मैत्रीण मोनिबा आणि ती शाळा सुटली की, पुस्तकातील गोष्टी वाचण्यात दंग होत. याच काळात स्वातमध्ये तालिबानांनी शिरकाव केला. वृत्तपत्रात आणि टीव्हीवर अफगाणी तालिबान तिने पाहिले होते; स्वातमधील रस्त्यावर फिरणारे तालिबान तिला वेगळे वाटू लागले.

डोक्यावरचे विस्कटलेले केस आणि तशाच वाढलेल्या दाढीतली ही हत्यारबंद माणसं विचित्र दिसत होती. या लोकांचा पोशाख म्हणजे अपरी सलवार, वर लांब कमीज आणि डोक्यावर काळा किंवा पांढरा फेटा गुंडाळलेला असा असे. काहींच्या पायात मळलेले बूट होते, तर काहींच्या पायात प्लॅस्टिकच्या चपला. रस्त्याच्या कडेला खांद्यावर बंदूक घेऊन उभे दिसायचे. मळलेल्या पटक्याच्या टोकाला नाक शिंकरतानाचा घाणेरडा आवाज ऐकून तिला किळस यायची. चेहरा कपड्यात झाकून घेतलेला आणि डोळ्याच्या ठिकाणी रुपयाच्या आकाराचे छिद्र ठेवलेले होते बघायला. छातीवर काळ्या रंगाची पट्टी होती. त्यावर लिहिलं होतं - शरीया लॉ म्हणजे हौतात्म्य सैनिक.

झियाउद्दीन मलालाला म्हणाले, ‘‘ही काळ्या कपड्यातील पलटण म्हणजे तोरपत्की. अठ्ठावीस वर्षांचा लंगडत चालणारा मौलाना फझलुल्लाह त्यांचा प्रमुख आहे. मौलाना सूफी मोहंमदच्या मदरशात तो शिकला. पुढं त्यांच्या मुलीशी लग्न केलं. या सूफी मोहंमदास सरकारने तुरुंगात टाकल्यानंतर फझलुल्लाह इथल्या तालिबानचा लीडर बनला. तो स्वात नदीपलीकडे राहत होता. याने एफ. एम. रेडिओ स्टेशन सुरू केलं.’’

‘‘बाबा, त्या रेडिओवर तो इस्लाम धर्माबद्दल सोप्या पद्धतीने माहिती देतो, असे आई म्हणाली. मीही त्याचं ऐकलं आहे.’’ मलाला म्हणाली.

‘‘हो बेटा, तो मौलाना फार हुशार आहे. मी जनतेला कुराणातील धर्म सोप्यापद्धतीने समजावू असं तो म्हणतो. स्वत:ला तो धर्मसुधारकही म्हणवितो; पण त्यांचं धोरण फार धोकादायक आहे. चांगलं वागा असं तो वरवर सांगतो. व्यसनाच्या आहारी जाऊ नका. गांजा, अफू वाईट आहे. शरियतमध्ये सांगितल्याप्रमाणे नियमित अल्लाची प्रार्थना करा.’’ झियाउद्दीन थोडं थांबले.

“हे तर चांगलंच आहे, बाबा!”
“इथंच खरा धोका आहे बेटी! धर्माच्या नावाखाली हळूहळू विष पसरविण्याचं काम आहे हे. तो आता सांगू लागला आहे की, सरकार भ्रष्ट आहे. गरिबांना न्याय मिळत नाही. या लोकांसाठी आपण समांतर न्यायालय सुरू करणार. गुन्हेगारांना जाहीर फटके मारणार. याचा अर्थ कायदा हातात घेणं आहे. फझलुल्लाहच्या माणसांनी टीव्हीची दुकानं बंद केली. सी.डी., डीव्हीडी जाळू लागले. आता तर ते सांगू लागले, मुलींना शाळेत पाठवू नका.”
“त्यांचं हे सांगण मात्र चूक आहे.” मलाला म्हणाली.
“आपल्या खुशाल पब्लिक स्कूलमध्ये सत्तर शिक्षक आहेत. त्यात तीस महिला शिक्षक आहेत. यातील काही शिक्षकांना मौलाना फझलुल्लाहचे विचार आवडू लागले आहेत, ही गंभीर बाब आहे. आपले शिक्षक आपली माणसं आहेत. ती चुकीच्या विचारांनी काही काळ प्रभावित झाली तरी त्यांना समजावून सांगणं आपलंच काम आहे. आपण तसा प्रयत्न करू या आणि मुलींना शिकविल्याशिवाय आपला मूळ प्रश्न सुटणार नाही,” झियाउद्दीन म्हणाले आणि शाळेकडे गेले.
मौलाना फझलुल्लाहचे सासरे सूफी मोहम्मद तुरुंगात होते. तुरुंगातून फझलुल्लाहच्या एफएम रेडिओवर त्यांनी फर्मान काढलं.
“महिलांना शिक्षण द्यायचं नाही. मुलींनासुद्धा शाळेत पाठविणं बंद करा. मुलींसाठी सुरू केलेल्या मदरसाही बंद करा. इस्लामनं महिलांच्या शिक्षणास यापूर्वी प्रोत्साहन दिलं होते, असं मला दाखवून द्या. जर कोणाला ते आढळलं तर त्याने यावे आणि माझ्या दाढीवर खुशाल लघवी करावी.”
हे ऐकून झियाउद्दीन आणि शिक्षणासाठी कार्य करणाऱ्यांना धक्का बसला. या मौलानाचा खरा मुखवटा समोर आला. अगोदर ते महिलांना आवाहन करून सांगायचे - कुटुंबात तुम्ही फार मोठी जबाबदारी सांभाळत आहात. माणसं कामासाठी बाहेर जातात. दोन पैसे घेऊन येतात; पण तुम्ही घराचा सगळा गाडा जबाबदारीनं सांभाळता. मुलं सांभाळणं, घरातलं काम करणं, बाजारातून गरजेचं सामान आणणं यातलं काही पुरुष करतात काय? त्यामुळे तुमची जबाबदारी इस्लामनं आमच्यावर सोपवली आहे. असं ते बोलले की, महिलांना फझलुल्लाह जवळचे वाटू लागले.
फझलुल्लाह एफएम रेडिओवरून एकानंतर एक फर्मान सोडू लागले.
मंगोरा शहरातील महिलांच्या ब्यूटी पार्लरवर बंदी घातली गेली. न ऐकणाऱ्याला तालिबानी दहशतवादी भर चौकात फटके देऊ लागले. न्हाव्याच्या दुकानावर गदा आली. पुरुषांनी दाढी वाढविली पाहिजे. डोक्याचे केसही कापण्याची गरज नाही. मग न्हाव्याची दुकानं कशाला हवीत?
मलालाची आई सुरुवातीला मौलानाचं भाषण ऐकून प्रभावित झाली होती. त्यामुळे ती बोलताना, त्याच्याबद्दल सहानुभूती दाखवायची. शेवटी मौलानानं आपलं मूळ रूप दाखवलं आणि मुलींच्या शाळांवर बंदी घातली, हे ऐकून त्या अस्वस्थ झाल्या.
सायंकाळी झियाउद्दीन पत्नीस म्हणाले, “मौलानाने शूरा म्हणजे समांतर न्यायालये सुरू केली. त्यांचं म्हणणं आहे. पाकिस्तानच्या न्यायपद्धतीत वर्षानुवर्षं निकाल लागत नाही. ज्यांना न्याय मिळतो त्यांना टेबलाखालून लाच द्यावी लागते. शूरा न्यायालय झटपट

निकाल देऊ लागले आणि त्यांची शिक्षा मात्र अमानुष आहे. चौकात जाहीर फटके म्हणजे अंधारातील प्रवासच सुरू झाला आहे.''

या एक-एक बंधनानं ते अस्वस्थ होत होते.

मलालानं निरागसपणे विचारलं, ''गुन्हेगारांना शिक्षा करणं ठीक आहे बाबा! पण मुलींनी शाळेत जाऊ नये असं का वाटतं त्यांना?''

''लेखणीच्या ताकदीला ते घाबरले आहेत बेटा!'' झियाउद्दीन म्हणाले. ''पण शिक्षणाचं काम हे असं थांबवून चालणार नाही.''

फझलुल्लाहची तालिबानी पलटण शहरात फिरू लागली. तालिबानांनी हुकूम केलेल्या गोष्टी करताना कोणी आढळलं की, तालिबानी शिपाई पोलिसाहून तत्परतेनं कर्तव्य करू लागले. एक वर्षाचा काळ उलटताच मौलाना आणि त्यांचा एफएम रेडिओचं बळ वाढलं. त्यांची सेना आणखी आक्रमक बनली. रमजान ईद जवळ आली तशी बाजारपेठांत गर्दी वाढू लागली. बंद पडलेली दुकानं भीतभीत उघडली जाऊ लागली.

ईदच्या निमित्ताने मौलाना इस्लामच्या सूत्रांचा हवाला देत म्हणाले, ''चार पायाचा बोकड कापणे ही ईदची प्रथा आहे; पण यावर्षी दोन पायांच्या प्राण्याची आहुती दिली जाणार आहे.''

मौलानाचं फर्मान ऐकून स्वातमध्ये भीतीची लहर उठली; पण यास जाहीरपणे विरोध करायला पुढं कोणी आलं नाही. मात्र या फर्मानाचं दृश्य स्वरूप बघायला मिळू लागलं. खानमंडळी तसेच धर्मातीत आणि राष्ट्रीय विचारांच्या कार्यकर्त्यांवर फझलुल्लाहच्या पलटणींचा राग होताच. पार्टीच्या अवामी नॅशनल कार्यकर्त्यांवर हल्ले सुरू झाले. खानमंडळींचे मुडदे पडू लागले.

विशिष्ट लोकांना निवडून त्यांची हत्या घडवून आणणं हे स्वातमध्ये पहिल्यांदा घडू लागलं. ईदच्या निमित्ताने मलालाचं कुटुंब त्यांच्या दूरच्या गावी आलं होतं आणि ते जेव्हा मिंगोराला परतलं तेव्हा शाळेच्या बंद गेटवर फलकावर मोठ्या अक्षरात धमकी लिहिली होती,

**“तुम्ही मुस्लिम धर्मावर श्रद्धा नसलेले लोक आहात.**
**पाश्चिमात्य शिक्षण देऊन मुलांना बिघडवत आहात.**
**तुम्ही मुलींना शिक्षण देता आणि इस्लामविरोधी गणवेश घालू देता.**
**हे थांबवा!**
**नसता तुमच्या पोराबाळांना रडावं लागेल.”**

**- फेदाईन.**

❖ ❖ ❖

# मुलं ही
# को-या पाटीसारखी

**"तालिबानी आमची पुस्तके आणि पेन हिसकावून घेऊ शकतात; पण ते आम्हाला आमच्या विचारांपासून परावृत्त करू शकणार नाहीत."**

झियाउद्दीन एकटे असले की, मलालाशी बोलत बसत. त्यांचं बोलणं ती लक्षपूर्वक ऐकायची. इतिहास त्यांचा आवडीचा विषय; पण गेल्या पन्नास वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरचा पाकिस्तान आणि स्वात खोऱ्यातील इतिहास मुलांना गोष्टीरूपानं सांगावा असा प्रेरणादायी नसल्यानं त्यांनी शिक्षण आणि विज्ञानाकडं लक्ष दिलं.

ते मलालाला सांगायचे, "बेटा, पूर्वीच्या काळी लढाया करून, आक्रमण करून सत्ता हस्तगत केली जायची. ती सत्ता सांभाळण्यासाठी खूप कसरत करावी लागायची; पण अलीकडच्या इतिहासानं सिद्ध केलंय की माणसाच्या कल्याणाची आणि परिवर्तनाची शिक्षण आणि विज्ञान हीच दोन आयुधं आहेत."

"बाबा, असं असताना आज आपल्याकडं मात्र शिक्षणाला विरोध होत आहे."

"होय, पूर्वी बंदुकीची भीती वाटायची. आज ही मंडळी पेन आणि पुस्तकांना घाबरत आहेत. त्यांचं घाबरणं स्वार्थासाठी आहे. जगाचा इतिहास सांगतो की, बऱ्याचशा लढाया अन् युद्धं ही धर्माच्या नावाखाली अन् स्वत:च्या स्वार्थासाठी लढली गेली. धर्म ही अफूची मात्रा आहे. सर्वसामान्यांना ती लागू पडते."

"यात आपलं किती नुकसान होत आहे, हे का नाही समजत त्यांना?"

आपल्या मुलीच्या अशा प्रश्नानं झियाउद्दीन पुन्हा विचार करू लागत. यावर ते तिला त्या विषयापासून वर्तमानाकडं वळवत म्हणत, "हेही दिवस बदलतील."

"कधी? मी शाळेत निघाले की, आजूबाजूचा प्रत्येक माणूस मला तालिबानी वाटू लागतो."



*मिंगोरा शहरातील तालिबानी*

"तो तालिबानी नाही तोही माणूस आहे. असा विचार कर तू. आज काही लोकांच्या भडकवण्यामुळं तो तसं वागतो. या परिस्थितीला आपलं सरकार, तिथली आपली माणसंच जबाबदार आहेत." झियाउद्दीनचं असं सांगणं मलालाला गोंधळात पाडून गेलं. एखादा वाईट वागतो, त्याला आपण कसे जबाबदार आहोत?

एरवी रात्रभर तिला चांगली झोप येई. पहाटेपहाटे तर शाळेची स्वप्नंही पडत; पण गेल्या काही महिन्यांत हेलिकॉप्टर अन् गोळीबारांच्या आवाजानं शांत झोपेचं खोबरं व्हायचं. कधी एकदा सूर्योदय होऊन भीतीचा अंधार जाऊन शाळेत जाईन, असं तिला वाटू लागे. विद्येची प्रकाशकिरणं तिला उल्हास देऊन जात.

मलाला शाळेत आली की, तिला सगळ्या गोष्टींचा विसर पडे. वर्गात तिची आणि तिच्या

मैत्रिणीची स्पर्धा सुरू असे. सुरुवातीला प्रत्येकवेळी आपणच पहिलं आलं पाहिजे, असं तिला वाटायचं; पण आता हा आग्रह कमी झाला होता. तरीही अभ्यासाकडे ती पूर्वीइतकीच लक्ष द्यायची आणि बरेचदा विविध स्पर्धांमध्ये पहिला नंबर पटकावयाची; परंतु यामुळे काही पालक तक्रार करू लागले. मलालाचे बाबा शाळेचे मालक आहेत. मालकाची मुलगी म्हणून शिक्षक तिच्याकडे झुकते माप देऊन इतर मुलींवर अन्याय करतात, असे ते म्हणू लागले.
शिष्यवृत्ती परीक्षेसाठी बोर्ड परीक्षा घेतली जाई. शाळेतील चांगला अभ्यास असलेल्या मुलींनाच या परीक्षेत बसविले जाई. या परीक्षेसाठी मलाला आणि तिची वर्गातील मैत्रीण मलका-ई-नूरची निवड करण्यात आली. परीक्षा झाली आणि जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून दोघींचीही निवड झाली. दोघींनाही सारखेच गुण मिळाले.
मलाला, मोनिबा आणि अत्तिया या मैत्रिणींनं शाळेत नाटक बसवलं. त्यांचा अभिनय बघून सगळयांनी प्रशंसा केली. अत्तिया थोडी खोडकर होती आणि मलालाचे विचारही तिला माहीत होते. नाटकाच्या दुसऱ्या दिवशी अत्तिया तिला म्हणाली, "आमचे सैनिक काही चांगले नाहीत, त्यांच्यापेक्षा आमचे काळया फेट्यावाले बंदूकधारी परवडले."
आपल्या मैत्रिणीचे असे विचार ऐकून मलालाला धक्का बसला.
"आपल्या अंगावर एक वाघ आणि एक नाग सोडला तर तू काय म्हणशील? कोणता अधिक धोकादायक आहे."
अत्तिया मलालाच्या प्रश्नानं हसू लागली. "तुझी परीक्षा पहायची होती मला. एक प्रकारचं चिडवणं समज. मी कबूल करते. अंगावर आलेला वाघ आणि नाग दोन्हीही धोकेदायक आहेत. झालं ना आता तुझं समाधान?"
मलका-ई-नूर म्हणाली, "असे आजूबाजूचे धोके टाळण्यासाठीच मी डॉक्टर होण्याचा निर्णय घेतला."
"मलाही तेच आवडतं. आजारी माणसांची सेवा करणे ही अल्लाची सेवा आहे, असं आपले शिक्षक सांगतात ना!" मोनिबा म्हणाली.
"माझ्या बाबांचीही तशीच इच्छा होती; पण मी अलीकडं ठरवलं की, मी संशोधक बनणार आहे. मी अतिरेकी कारवाया थांबविणारं यंत्र शोधून काढणार. ते यंत्र पोलिसांच्या कुत्र्याप्रमाणे दहशतवादी आणि त्यांची हत्यारं शोधून त्यांचा नाश करील. मानवहानी न होता हे कसं करता येईल, याचं मी संशोधन करणार आहे." मलाला सांगू लागली आणि आपल्या स्वप्नात पुन्हा गर्क झाली.
रात्री घरी मलाला वडिलांना म्हणाली, "आज शाळेत टीचरनी विचारलं, आम्ही पुढं कोण बनणार? माझ्या मैत्रिणी डॉक्टर होणार आहेत. मी मात्र विचार बदलला आता, बाबा! डॉक्टरपेक्षा संशोधक व्हावं वाटतं, असं सांगितलं. असं यंत्र शोधून काढायचं, शस्त्रधारीची शस्त्रचं निकामी व्हावीत."
मुलीचं बोलणं गंभीरपणे ऐकत झियाउद्दीन म्हणाले, "तुझं स्वप्न पूर्ण होवो बेटा! मला खात्री आहे, अस्थिरतेच्या रात्रीनंतर संपूर्ण प्रसन्नतेची सकाळ येतच असते. हेही भीतीचे दिवस तसे निघून जातीलच. रात्रीची भीती दूर करण्यासाठीच आपण शिक्षणाने पाठलाग करतो आहोत. संकटं कितीही त्रासदायक असलं तरी आपली इच्छाशक्ती अन्

दुर्दम्य आशा यातून मार्ग काढेलच. माणसानं धीर सोडू नये. हिमतीनं चालत राहिलं की, दडून बसलेली भीती निघून जाते. एक दिवस असा येईल की, आज आपणास भीतिदायक वाटणारे तालिबानीही निघून जातील. यासाठी सबुरी महत्त्वाची आहे.
बाबा बोलू लागले की, कुराणाचं तत्त्वज्ञानच वेगळ्या शब्दात मांडतात, असं मलालाला वाटे. परिस्थितीच माणसाला शिकवते. हा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी समविचारी माणसाचा आवाज वाढला पाहिजे.
रात्री उशिरापर्यंत झियाउद्दीन यांना झोप आली नाही. ते विचार करू लागले, या बिघडलेल्या परिस्थितीबद्दल सगळे अस्वस्थ आहेत; पण दहशतीमुळे कोणी बोलतच नाही. त्यांना त्यांच्या बालपणीच्या पश्तुनी लोकांच्या गोष्टी आठवल्या. गावात वडीलधाऱ्या मंडळींच्या शब्दांना धाक होता. छोट्यामोठ्या भांडणात गावातील ही वयस्करमंडळी दोन्ही बाजू ऐकून घेऊन त्यावर मध्यम मार्ग काढून भांडण मिटवायची. या गावपंचायतीस जिरगा म्हणत. हे जिरगामंडळ कुराणाच्या आधारे न्याय देई. जिरगामंडळाचा गावात धाक असे. मान असे.
आज अशा मंडळाची त्यांना गरज भासू लागली. असाच विचार गावातील काही माणसंदेखील करत होती. त्यांनी कौमी जिरगा नावाचा गट स्थापन केला. म्होरक्या युसूफभाई, खुर्शीद काकाजी आणि जाहीद खान यांनी पुढाकार घेतला. तिघांनी मोहल्ल्यामोहल्ल्यात लोकांच्या भेटी घेतल्या. बैठक बोलावली. अब्दुल खान खालिक या चौऱ्याहत्तर वर्षांच्या ज्येष्ठांना प्रमुख नेमले. फझलुल्लाह खान आणि त्याच्या अत्याचारास आव्हान देण्याची तयारी केली. झियाउद्दीनही त्यांच्यासोबत सामील झाले. या गटाचे प्रवक्ते म्हणून त्यांची निवड करण्यात आली.
स्वातमधील ज्येष्ठ नागरिकांच्या या गटानं फझलुल्लाहला जाहीर आव्हान देत पत्रकार परिषदेत विचारले, ‘‘अल्लाच्या नावानं तुम्ही काय करत आहात? शेकडो वर्षांची संस्कृती अन् इथल्या जनजीवनाशी आपण क्रूर खेळ करत आहात.’’
स्वातच्या ज्येष्ठांचं मंडळ इस्लामाबाद, पेशावर इथंही गेलं. वृत्तपत्रं, टी. व्ही., बी.बी.सी., व्हाइट ऑफ अमेरिका या वृत्तवाहिन्यांवर स्वातवरील तालिबान्यांच्या संकटाबद्दल जाहीर मुलाखती दिल्या. त्यात त्यांची एकच मागणी होती. ‘‘आमचे नागरिकत्वाचे हक्कही हिरावून घेतले आहेत. आज स्वातवर तालिबान्यांचं संकट आहे. काही दिवसांनी तुमच्यावरही येण्यास वेळ लागणार नाही.’’ सरकार ही गोष्ट गांभीर्याने घेत नव्हतं, तरीही या मंडळींनी धीर सोडला नाही.
झियाउद्दीन स्वातला परतले. शाळेतल्या मुली आणि मुलांचा शांततेचा मोर्चा काढला. त्यावेळी ते म्हणाले, ‘‘सरकारने या अत्याचाराकडे लक्ष द्यावे याकरिता शांततेच्या मार्गानं आम्ही सुरुवात करत आहोत. शाळा चालविणं, मुलांना शिकविणं हे पवित्र काम म्हणून आम्ही स्वीकारलं आहे. स्वातच्या शांतताप्रेमी मंडळींनी आपल्या हक्काच्या शांततेच्या मोर्चात साथ द्यावी.’’
मलालाची बहादूर मैत्रीण मोनिबा पुढे आली. मोर्चापुढं बोलू लागली, ‘‘आम्हाला आमच्या शिक्षकांनी धर्माबद्दल शिकविलं. आम्ही धर्माबद्दल आदर आणि प्रेम वाटणारी माणसं आहोत. स्वातचा परिसर शांततेची भूमी आहे. इथल्या नद्या, डोंगर आणि निसर्ग हा

आमचा सृष्टीसाठा आहे. ही शांततेचा संदेश देणारी भूमी आहे; पण आज जगात आमची ओळख काय आहे, हे आपणास माहीत आहे.''

आणखी काही मुलींनी न घाबरता आपलं म्हणणं मोर्चासमोर मांडलं.

शांतता मोर्चाला मिळालेल्या प्रतिसादामुळे झियाउद्दीनला हुरूप आला. पाकिस्तानच्या वृत्तवाहिन्यांनी स्वातच्या प्रश्नाकडं लक्ष वळविलं. झियाउद्दीन मलालाला म्हणाले, ''बेटा, उद्या जीईओ चॅनलवाले येत आहेत. पाकिस्तानमधलं हे मोठं आणि महत्त्वाचं चॅनल आहे. त्यांच्या प्रतिनिधींना स्वातमधील एका लहान मुलीची मुलाखत घ्यायची आहे. मी काही पालकांशी बोललो; पण ते तयार नाहीत.''



मोर्चापुढे बोलताना मलाला

''का तयार नाहीत ते, बाबा?'' मलालानं विचारलं.

''आपल्या मुलीनं तालिबानबद्दल कॅमेऱ्यासमोर बोलणं धोकादायक वाटतं त्यांना.'' ते म्हणाले. थोडं थांबून ते म्हणाले, ''खरं बोलायला भीती कसली?'' आणि पुन्हा गप्प झाले.

''मी बोलले तर चालणार नाही का बाबा?'' मलालानं विचारताच ते आनंदानं म्हणाले, ''तूच सांगू शकशील बेटा. आपण जाऊ या आणि जगापुढं सत्य मांडू या.'' रात्रभर मलाला कधीही न दिलेल्या मुलाखतीची कल्पनेनं तयारी करू लागली. रात्री तिनं अल्लाची प्रार्थना केली. तू सगळयांचं रक्षण करतोस. दीन-दुबळयांच्या पाठीमागं उभा राहतोस. दुष्टांचा संहार करतोस. आज स्वातमध्ये जे काही सुरू आहे, ते तू बघतो आहेसच. तुझं काम करायला मला शक्ती दे.

मलालाला सकाळी लवकर उठण्याचा कंटाळा यायचा. पहाटेच्या साखेरझोपेत अंथरुणावर पऱ्यांबरोबर खेळण्याची स्वप्नं तिला पडायची आणि शाळेत जायला उशीर होईल म्हणून आईचा तगादा सुरू व्हायचा. कधीकधी ती चिडून मलालाच्या अंगावरचं पांघरून ओढून ओरडायची. यावेळी तिला नाइलाजानं उठावं लागायचं; पण आज तसं काही झालं नाही. तिला भल्यापहाटेच जाग आली. रात्रभरही ती नीट झोपली नव्हती. आज वडिलांसोबत जायचं. टी.व्ही. वर मुलाखत आहे. नेहमी भाषण करायचं असलं की, बाबा लिहून देत. कधी मुद्दे सांगत. काल मात्र त्यांनी तसं काही केलं नाही.

'काय बोलायचं ते तुला आता चांगलं कळतं आणि तुला आता सगळं माहीत आहे. तू लहान नाहीस. आता अकरा वर्षांची झाली आहेस.'

ते रात्री झोपताना म्हणाले होते.

आई लवकर उठायची. घरातली सगळी कामं करायची. आजही त्या नेहमीप्रमाणे उठल्या आणि त्यांच्या अगोदर मलाला उठलेली बघून त्यांना हसू आलं; पण त्या काही न बोलता सकाळची कामं करू लागल्या. मलाला आणि तिचे बाबा तयार झाले. आईनं केलेली

न्याहारी खाऊन ते बाहेर पडले.
झियाउद्दीन आणि मलाला बसने पेशावरला आले.
जीईओ चॅनेलचं भव्य कार्यालय ती कुतूहलानं बघू लागली. आतापर्यंत घरात, शाळेत टी. व्ही. चा छोटा पडदा तिच्या परिचयाचा होता; पण इथं मोठ्या हॉलमध्ये अनेक मोठे पडदे दिसत होते. पेशावर प्रेस क्लबमध्ये इतरही चॅनेलचे प्रतिनिधी हजर होते. मुलाखत सुरू होण्यापूर्वी तिला इतरांची ओळख करून देण्यात आली. एक पत्रकार कुजबुजला, तेजस्वी परी दिसते. दुसऱ्यानं हसत विचारलं, ‘‘कोणत्या वर्गात शिकतेस बेटी?’’ झियाउद्दीननी सातवी सांगताचं त्यांना आश्चर्य वाटलं. वयाच्या आणि वर्गाच्या मानानं ती मोठी वाटत होती.
जीईओ प्रतिनिधीनं तिचं स्वागत करून पहिलाच प्रश्न विचारला, “मलाला बेटी, तुझं या प्रेसक्लबमध्ये आम्ही स्वागत करतो. या मुलाखतीच्या सुरुवातीस तुझी प्रतिक्रिया काय आहे?” मलाला गंभीर झाली. स्वत:ला सावरलं. हिमतीनं बोलू लागली,
“तालिबानी लोक माझा शिकण्याचा हक्क कसा हिरावून घेऊ शकतात? त्यांची ही हिम्मत आमच्या हक्कांवर गदा आणणारी आहे.” मलालानं थोडा पॉज घेतला. पुन्हा म्हणाली, “अल्लावर माझी अपार श्रद्धा आहे. तो सगळयांचं रक्षण करतो. मुलींना शिकू द्या, एवढीच माझी मागणी आहे. मुलींच्या शाळा बंद करून त्यांचा हक्क आपण हिरावून घेणार आहात काय? मुलींना शिकू द्या, असं सांगणं गुन्हा तर नाही ना! एक कर्तव्य म्हणून मी आपल्या समोर बोलत आहे. अशा अडचणीत, संकटात कसं वागावं, कसं तोंड द्यावं, हे अल्लाच आम्हाला सांगेल. कारण त्यालाच सगळयांची काळजी आहे. या जगात सत्याचा नेहमी विजय होत असतो. असत्याचा पराजय ठरलेला आहे. मला सर्व वडीलधार्यागमंडळींबद्दल कृतज्ञापूर्वक आदर आहे; पण एखादे बुजुर्ग फजलुल्लाहजी आमच्या शिक्षणाच्या स्वप्नाची राखरांगोळी करू पाहत असताना, माझ्यासारख्या एका सामान्य मुलीने त्या विरुद्ध का आवाज उठवू नये? दररोज रात्री अंथरुणावर पडण्यापूर्वी हात जोडून अल्लाची प्रार्थना करते. मला या चांगल्या कामासाठी बळ दे!”
मलालाची मुलाखत जगभरात खळबळ आणि चैतन्याची लाट उठवून गेली.
तालिबान्यांनी स्वातमधील शाळांची मोडतोड वाढवली. बॉम्बस्फोटानं इंग्रजी माध्यमांच्या शाळा उडविल्या जाऊ लागल्या. झियाउद्दीन यांनी सरकारकडं आवाहन केलं - शिक्षणासारख्या पवित्र कामाचा विध्वंस कधी थांबणार आहे. पूर्वी दहशतवादी शाळेची मोडतोड करून निघून जात. आता शाळेतील फर्निचर, मुलांचे बसण्याचे बाक आणि शैक्षणिक साहित्यही लुटून नेलं जाऊ लागलं. पुस्तकं, कॉम्प्युटर आणि खेळाचं सामानं चोरून नेण्यात आलं. वर्षाअखेर चारशेहून अधिक शाळांची नासधूस झाली. निवडणुका होऊन नवं सरकारही आलं. झरदारी अध्यक्ष झाले; पण स्वातमधील शाळांसंबंधी प्रश्नांकडे कोणीही लक्ष द्यायला तयार नव्हतं.
रमझानचे उपवास सुरू झाले. उपवासाच्या दिवसात लोक दिवसभरात अन्नाचा कण आणि पाण्याचा थेंबही घेत नसत. दिवस मावळला की, खाणं आणि पिणं होई. तालिबान्यांनी रमझानचा मुहूर्त बघून विजेचा पुरवठा करणारं पॉवर स्टेशन बॉम्बस्फोटानं उडविलं. शहरावर काळोखाचा अंमल सुरू झाला. काही दिवसांनी शहराला गॅस पुरविणारी

पाइपलाइन उडवून देण्यात आली. पिण्याचं पाण्याचे आणि सांडपाण्याचेही वीजपुरवठा नसल्यानं हाल सुरू झाले. कॉलरा आणि साथीच्या आजारांनी थैमान मांडलं. दवाखान्यांची जत्रा झाली.

फझलुल्लाहाचे सहायक मौलाना शाहदुरान यांनी रेडिओवर फर्मान काढलं, ‘‘मुलींच्या सगळ्या शाळा बंद करा. येत्या पंधरा तारखेची मुदत आहे. नियम न पाळणाऱ्यांना शिक्षा केली जाईल.’’ रेडिओवरची धमकी ऐकून झियाउद्दीनला चिंता वाटू लागली. दिवसेंदिवस परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागली होती आणि नवं सरकार याकडे गांभीर्यानं बघत नव्हतं, हे त्यांचं दु:ख होतं.



शाळेत जाताना मलाला

सकाळी झियाउद्दीन शाळेत निघण्यापूर्वी म्हणाले, ‘‘मौलानांनी पंधरा दिवसांची मुदत दिली आहे. 15 जानेवारी, 2009 पासून मुलींच्या शाळा बंद कराव्यात, अशी धमकी देण्यात आलीय.’’

“आम्हाला शाळेत जायचंय बाबा! शाळेत जाऊ इच्छिणाऱ्या मुलींना ते कसं थांबवू शकणार? तो अधिकार त्यांना कोणी दिला? डोंगर उद्ध्वस्त करण्याच्या बढाया ते मारतात. आतापर्यंत त्यांनी काय महत्त्वाचं काम केलं आहे? नासधूस आणि फोडातोडीचा धाक आहे नुसता.”

मलाला बोलत असताना झियाउद्दीनच्या डोळयांच्या कडा पाणावल्या. जी गोष्ट एवढ्याशा मुलीला कळू शकते, ते या धर्माच्या नावानं धुडगूस घालणाऱ्यांना कळत नाही, ही शोकांतिका आहे.

घरातून बाहेर पडताना ते म्हणाले,

“शेवटी स्वातच्या सामान्य माणसालाच स्वत: विचार करावा लागेल की, त्यांना आपली मुलं शिकवायची आहेत की नाही. ज्यांना शिक्षणाबद्दल प्रेम आहे, त्यांनी जबाबदारीनं शिकवण्यापासून दूर न जाता शेवटपर्यंत हे पवित्र काम हिमतीनं करणं आवश्यक आहे.”

❖ ❖ ❖

# स्वातमधील संघष

"एक पुस्तक आणि पेन हे शक्तिशाली अस्त्र आहे. एक मूल, एक शिक्षक, एक पुस्तक आणि एक लेखणी जग बदलू शकेल."

तालिबान राजवटीनं एकानंतर एक फर्मानं काढून स्वातमधील बिघडलेलं जनजीवन आणखी उद्‌ध्वस्त करायला सुरुवात केली. दया आणि शांततेचा जगाला संदेश देणाऱ्या बौद्ध संस्कृतीची पाळंमुळंच उखडून टाकायचा सपाटा सुरू झाला. या संस्कृतीचे या भागात असलेले वास्तुरूपी अवशेषही नजरेत पडू नयेत असे फर्मान सुटले. महंमद गझनीच्या काळात मुस्लिम राजवटीनं जबरदस्तीनं मुस्लिम धर्मांतराचा हुकूम काढलाच होता; पण बौद्ध संस्कृतीचे अवशेष स्तुपाच्या रूपानं मोनास्टरिजच्या रूपानं शिल्लक होते. या राहिलेल्या वास्तूही डोळयासमोर राहू नये. गीत आणि लोकसंगीतातील संगीत आणि पाठ्यपुस्तकातील इतिहासही भेदून टाकण्याची मोहीम सुरू झाली.

मिंगोराहून अर्ध्या तासाच्या अंतरावरील जहानाबादला एका अखंड खडकामध्ये तेवीस फुटांची बुद्धाची सुंदर मूर्ती कोरलेली होती. निळयाशार आकाशात जगाला दया, क्षमा आणि शांतीचा संदेश देणारी मूर्ती दहशतवाद्यांच्या नजरेत सलू लागली. दरवर्षी जगभरातून हजारो पर्यटक याठिकाणी येत आहेत, ही गोष्टही यामंडळींना आवडत नसावी. तालिबान्यांनी ही मूर्ती तोडण्याचा प्रयत्न केला. खडकाच्या भक्कमपणामुळं मोडतोडीस पुरेसं यश आलं नाही. सातव्या शतकापासून जगाला बंधुभावाचा संदेश देणारा हा गौतमबुद्धांचा तेजस्वी चेहरा शांततेचं प्रतीक म्हणून उभा होता.

8 ऑक्टोबर, 2007 रोजी मूर्तीच्या चेहऱ्यावर यंत्रानं छिद्रं पाडली. त्यात खडक फोडण्याचे तोटे बसवून स्फोट घडवून आणला आणि स्वात खोऱ्यातील गौतमबुद्धाची उरलीसुरली निशाणी पुसून टाकली. जे जे जुनं, सुंदर आणि मौल्यवान आहे त्याचा नाश करणे, हेच त्यांचं ध्येय बनू लागलं.

संगीत आणि कला मानवी आविष्काराची रूपं आहेत; पण तालिबान्यांना ते धर्माविरुद्धचं कृत्य वाटू लागल्यानं, यावर बंदी घातली गेली. कला, संस्कृती आणि वैभवशाली इतिहासाची सोनेरी पानेच तालिबान्यांनी तोडून टाकली. टीव्ही चॅनलही बंद केले. मुलांनी कॅरम बोर्डवर खेळू नये, असं फर्मान निघालं. पोलीस चौक्यांवर तालिबानी हल्ला सुरू केला गेला. एक-एक पोलीसचौकी ताब्यात घेण्यात यायला लागली. तालिबान गावात शिरले की, मेगाफोनवर फर्मान जाहीर करत. त्या आवाजाने पोलीस घाबरून चौक्या सोडू लागले. काही दिवसात एकोणसाठ गावांवर तालिबान्यांची समांतर हुकूमत सुरू झाली. ताब्यात आलेल्या गावात फझलुल्लाच्या TNSM चे काळे पांढरे झेंडे फडकू लागले.

हे घडत असताना मनातून घाबरलेली प्रजा आणखी पुढे काय वाढून ठेवलंय, या चिंतेत होती. सरकार आणि इथले रहिवासी यावर काहीही करताना दिसत नव्हते. झियाउद्दीन मात्र या अनाचारानं अस्वस्थ होते. फझलुल्लाला कसा विरोध करावा सुचत नव्हते. फझलुल्लाच्या गावचे लोकही या तालिबानी हुकूमशाहीनं बेजार होते. गावातील एकानं झियाउद्दीनला तालिबान केंद्र असलेल्या शाळेत भाषण द्यायला बोलावलं. नदीपलीकडच्या गावी जायला पूल नव्हता. नदीवर तारेचा मोठा दोर टांगलेला होता.

त्यावर पत्र्याचा पाळणा लटकत होता. त्यात बसून पलीकडे जावं लागे. झियाउद्दीन नदी पार करून त्या गावाजवळ आले. गावातून काळयाशार धुरांचे लोट आकाशाकडे चालले होते. ते काय असेल? हा विचार करत जवळ आले. गावाच्या चौकात, टीव्ही, कॉम्प्युटरची होळी पेटविलेली होती. आजूबाजूला काळया दाढी अन् पटक्यातील हत्यारबंद माणसं उभी होती.

झियाउद्दीन शाळेत आले. जमलेल्या माणसांसमोर भाषणात म्हणाले, ‘‘जळणाऱ्या वस्तू या आमच्या देशाची संपत्ती आहे. ती जाळल्यानं काय होणार? माणसं पुन्हा त्या विकत घेतील. यातून या उत्पादन करणाऱ्या परक्या देशाचा धंदा वाढणार. नफ्यात वाढ होणार. याचा आपण शांतपणे विचार करणार आहोत की नाही?’’

एक म्हातारा जवळ आला. झियाउद्दीनच्या कानात पुटपुटला, ‘‘बेटा, इथं असं काही बोलू नकोस. त्या वेड्या आगीशी कशाला खेळतोस?’’ त्या वडीलधाऱ्याचं म्हणणं ऐकून त्यांना वाईट वाटलं; पण ते सांगत होते तेही खरं होतं.

उन्मादाचं वारं नाकात शिरलेल्या तालिबान्यांनी आता आपला मोर्चा इस्लामाबादकडे वळविला. सुस्तावलेल्या राजधानीत असं काही ते करतील असं सरकारला वाटत नसावं. इस्लामाबादच्या मध्यभागी लाल मशीद होती. इथे दोन मदरसा होत्या. एक मुलींची आणि दुसरी मुलांची. अफगाणिस्तान आणि काश्मिरात लढाईसाठी आत्मघाती स्वयंसेवक तयार करण्याचं काम इथं केलं जाई. येथील मुस्लिम शाळेच्या मुली हातात काठ्या घेऊन रस्त्यावर उतरल्या आणि इस्लामाबादमधील सी.डी., डीव्हीडी, संगीत सामानाच्या दुकानावर हल्ला सुरू केला. पाकिस्तानच्या राजधानीत मुस्लिम तालिबान्यांच्या उन्मादाच्या दर्शनानं जनतेत भीती निर्माण केली. मसाज सेंटरं बंद पाडली. शरीर विक्री करणाऱ्या वेश्यांची दुकानं बंद केली. लाल मशिदीच्या प्रमुखानं समांतर कोर्टही सुरू केलं. मुस्लिम कायद्याच्या आधारानं ते निकाल देऊ लागले.

मिंगोरा चौकात आज काय बघायला मिळतं, अशी धडकी राहणाऱ्यांच्या मनात भरली. तालिबानी रात्री एखाद्याचा खून करत. ते प्रेत रात्रीच चौकात झाडाला टांगलं जाई. प्रेताला एक मोठा कागद टांगलेला असे. त्यावर ठळक अक्षरात लिहिलेलं असे. ‘‘सैन्याला मदत करता का! फितुरासाठी हे घ्या बक्षीस! अकरा वाजेपर्यंत या प्रेताला हात लावू नका, नाही तर तुमचाही नंबर लागेल, अशी उघड धमकी यात दिलेली असे.

हे सगळं बघून शाळेत जाणारे झियाउद्दीन अल्लाला म्हणायचे, ‘‘भूकंपानं माणसं मारली गेली, उरलेल्यांना ही मंडळी सोडत नाहीत. काय गुन्हा आहे या निरपराध गरिबांचा?’’ दररोज एक-एक भयंकर घटना बघायला मिळत होती. टी.व्ही.वर ऐकायला मिळायची. एकेकाळी सूफी संतांच्या या भूमीत संगीताच्या सुरांनी मरगळलेल्या मनास चैतन्याची फुंकर मिळायची. तेही बंद करण्यात आले. गावात जलशाची काही ठिकाणं होती. आपापली आदब सांभाळून पोटाची खळगी भरण्यासाठी गाणं आणि नाच करणाऱ्या कोठ्या होत्या. तालिबानचा हुकूम झुगारून लपूनछपून त्या मनोरंजनाचं काम करत होत्या. ही गोष्ट लपली नाही. तालिबानी अड्ड्यावर आले. रंगात आलेल्या मैफिलीतील कलावंतिणीच्या गळयाला बंदूक रोखली. ती जिवाच्या आकांतानं ओरडू लागली. ‘‘माझी चुकी झाली. पुन्हा करणार नाही. अल्लाच्या नावानं मला मारू नका.’’ पुढचे शब्द ऐकू

येण्याआधीच गोळी सुटली. मिंगोरा कलावंतिणीच्या खुनाची बातमी गावात पसरायला वेळ लागला नाही.
मुशर्रफ सरकारसाठी ही बेअब्रूची स्थिती निर्माण झाली. सरकारने सैन्याला कारवाई करण्याचे आदेश दिले. तोफा आणि रणगाड्यानं लाल चौकात तुंबळ लढाई जुंपली. पाकिस्तानच्या राजधानातीत हे घडत होतं. इस्लाम धर्माच्या प्रार्थनेची पवित्र जागा मशिदीत; पण शांततेसाठी इथं रक्ताचे पाट वाहून तालिबानाविरुद्धची लढाई काही काळ थांबली. काही आतंकवादी मारले गेले. शेकडो नागरिक जखमी झाले. स्वातच्या फझलुल्लानं मात्र एवढ्यावरही आगीत तेल ओतण्याचं काम केलं. आपल्या एफ. एम. रेडिओवर ते गरजले, 'ओसामा बिन लादेनचे साथीदार, लाल मशिदीमधील आमचे मदरसा प्रमुख अब्दुल रशीद यांचा खातमा पाकिस्तानी सैन्यानं केला. आमची लढाई आता पाकिस्तान सरकारविरुद्ध सुरू झाली आहे.'
या चिथावणीनं तालिबान आणि पाकिस्तानी सैन्यात चकमकी सुरू झाल्या. स्वातकडे निघालेल्या सैनिकी तुकडीवर तालिबान्यांनी हल्ला केला. यात काही सैनिक शहीद झाले. याच सुमारास परदेशात वनवासात असलेल्या बेनझीर भुत्तो पाकिस्तानात परतल्या. अस्थिर आणि गोंधळलेल्या पाकिस्तानच्या स्थितीत त्या बदल घडवून आणतील या आशेनं त्यांचं जंगी स्वागत झालं. काही मंडळींना मात्र त्यांचं मायदेशी परतणं आवडलं नव्हतं.
स्वातमधील फझलुल्लानं सरकारला धमकी दिली होती. याचा परिणाम काही दिवसांत दिसू लागला. पाकिस्तानी सैन्य स्वातमध्ये पोहोचले. जीप गाड्या, रणगाडे आणि हेलिकॉप्टरच्या आवाजानं खुशाल पब्लिक स्कूलच्या मुलांना आनंद झाला. मलाला हेलिकॉप्टरकडे बघून विचार करू लागली. हे थांबलं पाहिजे; पण दोन्हीबाजूचे सैनिक हे ऐकत नाहीत. सैन्याच्या आगमनाबरोबर मिंगोरा शहरात संचारबंदी जाहीर झाली. हा अनुभव आतापर्यंत इथल्या माणसांना नव्हता. कर्फ्यूमुळं शाळा बंद झाल्या. घराबाहेर पडणं थांबलं. टी.व्ही. वर सैनिकी कारवायांच्या बातम्या येऊ लागल्या. मिंगोरा बाहेर आजूबाजूच्या डोंगरात लढाई सुरू झाली.


मिंगोरा शहरातील संचारबंदी

नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात आणखी दहा हजार सैनिकांनी स्वातमध्ये ऑपरेशन सुरू केलं. ज्या फझलुल्लानं पाकिस्तान सरकारला रेडिओवरून जाहीर आव्हान दिलं होतं, त्याविरुद्धची कारवाई जनरल मुशर्रफ यांनी तीक्र केली. सैन्य आणि पोलिसांनी फझलुल्लाहला अटक करण्यासाठी घेराव घातला; पण दैवानं त्याला साथ दिली. ऐनवेळेस वाळवंटातलं तुफान सुरू झालं आणि या संधीचा फायदा घेऊन फझलुल्लाह सटकला. कडवी धार्मिक मंडळी म्हणू लागली, अल्लाची किमया आहे. तोच त्यांचा पाठीराखा आहे. पाकिस्तानी सैनिकांनी स्वात खोऱ्यात तालिबान्यांची पुन्हा नाकेबंदी केली. आत्मघाती

तालिबानी बॉम्ब सैन्यावर तुटून पडू लागले. सैनिकी छावण्यांवर हल्ले होऊ लागले आणि सैनिक डोंगरदऱ्यात लपून बसलेल्या तालिबान्यांना हुडकून काढून ठार करू लागले. पहिल्या टप्प्यात एकशेतीस दहशतवादी टिपले गेले. अशाही स्थितीत तालिबान्यांनी मद्यन शहरावर ताबा मिळविला. अधिक सैनिकांची कुमक मदतीला आल्यानं सैनिकांनी कारवाई तीव्र केली. सैनिकांची सरशी होत गेली. तालिबान्यांच्या ताब्यातील पोलीस ठाणे, सैनिकी चौक्या सोडून तालिबानी आजूबाजूच्या दऱ्याखोऱ्यांत पळाले. सैनिकांनी एफएम स्टेशन बंद केले. दोन प्रमुख तालिबान नेते मारले गेल्यानं स्वातमधून दहशतवाद्यांनी काढता पाय घेतला. मौलाना फझलुल्लाहचं एक टीव्ही चॅनलही सैनिकांनी बंद केलं.

5 डिसेंबरला मट्टा, 20डिसेंबरला बाजारखेडा आणि फझलुल्लाहच्या डेहरी ही तालिबान्याची केंद्रं सैनिकांनी ताब्यात घेतली. या स्वातच्या पहिल्या लढाईत सैनिकांना हवाईदलाचीही प्रथमच मदत घ्यावी लागली.

पाकिस्तानात निवडणुका जाहीर झाल्या. पाकिस्तानात परतलेल्या बेनझीर भुत्तो यांनी देशभर प्रवास सुरू केला. पाकिस्तानी जनता प्रचंड गर्दीनं त्यांचं स्वागत करू लागली. पाकिस्तानातला असंतोष दूर करण्याचं काम त्या करतील, असं जनतेला वाटू लागलं. बेनझीर भुत्तोंची रावळपिंडीत मोठी सभा होती. लियाकत बागेत हजारो माणसं जमा झाली होती. आपल्या बांधवांना आवाहन करताना बेनझीर म्हणाल्या, ‘‘बंधू आणि भगिनींनो, तुमची मतं ही जगातली मोठी शक्ती आहे. जगभरातील लोकशाही प्रशासनात जनता त्याचा योग्य उपयोग करते. मला खात्री आहे, आपल्या देशातील अतिरेकी आणि दहशतवादी विचारांचा आणि कृतींचा पराभव जनतेची शक्तीच मतदानाच्या माध्यमातून करू शकेल. ते आपलं प्रभावी हत्यार आहे. आपण जबाबदारीनं त्याचा उपयोग केला पाहिजे.’’ त्यांच्या या आवाहनास हजारो उपस्थितांनी हात उंचावून प्रतिसाद दिला.

सभा संपली. बेनझीर गाडीकडं निघाल्या. बुलेटप्रूफ टोयाटो, लँड क्रुझर गाडीत त्या चढल्या. गाडी सुरू झाली. जमलेल्या जनसमुदायास अभिवादन करावं म्हणून त्या गाडीत उभ्या राहिल्या. लँड क्रुझरचा वरचा भाग उघडण्याची सोय होती. त्या आजूबाजूला बघून हात हलविणार तोच स्फोट आणि गोळीबारांचा आवाज घुमला. त्यांच्या गाडी शेजारी आत्मघाती बॉम्बस्फोट झाला. बंदुकीच्या गोळीनं निशाणी साधली होती. मलाला आणि तिच्या कुटुंबानं टीव्हीवर बातमी ऐकताच घरात कल्लोळ उडाला. बेनझीर लोकशाहीची स्वप्नं पहा, असं लोकांना सांगत होती तिचाच असा अंत व्हावा, ही भयानक घटना घडली होती.

बीबीसीच्या उर्दू वाहिनीचे प्रमुख आमेर अहमद खान आणि त्यांचे साथीदार स्वातमधील तालिबान्यांच्या वाढत्या अत्याचाराबद्दल चर्चा करत होते. सर्वसामान्य जनता जेरीस आली होती; पण याविरुद्ध तोंड उघडण्याची कोणाचीही हिम्मत नव्हती. अहमद खान यांना पेशावरचे प्रतिनिधी अब्दुल शई काकर यांची आठवण झाली. आमेर यांनी अब्दुल यांचे नाव सुचविले. मिंगोराच्या स्थानिक शिक्षकांची भेट घ्या. तालिबान्यांनी मुलींच्या शाळा बंद केल्या, याबद्दल एखाद्या मुलीने आपले अनुभव डायरीच्या रूपाने लिहावे. तिचे नाव आपण उघड करणार नाही. टोपण नावाने बीबीसीवर ती डायरी प्रसिद्ध करू. अब्दुल

यांना कल्पना आवडली. मिंगोरा येथील झियाउद्दीन युसूफझाई यांना ते ओळखत होते. ते स्वातमधील महत्त्वाचे कवी, शिक्षण क्षेत्रात जबाबदारीनं काम करणारे संस्थाप्रमुखही होते. अब्दुल झियाउद्दीन यांना भेटले. कामाचे स्वरूप सांगितले.
झियाउद्दीन यांना ती कल्पना आवडली. एका महिला शिक्षकाच्या मदतीनं एखादी मुलगी डायरी लिहू शकेल काय? या डायरीत मानवतेचा भाग यावा. मॅडम मरियमची लहान बहीण आयेशा या कामासाठी तयार झाली; पण तिच्या वडिलांनी या कामातील धोका ओळखून ऐनवेळेस नकार दिला. ही चर्चा मलाला ऐकत होती. हिमतीनं पुढं येऊन तिने विचारले,
"मी चालणार नाही काय? आजूबाजूला काय सुरू आहे, हे मी आपल्या बांधवांना सांगू इच्छिते. इस्लामने आम्हाला शिकण्याचा हक्क दिला आहे. कुराण सांगते, खूप अभ्यास करा, ज्ञान मिळवा आणि अद्‍भुत जग समजून घ्या."
मलालाचं बोलणं ऐकून वडिलांना आनंद झाला.
झियाउद्दीनचा होकार मिळताच मलालाला खूप आनंद झाला. नव्या नव्या गोष्टी शिकणं, त्यांचा अनुभव घेणं तिला आवडायचं. टी. व्ही. वर पहिली मुलाखत देणं, नाटिकेत भाग घेणं, गाणं म्हणण्याचा पहिला अनुभव तिनं कुतूहल आणि नंतर मिळालेल्या आनंदानं आठवणीत जपला होता. ती उत्तम भाषण करायची. अभ्यासातही वर्गात अग्रेसर होती; पण आता बीबीसीसाठी डायरी लिहायची होती. डायरी लेखनाचा अनुभव नव्हता. शाळेत निबंध लिहिण्याचा सराव होता. शाळेच्या सहलीत ती सर्व मैत्रिणीसमवेत डोंगरातील धबधबा बघायला गेली होती. तो अनुभवही तिने लिहिला होता. आता डायरी लिहायची. डायरी म्हणजे रोज घडणाऱ्या घटना, असे बाबांनी सांगितले. सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत कितीतरी घटना घडत असतात. त्या सगळयाच लिहिल्या तर वहीची पानं पुरणार नाहीत. नेमक्या शब्दात आणि पंधरा-वीस ओळीत लिहावं लागेल, असे वडील म्हणाले.
दुसऱ्या दिवशी झियाउद्दीन यांनी मलालाला बोलावले.
"बी.बी.सी. चे पेशावरहून अब्दुल शई काकर तुझ्याशी बोलणार आहेत. तू लिहावयाच्या डायरीसंबंधी थोडी माहिती देणार आहेस." अब्दुल पश्तुनी होते. झियाउद्दीन यांनी त्यांना फोन लावला. अब्दुल यांनी मलालाशी मोकळया गप्पा सुरू केल्या. ते म्हणाले, "एखाद्या मित्राशी किंवा मैत्रिणीशी तू जशी बोलते, एखादी घटना सांगत असते, तसं आपण बोलू. तू गेले काही दिवस जे जे बघितलं, त्यामुळे तुझ्या मनात जे विचार आले ते शब्दात मांडायचे. खूप वर्षांपूर्वी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात तेरा वर्षांच्या अॅन फ्रँक या ज्यू मुलीनं डायरी लिहिली होती. ती अॅमस्टरडॅम इथं राहत होती. नाझीच्या अनेक निरपराध माणसांना तुरुंगात टाकून खूप छळ करण्यात आला होता. अॅनाने जे बघितलं, अनुभवलं ते ती लिहीत गेली. तिची डायरी खूप पॉवरफूल ठरली. हे तुला सहज उदाहरण म्हणून सांगितलं.
"आपण उद्यापासून फोनवर बोलू. मी तुझ्या आईच्या फोनवर बोलत जाईन. यासाठी मी माझ्या पत्नीचा फोन वापरणार आहे. कारण तालिबानींचे हेर माझ्या फोन संभाषणाच्या मार्गावर असतात. याकरिता आपण काळजी घेऊ. ही डायरी तुझ्या नावानं प्रकाशित करणं धोक्याचं आहे. त्यामुळं गुल मकाई या टोपण नावानं प्रसिद्ध करू. गुल मकाई म्हणजे

मक्याचं फूल. तू मजकूर लिहून बाबांकडे दे. ते स्कॅन करून माझ्याकडं पाठवतील.''
अब्दुल काकर यांच्याशी बोलल्यानंतर मलालाच्या अंगात जणू उत्साह संचारला. गुल मकाई नाव छान होतं. तिचे बाबा म्हणाले, ''तुला गुल मकाईची गोष्ट आठवते का बेटा! गुल मकाई आणि मुसा खान स्वात जंगलात मुक्तपणे वाढलेली मुलं होती. शाळेत त्यांचं एक दुसऱ्यावर प्रेम जडलं; पण जात आडवी आली. यांच्या लग्नाच्या प्रश्नांमुळं दोन जमातीत घमासान लढाई होते; पण ही गुल मकाई धीटपणे उभी राहून लढणाऱ्यांना सांगते, 'माझ्या मोठ्या भावाबहिणींनो, कुराण काय सांगते? कुराणाची शिकवण विसरून आम्ही भांडत आहोत. कुराण सांगते लढणं वाईट आहे. तिच बोलणं ऐकून लढणाऱ्या दोन्ही जमातींनी लढाई थांबविली. गुल मकाई आणि मुसा खानचे लग्न थाटामाटात संपन्न झाले.



डायरी लिहिताना मलाला

मलालाला गुल मकाईनं प्रेरणा दिली. ती लिहिणार असलेल्या डायरीचं पात्र बनली. मलालानं वही उघडली. एक-एक शब्द अंत:करणातील कळवळयानं कागदावर पाझरू लागले. एक पानभर लिहून झालेला उर्दू मजकूर बाबांना वाचायला दिला. तो वाचून झियाउद्दीनच्या चेहऱ्यावर समाधान पसरले. त्यांनी तो मजकूर बीबीसीच्या प्रतिनिधीकडे दिला. तो स्कॅन करून अब्दुल काकरकडे पाठविण्यात आला.
त्या रात्री मलालाला शांत झोप लागली.
सकाळी उठल्यानंतर तिने उत्साहाने वही घेतली आणि ती पुन्हा डायरी लिहू लागली. हा सिलसिला सुरू झाला.
3 जानेवारी, 2009 ला शनिवारी बीबीसीच्या उर्दू वाहिनीवर गुल मकाईच्या डायरीचा पहिला भाग प्रक्षेपित झाला.

❖ ❖ ❖

# मलालाची
# टोपणनावानं डायरी

"मुलींच्या शिक्षणाला विरोध करणार्यांच्या विरोधात माझा लढा आहे."
उपाख्यान :1 शनिवार, 3 जानेवारी, 2009
मला भीती वाटत आहे...
रात्री मला भयानक थरकाप उडविणारं स्वप्न पडलं. तालिबान आणि सैनिकी हेलिकॉप्टर दिसू लागले. स्वातमध्ये सैनिकी कारवाई झाल्यापासून अशी स्वप्नं सारखी पडत आहेत. माझ्या आईनं मला न्याहारी दिली आणि मी शाळेकडे निघाले. मला शाळेत जाताना भीती वाटत होती. तालिबान्यांनी मुलींनी शाळेत जायचं नाही, असं फर्मान काढलं होतं, हे त्याचं कारण होतं.
वर्गातील सत्तावीस विद्यार्थिनींपैकी केवळ सात जणी हजर होत्या. तालिबानच्या भीतीच्या फर्मानांनी मुलींची संख्या रोडावली होती. यामुळेच माझ्या तीन मैत्रिणींनी पेशावर, लाहोर आणि रावळपिंडी येथे त्यांच्या कुटुंबासह स्थलांतर केले आहे.
शाळेतून मी घराकडे चालले असताना, "मी तुला ठार करेन, एका माणसाचे शब्द माझ्या कानावर पडले. मी चालण्याची गती वाढवली. थोडं अंतर चालल्या नंतर मागं वळून पाहिलं. तो माणूस माझा पाठलाग तर करत नाही ना, अशी मनात भीती दडून होती; पण तो आपल्या फोनवर बोलताना बघून मी सुस्कारा सोडला; पण माझ्या लक्षात आले, तो फोनवरून कोणाला तरी धमकावत होता.
□
उपाख्यान : **2** रविवार, **4** जानेवारी, **2009**
मला शाळेत जायचं
आज सुटी आहे. त्यामुळे मी उशिरा उठले. दहाच्या आसपासची वेळ. 'ग्रीन चौकात तीन प्रेतं पडली आहेत,' माझ्या वडिलांचं बोलणं ऐकू आलं. ही बातमी ऐकून मला वाईट वाटलं. सैनिकी कारवाईपूर्वी दर रविवारी आम्ही मार्घाझार, फिझा आणि कांजू इथं सहलीसाठी जायचो; पण गेल्या दीड वर्षांत इथली परिस्थिती हाताबाहेर गेल्याने सहलीसाठी बाहेर पडता आले नाही.
सायंकाळच्या खाण्यानंतर आम्ही शतपावलीसाठी घराबाहेर पडत असू; पण आता सूर्यास्ताअगोदर घराकडे परतू लागलो. आज मी माझी घरातली छोटी-मोठी कामं केली. गृहपाठानंतर भावाबरोबर थोडं खेळले; पण माझ्या मनात अस्वस्थता सुरूच होती. हृदयातील ठोक्यांची धडधड वाढली होती. मला उद्या शाळेत गेलं पाहिजे.
□
उपाख्यान : **3** सोमवार, **5** जानेवारी, **2009**
रंगीबेरंगी कपडे वापरायचे नाहीत
शाळेत जायची माझी तयारी सुरू होती. शाळेचा गणवेश बाहेर काढला. गणवेश चढवणार तोच शाळेच्या प्राचार्यांची सूचना लक्षात आली. ते म्हणाले होते, "शाळेचा गणवेश घालून येऊ नका. साधे कपडे घालून शाळेत या." यामुळे मी माझा आवडीचा

गुलाबी ड्रेस घालायचं ठरविलं. आमच्या शाळेतील इतर मुलीही रंगीबेरंगी कपडे घालून आल्या. यातून घरगुतीपणा आढळून येत होता.

शाळेत माझी एक मैत्रीण माझ्याजवळ आली. काळजीच्या स्वरात तिनं विचारलं, “देवाला स्मरून प्रामाणिकपणे सांग मलाला! तालिबान आपल्या शाळेवर हल्ला करणार आहेत काय? प्रार्थनेच्यावेळी आम्हाला सांगण्यात आलं. रंगीबेरंगी कपडे घालून शाळेत यायचं नाही. तालिबानी याबद्दल आक्षेप घेतील.

मी शाळेतून परतले. दुपारच्या जेवणानंतर शिकवणीचा तास झाला. सायंकाळी टी. व्ही. चे बटण ऑन केले. शकरदरातील पंधरा दिवसांपासूनची संचारबंदी उठवली गेली आहे, बातमी ऐकून मला आनंद झाला. आमच्या इंग्रजीच्या शिक्षिका त्या भागात राहत होत्या. संचारबंदी उठल्यामुळे आता त्या शाळेत येऊ शकतील.

□

उपाख्यान **: 4** मंगळवार**, 6** जानेवारी**, 2009**

गोळीबार संपला आणि भीती पळाली

मोहरमची सुटी लागल्यानं मी बुनैरला आले होते. हिरव्यागार गवतांच्या चादरी पसरलेली मैदानं आणि डोंगरांच्या रांगा मला खुणावत होत्या. आमचं स्वात खोरं अतिसुंदर आहे; पण आता इथं शांततेचा अभाव आहे. बुनैरला मात्र शांतता आणि चिरस्थितता आहे. इथं भीतीचा मागमूसही नाही आणि गोळीबारांचा आवाजही कानी पडत नाही.

आज आम्ही पीरबाबांच्या दर्शनाला गेलो. तिथं खूप गर्दी होती. दर्शनासाठी लांबलांबून माणसं आली होती. आम्ही मात्र सहलीच्या आनंदासाठी आलो होतो. बांगड्या, कानातील डुलं, गळयातील माळा आणि कृत्रिम दागिन्यांची दुकानं रस्त्याकडेला थाटण्यात आली होती. काहीतरी खरेदी करावं, माझ्या मनात विचार आला. बघते तर एकही वस्तू मनात भरली नाही. आईनं मात्र बांगड्या आणि कानातले खरेदी केले.

□

उपाख्यान **: 5** शुक्रवार**, 9** जानेवारी**, 2009**

मौलाना रजेवर जातात**?**

शाळेत मुलींना मी आमच्या बुनैरच्या सहलीचा वृत्तांत ऐकविला. त्या म्हणाल्या, ‘आम्हाला बरं वाटत नाही आणि बुनैरच्या त्याच त्याच गोष्टी ऐकून अगदी कंटाळा आलाय.’

‘मौलाना शाह हारून यांचा मृत्यू झाला.’ एक मैत्रीण म्हणाली. दुसरी म्हणाली, ‘ती अफवाच असावी. मौलाना एफ. एम. रेडिओवर भाषणं द्यायचे.” मुलींना शाळेत पाठवू नका, असं सांगणाऱ्यांपैकी ते एक होते.

काही मुली म्हणाल्या, “त्यांचा मृत्यू झाला आहे.” तर काही म्हणाल्या, “ती अफवा आहे.” गेल्या रात्री एफ. एम. रेडिओवर त्यांचे भाषण ऐकायला आले नाही, त्यामुळे त्यांच्या मृत्यूची अफवा पसरली होती. एक मुलगी म्हणाली, ते रजेवर गेले आहेत.

शुक्रवारी शिकवणीचा तास नसल्याने दुपारनंतरचा पूर्णवेळ मी खेळात रमले. सायंकाळी टी. व्ही. चे बटण सुरू केले. लाहोरला बॉम्बस्फोट झाल्याची बातमी झळकली. मी मनाशी

पुटपुटले, ‘हे स्फोट पाकिस्तानात का घडत आहेत?’’
□
उपाख्यान : **6** बुधवार, **14** जानेवारी, **2009**
कदाचित मी पुन्हा शाळेत जाऊ शकणार नाही
शाळेत जाताना माझी मन:स्थिती ठीक नव्हती. उद्यापासून हिवाळ्याची सुटी लागणार आहे. प्राचार्यांनी सुट्या सुरू होत असल्याचे जाहीर केले; सुटीनंतर पुन्हा शाळा कधी सुरू होणार हे सांगितले नव्हते. पहिल्यांदाच असं घडलं होतं.
यापूर्वी शाळा सुरू होण्याची तारीख सुट्टीच्या दिवशी स्पष्ट सांगितली जाई. शाळा सुरू होण्याची तारीख न सांगण्याचे कारणही प्राचार्यांनी सांगितले नाही. माझा तर्क आहे की, तालिबान्यांनी 15 जानेवारीपासून मुलींच्या शाळा बंद करण्याचा फतवा काढल्यानं असं घडलं असावं.
यावेळी मुलींना सुट्टीचा मुळीच उत्साह वाटत नव्हता. त्यांना माहीत होतं, तालिबान्यांनी आपल्या हुकुमाची अंमलबजावणी केली तर त्यांना पुन्हा शाळेत येणं शक्यच नव्हतं. काही मुली मात्र आशावादी होत्या. त्यांना वाटायचं, कदाचित फेब्रुवारीमध्ये शाळा सुरू होईल. काही मुली सांगू लागल्या, ‘आमच्या आई-बाबांनी स्वात सोडून इतरत्र शिक्षणासाठी जायचं ठरवलं आहे.’’
आज आमच्या शाळेचा शेवटचा दिवस असल्यानं आम्ही मैदानावर अधिक वेळ खेळायचं ठरवलं. मला मात्र मनातून वाटत होतं शाळा पुन्हा उघडतील. शाळेतून घरी परतताना मी त्या इमारतीकडं बघू लागले, जणू मला पुन्हा इथं यायला मिळणारच नाही.
□
उपाख्यान : **7** गुरुवार, **15** जानेवारी, **2009**
रात्रभर सैन्यांच्या गोळीबारांचा आवाज
रात्रभर सैन्यांच्या गोळीबारांचा आवाज कानावर येत होता. झोपमोडीने मी तीनदा जागी झाले. शाळाच नसल्यानं तशीच पडून राहिले. सकाळी दहानंतर उठले. काही वेळांनी मैत्रिणी आल्या. आम्ही गृहपाठांची चर्चा केली.
आज 15 जानेवारीचा दिवस. तालिबानाच्या हुकुमाची अंमलबजावणी आज सुरू झाली. आम्ही मैत्रिणी गृहपाठाबद्दल बोलत होतो. जणू बाहेर काहीच घडलं नाही असं आमचं सुरू होतं.
बीबीसी उर्दूवर प्रकाशित होणारी डायरी मी आजसुद्धा वर्तमानपत्रात वाचली. माझं गुल मकाई हे टोपणनाव आईला आवडलं. आई वडिलांना म्हणाली, ‘‘हिचे नाव गुल मकाई ठेवायला काय हरकत आहे?’’
मलाही हे नाव आवडलं होतं. माझं खरं नाव (मलाला) म्हणजे दु:खी असंच आहे ना! त्या शोकमग्न नावापेक्षा गुल मकाई चांगलं.
बाबा म्हणाले, ‘एक जण डायरीचं कात्रण दाखवत म्हणाला, काय अद्‌भुत आहे!’ ते हसले; पण आपल्या मुलीनं ते लिहिलं आहे हे सांगण्याचा त्यांना धीर झाला नाही.
□
उपाख्यान : **8** रविवार, **18** जानेवारी, **2009**

ज्यांनी रक्षण करायचं त्यांचाच पत्ता नाही

आज बाबा म्हणाले, सरकार आपल्या शाळांना संरक्षण पुरविल. आम्ही या संदर्भात पंतप्रधानांशीसुद्धा चर्चा केली आहे. हे ऐकून मला आनंद झाला; पण पुन्हा मनात विचार आला. या वरवरच्या मलमपट्टीनं प्रश्न सुटणार आहेत काय? स्वातमध्ये रोज कानावर बातम्या येतात. या ठिकाणी सैनिकांचा खातमा झाला आहे. इतक्या-इतक्या सैनिकांना पळवून नेलंय. जनतेचे आधार असणारे पोलीस आजकाल शहरात कुठेच दिसत नाहीत. या परिस्थितीने आमचे आई-बाबाही अस्वस्थ आहेत. मनातून घाबरलेले आहेत. जोपर्यंत तालिबान एफ.एम. चॅनलवर मुलींना शाळेत पाठवायला आता बंदी नाही, असे जाहीर होत नाही, तोपर्यंत आम्हाला शाळेत पाठवायला ते तयार नाहीत.

आज आमच्या शिक्षणात खंड पडलाय. यास सैन्यच मुख्यत: जबाबदार आहे. आमच्या गल्लीतला एक मुलगा शाळेत गेला होता. त्याला शिक्षकच म्हणाले, “तू घरी जा. लवकरच कर्फ्यू लागणार आहे.” तो घरी परतला; पण त्याला नंतर कळलं की, कर्फ्यू लागणारच नव्हता. शाळेसमोरच्या रस्त्यानं सैन्याची पलटण जाणार असल्यानं शाळेला सुट्टी देण्यात आली.

□

उपाख्यान **: 9** सोमवार**, 19** जानेवारी**, 2009**

बिचाऱ्या शाळेच्या इमारतींना ही शिक्षा का**?**

आणखी पाच शाळा आज बॉम्बस्फोटानं उडविण्यात आल्या. एक तर आमच्या घराजवळची आहे. हे ऐकून तर माझी वाचाच बंद झाली. या शाळा अगोदरच बंद होत्या. मग त्या का उडविल्या गेल्या? माझ्या मनात प्रश्न निर्माण झाला. तालिबाननं हुकूम काढल्यानंतर कोणीही शाळेत आलं नव्हतं. ही माणसं या शाळेच्या इमारतींना का शिक्षा करत आहेत?

आज मी एका मैत्रिणीला भेटायला गेले. तिने सांगितले, “मौलाना शाह दुरानच्या काकांची काही दिवसांपूर्वी हत्या झाली आहे.” मला वाटलं, या घटनेचा राग मनात धरून तालिबानी शाळा जाळत आहेत. तालिबान्यांनी आणखी कोणी दिलेल्या त्रासाचा राग ते या शाळेच्या इमारतींवर काढत आहेत.

याबद्दल आमचे सैनिकही काहीच करत नाहीत. डोंगर-दऱ्यातील आपापल्या बंकरमध्ये सुरक्षित बसून आहेत. ते काय करतात? बकऱ्या कापतात आणि त्या खाताना आनंद घेतात?

□

उपाख्यान **: 10** गुरुवार**, 22** जानेवारी**, 2009**

जेथे तालिबान आहे तेथे सैन्याचा पत्ताही नाही

शाळा बंद आहेत. घरात बसूनबसून कंटाळा आलाय. माझ्या काही मैत्रिणी स्वात सोडून बाहेर गेल्या आहेत. आमच्या इथली एकूण परिस्थिती अगदीच वाईट आहे. घराबाहेर पडण्याची हिम्मत होत नाही. रात्रीबेरात्री मौलाना शाह दुरानीच्या एफ. एम. रेडिओवरून धमक्या सुरूच आहेत. मुलींनी घराबाहेर पडायचं नाही. तालिबानविरुद्ध सैन्य लढत आहे. या कामास काही शाळा मदत करतात; अशा शाळा आम्ही उडवून देऊ.

बाबा आज म्हणाले, हाजीबाबा येथे मुलांच्या आणि मुलींच्या हायस्कूलमध्ये सैन्य आलं आहे. मौलाना शाह दुरानी यांनी भाषणात सांगितलं. ‘‘तीन चोर तालिबान्यांनी पकडले आहेत. या चोरांना जाहीरपणे भर चौकात फटके मारले जाणार आहेत. कोणाला हे बघायचं असल्यास तिथं या.’’

हे ऐकून मला धक्का बसला. आश्चर्य याचं वाटलं, आमच्यावर एवढा अत्याचार होत असताना लोक हा क्रूर तमाशा बघायला का जातात? तालिबानच्या या कृत्यांना सैन्य आळा का घालत नाही? शोकांतिका ही आहे की, जिथे सैन्य आहे तिथे जवळपास तालिबानीही असतात; पण जिथं तालिबानी आहेत तिथं मात्र सैन्याचा मागमूसही नसतो.

□

उपाख्यान : **11** शनिवार**, 24** जानेवारी**, 2009**

शाळेच्या सन्मान फलकावर यावर्षी कुणाचंही नाव नसणार

सुट्ट्या संपल्यानंतर आमची वार्षिक परीक्षा होणार होती. तालिबानने मुलींना शाळेत जाण्याला परवानगी दिली तरच हे शक्य होईल. परीक्षेची तयारी म्हणून काही धडे वाचू लागले; पण अभ्यासात मन लागेना. आणखी एक बातमी आली. कालपासून मिंगोरा शहरातील शैक्षणिक संस्थांचा ताबाही सैन्यानं घेतला. संरक्षणासाठी सैन्यास या इमारती हव्या आहेत. आतापर्यंत अनेक शाळा उडविल्या गेल्या. यामुळे शंभराहून अधिक शाळांना कुलूपं लागली. यानंतर शाळांना संरक्षण द्यावे, हा विचार सैन्याला सुचला. वेळीच हा उपाय अमलात आला असता तर आजची हाताबाहेर गेलेली परिस्थिती उद्भवली नसती. यावर कडी म्हणून मुस्लिम खान याने धमकी दिली की, सैन्य संरक्षण असलेल्या संस्था आम्ही उडवून देऊ. शाळेत सैन्य बघून, आम्हाला आणखी भीती वाटू लागली.

आमच्या शाळेच्या दर्शनीभागात एक फलक लावलेला आहे. त्याला सन्मान फलक म्हणतात. दरवर्षी वार्षिक परीक्षेत सर्वांत जास्त मार्क्स मिळविलेल्या मुलीचं नाव या फलकावर ठळकपणे लिहिलं जातं. मला वाटतं, यावर्षी या फलकावर कोणाही मुलीचं नाव लिहिण्याची वेळ बहुतेक येणार नाही.

□

उपाख्यान : **12** सोमवार**, 26** जानेवारी**, 2009**

हेलिकॉप्टरांची दहशत आणि टॉफींचा वर्षाव

भल्या पहाटे तोफगोळयांच्या आवाजाने जागी झाले. फार मोठ्या प्रमाणावर गोळीबार सुरू होता. पूर्वी हेलिकॉप्टरचा आवाज आला की, भीती वाटायची. आता तोफगोळयांच्या आवाजाची सवय झालीय. पहिली आठवण ताजी आहे. सैन्याची कारवाई सुरू होती. एक हेलिकॉप्टर आमच्या घरावरून उडत गेलं. त्याच्या आवाजाने आम्ही सगळे घाबरलो. आमच्या मोहल्ल्यातील माणसांचीही अशीच अवस्था झाली. एकदा हेलिकॉप्टरमधून टॉफीज टाकण्यात आल्या. हा सिलसिला काही दिवस सुरू राहिला. आता जेव्हा हेलिकॉप्टरचा आवाज येई, यावेळी आम्ही सगळी मुलं उत्सुकतेने घराबाहेर जमत असू. हेलिकॉप्टरमधून टॉफीज खाली फेकल्या जातील याची आशेनं वाट बघायचो; पण कशाचं काही नाही. टॉफीज टाकल्या जात नाहीत.

थोड्या वेळानं बाबांनी एक आनंदाची बातमी सांगितली. ते म्हणाले, ‘‘उद्या मी तुम्हाला

इस्लामाबादला घेऊन जाणार आहे.'' हे ऐकून आम्हा भावंडांना फार आनंद झाला.

□

## उपाख्यान : **13** बुधवार, **28** जानेवारी, **2009**

### आई-बाबांच्या डोळयात पाणी तरारलं

बाबांनी त्यांचा शब्द पाळला. काल आम्ही इस्लामाबादला पोहोचलो. स्वातमधून बाहेर पडताना थोडी काळजी वाटत होती. माझ्या कानावर आलं होतं की, तालिबानी प्रवाशांना रस्त्यात अडवून तपासणी करतात. आमच्याबाबत तसं काही झालं नाही. सैनिकांनी मात्र आमची चौकशी केली.

स्वातची सरहद्द संपली. आमची भीतीही दूर झाली. इस्लामाबादमध्ये बाबांचे एक मित्र राहत होते. त्यांच्या घरी आम्ही थांबलो. मोठ्या शहराला माझी पहिलीच भेट होती. बंगले छान छान आहेत. स्वच्छ मोठे रस्ते. इस्लामाबाद हे कल्पनेतलं सुंदर शहर वाटतं. एक खंत मात्र आहे, आमच्या स्वातसारखी निसर्गसौंदर्याची इथं उधळण नाही.

बाबा आम्हाला 'लोक विरसा संग्रहालय' बघायला घेऊन गेले. ते बघून मला बऱ्याच नव्या गोष्टी समजल्या. आमच्या स्वातमध्येही असंच चांगलं संग्रहालय आहे; पण या धामधुमीत ते कसं सुरक्षित राहणार, हा प्रश्नच आहे!

लोक विरसा संग्रहालयासमोर एक आजोबा पॉपकॉर्न विकत होते. बाबांनी पॉपकॉर्न विकत घेतले. ते आजोबा आमच्या पश्तुनी भाषेत बोलले. यावर बाबांनी विचारलं, ''आपण इस्लामाबादचे आहात काय?'' यावर ते म्हाताऱ्या बाबांनी उलट विचारलं, ''तुमचा काय अंदाज आहे? इस्लामाबादही पश्तुनांचं होऊ शकतं काय? सैन्यानं कारवाई केली आणि त्यामुळं गाव सोडावं लागलं. आपलं गाव सोडून इस्लामाबादला यावं लागलं.

आजोबा सांगत होते आणि आईबाबाच्या डोळयात स्वातनदीचं पाणी साकळलं होतं.

□

## उपाख्यान : **14** शुक्रवार, **30** जानेवारी, **2009**

### बुरखा घालायला मी नकार दिला

स्वातच्या संघर्षाचा माझ्यादृष्टीनं एक मोठा फायदा झाला. इथल्या गडबडीमुळं बाबा आम्हाला मिंगोराबाहेर घेऊन गेले. यानिमित्तानं पहिल्यांदा बाहेरच्या जगाचं दर्शन घडलं. काल आम्ही इस्लामाबाद सोडून पेशावरला आलो. इथून बन्नूकडे जायचं. निघण्यापूर्वी एका नातेवाइकांकडे चहाला थांबलो.

माझा छोटा भाऊ आता पाच वर्षांचा होता. तो नातेवाइकांच्या हिरवळीवर खेळत होता. बाबांनी त्याला सहज विचारलं, ''बेटा काय खेळतोस?'' भाऊ चटकन म्हणाला, ''थडगं बांधण्याचा खेळ चाललाय.''

बन्नूला निघायचं होतं. सगळे व्हॅनमध्ये बसले. गाडी जुनी होती. गाडीचा ड्रायव्हर काकासारखा हॉर्न वाजवू लागला. मध्येच ब्रेक लागल्यानं झटका बसला. नेमका हॉर्नही वाजू लागला. दहा वर्षं वयाचा दुसरा भाऊ झोपेतून दचकून उठला. तो घाबरला होता. त्यानं आईला विचारलं, ''आई, बॉम्बस्फोट झाला आहे काय?''

रात्री आम्ही मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचलो. बाबांचे एक मित्र आमची वाट पाहत होते. ते काकाही पश्तून आहेत. घरात मात्र बन्न भाषा बोलायचे. त्यामुळं आम्हाला बोलणं

समजायला थोडी अडचण होऊ लागली.
दुसऱ्या दिवशी आम्ही बाजारात गेलो. जवळच्या बागेत हिंडलो. या गावात घराबाहेर पडणाऱ्या महिलांना टोपीवाला बुरखा घालावा लागतो. त्यामुळे आईनं बुरखा घातला. मी मात्र बुरख्यास नकार दिला. मी म्हणाले, "बुरखा घालून चालणं मला अवघड जातंय."
"आमच्या स्वातच्या मानाने इथं चांगली शांतता आहे," बाबा म्हणाले. "आमच्या इथंही तालिबानी आहेत; पण तुमच्याकडं जेवढा संघर्ष सुरू आहे तसा इथं नाही. मुलींच्या शाळा बंद करा, अशी धमकी तालिबानने दिली होती; पण त्यांना प्रतिसाद मिळाला नाही. मुलींच्या शाळा अजून सुरू आहेत," काका म्हणाले.
□

उपाख्यान : **15** रविवार**, 1** फेब्रुवारी**, 2009**

स्वातमध्ये मेलेल्या शहिदांच्या रक्ताचा बदला कोण घेणार**?**

बन्नूहून आम्ही पेशावरला परत निघालो. रस्त्यात एका मैत्रिणीचा फोन आला. ती म्हणाली, "स्वातमध्ये तालिबान्यांनी आणखी हैदोस मांडला आहे. यामुळे मला खूप भीती वाटू लागली आहे". मी तिला धीर दिला. यावर ती म्हणाली, "येथील परिस्थिती हाताबाहेर गेली असल्याने तू सध्या इकडं येऊ नकोस." सैन्यही मोठी कारवाई करत आहे. या चकमकीत सदतीस माणसं मारली गेलीत, असंही तिनं सांगितलं.
पेशावरला पोहोचायला आम्हाला सायंकाळ झाली. या प्रवासानं थकवाही आला होता. मुक्कामच्या ठिकाणी टीव्ही सुरू केला. स्वातच्या बातम्या पाहू लागलो. माणसं शहर सोडून चालले होते. वाहतुकीची साधनं नसल्यानं ते पायीचं निघाले होते. अंगावरच्या कपड्यांशिवाय सोबत दुसरे काही नव्हतं.
भूतकाळाची आठवण समोर आली. एक वेळ बाहेरची माणसं फिरायला स्वातला येत. आज मात्र स्वातची माणसं बेघर होऊन दुसरीकडं निघाली होती.
मी चॅनल बदलले. टीव्हीवर एक स्त्री चिडून सांगत होती, "बेनझीर भुट्टोंच्या हत्येचा बदला घेतल्याशिवाय आम्ही राहणार नाही." शेजारी बसलेल्या बाबांना मी विचारलं, "स्वातमध्ये शेकडो माणसं शहीद झाली आहेत. त्यांच्या मृत्यूचा बदला कोण घेणार?"
□

उपाख्यान : **16** मंगळवार**, 3** फेब्रुवारी**, 2009**

आमच्या शाळा बंद, मन खट्टू झालं

आमची शाळा आज सुरू होणार होती. सकाळी जाग येताच लक्षात आलं, शाळा बंदच आहे. या विचारानं मन खट्टू झालं. रागही आला. पूर्वी ठरलेल्या दिवशी शाळा सुरू झाली नाही की, आम्हाला आनंद व्हायचा. आजची स्थिती मात्र वेगळी होती. मला आता भीती वाटू लागली आहे. तालिबान्यांनी धमकी दिली आहे. यामुळे शाळा कायमची बंद तर होणार नाही ना?
बाबा म्हणाले, "मुलींच्या शाळा तालिबान्यांनी बंद केल्या आहेत. याला विरोध म्हणून आम्ही खासगी शाळांनी मुलांच्या शाळाही निषेध म्हणून आठ फेब्रुवारीपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. अशा नोटिसा शाळांच्या फाटकावर लावल्या आहेत." मी मनाशी म्हणाले, मुलींच्या शाळांबाहेर काही सूचना लावल्या नाहीत, म्हणजे आमच्या

शाळा आता सुरू होणार नाही.

□

उपाख्यान : **17** शनिवार**, 7** फेब्रुवारी**, 2009**

सगळीकडे लांब केस, दाढ्या आणि गोळीबारांच्या खुणा

दुपारी बाबा, छोटा भाऊ आणि मी मिंगोराला निघालो. आई आणि इतर अगोदरच निघाले होते. वीस दिवसांनंतर गावाकडे परतत असल्याचा आनंद होता आणि मनात थोडी भीतीही होतीच. मिंगोरात शिरण्यापूर्वी कंबदचा भाग सुरू झाला. तिथं जीवघेणी शांतता जाणवली. रस्त्याकडेला लांब-लांब दाढ्या अन् तसेच लांब-लांब केस असलेली माणसं दिसू लागली. बाकी रस्ते सुनसान. चेहरेपट्टीवरून ही माणसं तालिबानी वाटत होती. मी आजूबाजूला बघितलं. रस्त्याकडेच्या घरांच्या भिंतीवर गोळया लागल्याच्या खुणा डोळ्यांना सलू लागल्या. मिंगोरा सुरू झालं. नेहमीची वर्दळ मुळीच दिसत नव्हती. आईसाठी काही वस्तू विकत घ्यायच्या होत्या, म्हणून आम्ही शहा मार्केटमध्ये आलो. तो बाजारही बंद होता. नेहमी हे सुपरमार्केट खूप उशिरापर्यंत गजबजलेले असे. आजूबाजूची दुकानंही बंद होती. आम्ही तसेच मिंगोराला पोहोचलो. आम्ही येत आहोत, ते आम्ही आईला कळविलं नव्हतं. एकदम घरी जाऊन तिला सरप्राइज करायचं होतं. आम्ही घरी पोहोचलो. आम्हाला बघून आईच्या आनंदाला पारावार उरला नाही.

□

उपाख्यान : **18** रविवार**, 8** फेब्रुवारी**, 2009**

गणवेश, दप्तर आणि कंपास बघून मन खट्टू झालं

मी अधीरतेने कपाट उघडलं. कपाटातील शाळेचा गणवेश, दप्तर आणि कंपास बघून मन खट्टू झालं. उद्या मुलांच्या खाजगी शाळा सुरू होत आहेत. मुलींच्या शिक्षणावर मात्र तालिबाननं बंदीचा वरवंटा फिरवला आहे. काल रात्री मौलाना फझलुल्लाहचं एफ. एम. रेडिओवरचं बोलणं ऐकलं. ते म्हणाले, ‘‘मिंगोरा पोलीस स्टेशनवर झालेला आत्मघाती हल्ला हा केवळ घरातल्या प्रेशर कुकरचा छोटा स्फोट समजा. यानंतर याहूनही मोठ्या स्फोटची वाट पहा.’’

दप्तरातला कंपास मी उघडला. त्यात दोनशे रुपये होते. शाळेतल्या दंडाचे ते पैसे होते. एखादी मुलगी शाळेत आली नाही किंवा उशिरा आली तर तिला दंड आकारला जाई. दंडाची रक्कम मॅडमने माझ्याजवळ ठेवण्याची जबाबदारी सोपविली होती.

कपाटात वर्गातील बोर्डावर लिहिण्याचा मार्करही पडलेला होता. तो सांभाळण्याची जबाबदारीही माझीच होती. शाळेतल्या एक-एक गोष्टी आठवू लागल्या. आमच्या मैत्रिणीतील आपसातील भांडणांतील शब्दन्शब्द कानात घुमू लागले.

माझ्या लहान भावाची शाळा उद्या सुरू होत आहे. त्यानं त्याचा गृहपाठ अजून केला नाही. तोही मनातून भ्यालेला आहे. या कारणाने शाळेत जाऊ नये, असंही त्याला वाटत आहे. आई म्हणाली, ‘‘उद्यापासून कर्फ्यू सुरू होत आहे.’’ हे ऐकून त्याने उत्सुकतेनं विचारलं, ‘‘खरंच उद्यापासून कर्फ्यू लागणार आहे?’’ आई जेव्हा हो म्हणाली तेव्हा तर तो आनंदानं नाचू लागला.

□

उपाख्यान : **19 मंगळवार, 10 फेब्रुवारी, 2009**

पोट आणि गरिबीपुढं माणूस हात टेकतो

स्वातमधील मुलांच्या शाळा एकदाच्या सुरू झाल्या. तालिबाननं मुलींच्या प्राथमिक शाळांवरील बंदी उठवली. यामुळे त्या मुली भीतभीत शाळेत जाऊ लागल्या. आमच्या शाळेत पाचव्या वर्गापर्यंत सहशिक्षण आहे. मुलं-मुली एकत्र शिकतात. माझा भाऊ शाळा सुटल्यानंतर म्हणाला, “वर्गात एकोणपन्नास मुलं हजेरी पटावर आहेत; पण केवळ सहाजण आले होते. त्यात एक मुलगी होती.” माझ्या शाळेत सातशे विद्यार्थी आहेत; पण आज 70 आले होते.

आमच्याकडे कपडे धुणारी बाई आठवड्यातून एक दिवस येत असते. आज ती आली होती. घरातील चादरी धुण्याचं काम करायची. तिच्यासोबत एक महिलाही आली होती. ही बाई मूळची अटोक जिल्ह्याची; पण कामाच्या निमित्ताने ती आता इथंच आली होती. ती म्हणाली, “स्वातमधील परिस्थिती खूप बिघडली असल्यानं माझा नवरा म्हणतो, मी अटोकला परत जावं.”

ती म्हणाली, “इतके दिवस मी स्वातमध्ये राहते. इथं घरीच असल्यासारखं वाटतं. स्वात सोडताना वाटतंय, मी नवख्या गावाकडं जाणार आहे.” तिच्या सोबत आलेली महिला स्वातचीच होती. तिने आईला एक पश्तुनी गीत ऐकवलं. गाण्याचा अर्थ होता, “कोणालाही आपलं गावं, आपलं घर सोडावं वाटत नाही. पोटासाठी जोडीदार निवडला हे एक गरिबीचं निमित्त असतं. परिस्थितीपुढं माणसाचं काही चालत नाही.”

□

उपाख्यान : **20 बुधवार, 11 फेब्रुवारी 2009**

आत्मघाती हल्ला घरातील कुकरचा स्फोट समजा

आणखी एक पूर्ण दिवस दु:खाच्या वातावरणात गेला. वेळ जात नव्हता. आता तर आपल्याकडे टीव्हीही नव्हता. आपल्यासारख्या दिवाळीच्या मध्यंतराच्या सुटीत आम्ही वीस दिवस शहराबाहेर गेलो होतो. तेवढ्या कालावधीत चोरांनी हात साफ केले होते. अगोदर अशा चोरीच्या घटना सहसा घडत नव्हत्या. आता इथली सुरक्षा व्यवस्था दिवसेंदिवस ढासळत चालली आहे. धाक न उरल्याने अशा घटना वाढू लागल्यात.

एक मात्र बरं झालं. घरात सोनं अन् रोख पैसे काही नव्हते. सुरुवातीला माझ्या पायातील पैंजण आणि कानातल्या कुड्या दिसेनात. नंतर ते घरातच सापडले. चोरांना अगोदर ते सोन्याचे वाटले असावेत. ते नकली आहेत हे ओळखल्याने फेकून दिले.

काल रात्री एफ. एम. रेडिओवरील भाषणात मौलाना पुन्हा म्हणाले, “पोलीस स्टेशनवर जो हल्ला झाला, तो घरातील प्रेशर कुकरचा क्षुल्लक हल्ला समजा. यापेक्षा आणखी मोठ्या स्फोटाची वाट पहा. वेळ पडल्यास टँकरद्वारेही याहून मोठा स्फोट होऊ शकेल.”

रात्री बाबा आमच्याशी बोलत होते. स्वातमधील घटनांचाच मुख्य विषय होता. इतरवेळी नवी माहिती ते सांगत; पण आज सैन्य, तालिबान, रॉकेट, गोळीबार, मौलानाचा एफ. एम. रेडिओ, मुस्लिम खान, हेलिकॉप्टर, स्फोटात मरणारी व जखमी झालेली निराधार माणसं, हेच विषय होते.

□

## उपाख्यान : 21 गुरुवार, 12 फेब्रुवारी, 2009

शुक्रवारी आत्मघाती हल्ल्याला चांगलं फळं मिळतं

रात्रभर गोळीबारांचा आवाज कानावर येत होता. माझे दोन्ही भाऊ अशा परिस्थितीत गाढ झोपले होते. मला मात्र डोळयाला डोळा लागला नाही. अगोदर मी बाबांजवळ गेले. त्यांच्या आधारानेही झोप आली नाही. पुन्हा आईजवळ येऊन अंथरुणावर पडले. झोप येईना. थोडावेळ डोळयांवर झापड येई; पण पुन्हा न झालेल्या गोळीबारांचा भास होऊन जाग येई. पहाटेपहाटे डोळा लागल्यानं सकाळी उशिरा उठले. दुपारी काजीकाकांनी एक धार्मिक पाठ शिकविला. संध्याकाळी भावासोबत खेळणं झालं. अधूनमधून भांडणंही होत होती. घरात टी. व्ही. नसल्यानं कॉम्प्युटरवर खेळत होते.

तालिबानने टी. व्ही. पाहण्यावर बंधन घातलं नसल्यानं मालिका बघता येत. स्टार प्लसवरची ‘राजा की आयेगी बारात’ मला आवडायची. विनोदी मालिकाही आवडत. पाकिस्तानच्या जिओ चॅनेलवर ‘हम सब उम्मीद से हैं’ हा विनोदी कार्यक्रमही मी बघायचे. आज गुरुवार. मनात भीतीनं घर केलंय. लोक सांगतात. आत्मघाती हल्ले बरेचदा शुक्रवारी किंवा आदल्या रात्री होतात. इस्लामाबादमध्ये शुक्रवार पवित्र दिवस मानला जातो. मात्र हल्ला करणारे, हल्ल्याचा दिवस पवित्र समजत असावेत. ते समजतात, हल्ला करणाऱ्यास याच दिवशी कर्माचं चांगलं फळ मिळतं.

□

## उपाख्यान : 22 शुक्रवार, 13 फेब्रुवारी, 2009

गरिबांनी काय करायचं? त्यांनी असंच मरायचं काय?

आज वातावरण चांगलं आहे. पावसानं चांगली हजेरी लावली. पावसाच्या आगमनानंतर स्वातचं खोरं सुंदर आणि ताजतवानं वाटू लागलं. सकाळी जाग आल्याबरोबर आई म्हणाली, ‘आपला ओळखीचा रिक्षाचालक आणि म्हाताऱ्या चौकीदाराची हत्या झाली आहे.’ हे ऐकून वाटू लागलं, दिवसागणिक इथलं जगणं आणखी कठीण होत आहे.

आजूबाजूच्या गावातून शेकडो माणसं मिंगोरात येत आहेत. या शहरातील माणसंही दुसऱ्या शहराकडे चालली होती. ज्यांच्याकडे खर्चाची ऐपत आहे असे श्रीमंत लोक स्वात सोडून बाहेर राहायला गेले आहेत. गरिबांनी काय करायचं? त्यांना इथं राहण्याशिवाय मार्गच नाही.

आम्ही आमच्या एका ‘नातेवाइकास’ फोन केला. आता वातावरण थोडं निवळलं असल्यानं गाडीतून शहरात फिरायला घेऊन चला. ते गाडी घेऊन आले. गाडीतून आम्ही मुख्य बाजारपेठेत आलो. सगळा बाजार बंद होता. रस्ते नुसते सुनसान, सुस्तावलेले. आम्ही कंबद भागाकडे जायचं ठरविलं. शेजारच्यानं माहिती दिली, ‘तिकडं एक मोठी मिरवणूक निघाली आहे.’

आज रात्री एफ. एम. रेडिओवर मौलाना फझलुल्लाहनी लांबलचक भाषण केलं. स्वातमध्ये सैनिक जी कारवाई करत होते ती तात्काळ थांबवावी अशी ते मागणी करत होते. त्याचबरोबर त्यांनी स्वातमधील लोकांना आवाहन केले. स्वात सोडून जाऊ नका आणि जी माणसं गेली आहेत, त्यांनी परत यावे.

□

उपाख्यान : **23** रविवार**, 15** फेब्रुवारी**, 2009**
शांततेसाठी ही फायरिंग सुरू आहे
गावाकडून आणि पेशावरहून आज काही पाहुणे आले होते. आमचं दुपारचं जेवण सुरू होतं. एकदम बाहेर गोळीबारांचा आवाज ऐकू येऊ लागला. एवढा धूमधडाक्याचा आवाज या अगोदर मी ऐकला नव्हता. आम्ही सगळे घाबरून गेलो. तालिबानी अगदी दारापर्यंत आले आहेत, असं वाटलं. मी बाबापर्यंत धावत गेले. ते म्हणाले, ‘‘बेटा, घाबरू नकोस. हा नेहमीचा गोळीबार नाही. ही शांततेसाठी करत असलेली फायरिंग आहे.’’
बाबा आणखी म्हणाले, ‘‘सरकार आणि तालिबान्यांमध्ये उद्या शांततेचा करार होणार आहे, असं आजच्या वृत्तपत्रात छापून आलं आहे. हे वाचून सगळयांना आनंद झाला. काल तालिबान्यांनी एफ. एम. रेडिओवर शांतता ठेवण्याची घोषणा केली. त्या आनंदाचं फायरिंग माणसं करत आहेत.’’ मला गंमत वाटली. लोक सरकारपेक्षा तालिबानच्या घोषणावर अधिक विश्वास ठेवत आहेत, हे यावरून दिसून येतं.
आम्हीसुद्धा सगळयांनी रेडिओवरची ही घोषणा ऐकली होती. ती ऐकून आई तर रडायला लागली. ते बघून बाबांच्या डोळयांतून अश्रू वाहू लागले. माझे दोन्ही भाऊ न समजणाऱ्या वयाचे असूनदेखील तेही रडू लागले.
□
उपाख्यान : **24** सोमवार**, 16** फेब्रुवारी**, 2009**
मुलींच्या शाळा सुरू होतील याचा मनात आनंद
आज सकाळी लवकर उठले. उठल्यापासून आनंद वाटत होता. सरकार आणि तालिबान यांनी शांतता करार करण्याचं ठरविलं. ही चांगली सुरुवात होती.
हा विचार सुरू असताना डोक्यावर हेलिकॉप्टरचा आवाज येऊ लागला. आमच्या नात्यातील एक मुलगी शेजारी बसली होती. ती म्हणाली, ‘‘जसजशी शांतता बोलणी सुरू झाली तसंतसं हेलिकॉप्टर खालून उड्डाण करीत आहेत.’’
दुपारी माणसं मिठाई वाटू लागली. शांतता करार झाला याचा हा आनंद होता. एका मैत्रिणीचा मला फोन आला. शुभेच्छा देत ती म्हणाली, ‘‘अनेक महिन्यांपासून मी घरात कोंडून घेतलंय. बाहेर कुठंच जाता आलं नाही. आता घराबाहेर मोकळा श्वास घेता येईल.’’
आम्हाला जास्त आनंद झाला; कारण कदाचित मुलींच्या शाळाही पुन्हा सुरू झाल्या असत्या.
□
उपाख्यान : **25** मंगळवार**, 17** फेब्रुवारी**, 2009**
शहरात पुन्हा जिवंतपणा आला
मी दप्तर बाहेर काढलं. आजपासून परीक्षेच्या तयारीची नव्यानं सुरुवात केली. शांतता करार एकदाचा झालाय. यानंतर मुलींच्या शाळाही सुरू होतील, अशी मनात आशा निर्माण झाली. दररोज शिकवणी घेणाऱ्या मॅडम आज आल्या नाहीत. कुठल्या तरी कार्यक्रमाला गेल्या असा त्यांचा निरोप आला.
मी माझ्या खोलीत आले. माझे दोन्ही भाऊ नेहमीचा खेळ खेळत होते. एकाच्या हातात हेलिकॉप्टर होतं आणि दुसऱ्याच्या हातात बंदूक. अलीकडे अशाप्रकारचं खेळणं वाढलं

होतं. एक जोरात म्हणाला, ‘‘फायर करो!’’ दुसरा ओरडला, ‘‘पोझिशन संभालो.’’ एकजण तर मागं म्हणाला होता, ‘‘मी अॅटमबॉम्बच बनविणार आहे.’’
आज मौलाना सूफी महंमद यांचे स्वातमध्ये आगमन झाले. टी. व्ही. माध्यमांच्या प्रतिनिधींचीही गर्दी वाढत आहे. शांत असणाऱ्या शहरात वर्दळ वाढली. बाजारपेठेतही उलाढाल वाढली. मी प्रार्थना करत म्हणाले, ‘अल्लाच्या कृपेनं यावेळीही हा करार यशस्वी होवो.’ मी खूप आशावादी आहे.
फार काही साधलं नाही तरी किमान मुलींच्या बंद पडलेल्या शाळा तरी पुन्हा सुरू होतील.

उपाख्यान : **26** बुधवार**, 18** फेब्रुवारी**, 2009**

आमच्या आनंदावर पत्रकाराच्या हत्येनं पाणी फेरलं

बाजारात जाऊन आले. सगळीकडं गर्दी होती. शांतता करार झाल्यानं माणसं उत्साहात होती. तो आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होता. मोकळेपणानं बाजारात गर्दी वाढली. वाहतुकीची कोंडी खूप दिवसानंतर बघायला मिळाली. रात्री बाबा म्हणाले, ‘‘स्वातमधील पत्रकाराची आज हत्या झाली आहे.’’ आईची प्रकृती आज पुन्हा फारच बिघडली. यामुळं घरात उदास वातावरण पसरलंय. शांतता प्रस्थापित झाल्यानं होणाऱ्या आमच्या आनंदावर या प्रसंगानं काळजीचा बोळा फिरवला गेला आहे.
□

उपाख्यान : **27** गुरुवार**, 19** फेब्रुवारी**, 2009**

युद्धाबद्दल नको, शांततेबद्दलचं घरात बोला

आज बाबांनी न्याहारी तयार केली. कालपासून आईची प्रकृती ठीक नव्हती. ती म्हणाली, ‘‘पत्रकाराच्या हत्येची बातमी बाबांनी कशाला सांगितली? आता आपण घरात फक्त शांततेविषयी गप्पा मारायच्या. युद्ध, खून या गोष्टींना सोडून द्यायचं.’’ आमच्या परीक्षा बहुधा मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होतील, असं आमच्या मुख्याध्यापकबाईंनी आज जाहीर केलं असं कळलं. परीक्षेच्या आठवणीनं मी दप्तराकडं वळले. अभ्यासाला जास्त वेळ दिला पाहिजे.
□

उपाख्यान : **28** शनिवार**, 21** फेब्रुवारी**, 2009**

तालिबानकडून मुलींच्या शाळांवरची बंदी मागे घेतली

स्वात खोऱ्यातील परिस्थिती हळूहळू चांगली होत आहे. नेहमी ऐकू येणारा तोफांचा आणि बंदुकीच्या गोळीबारांचा आवाजही बराच कमी झाला आहे. लोकांच्या मनातील भीती मात्र अजून संपलेली नाही. शांततेची ही घोषणा मध्येच संपुष्टात येणार नाही ना, अशी भीती मध्येच डोकं काढायची. लोक अफवा पसरवतात. तालिबानचे काही कमांडर झालेला शांतता करार स्वीकारत नाहीत. त्यांचे हस्तक सांगतात, तालिबान शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहणार! हे ऐकल्यानं माझ्या हृदयात आणखी धडधडू लागले. ही माणसं अशी का वागत आहेत? ते म्हणतात, लाल मशीद, हफ्सा आणि हम जामा येथील अत्याचाराचा बदला घ्यायचा आहे. मला प्रश्न पडला, ज्या लोकांनी हे ऑपरेशन घडवून आणलं, त्यांचा बदला का नाही घेत ही माणसं?
आताच एफ. एम. रेडिओवर चांगली घोषणा ऐकली. मौलाना फझलुल्लाहनी मुलींच्या

शाळेवरील बंदीचा हुकूम मागं घेतला आहे. परीक्षा होईपर्यंत मुलींना शाळेत जाण्याची परवानगी मिळाली; पण बुरखा घालून त्यांना शाळेत जावं लागेल. ही बातमी ऐकून मला आनंद झाला. असं काही होईल, यावर माझा विश्वास नव्हता.

□

उपाख्यान : **29** रविवार**, 22** फेब्रुवारी**, 2009**

महिलांच्या वस्तू मिळणाऱ्या बाजारात सन्नाटा

आज आम्ही बाजारात जायचं ठरवलं. महिलांसाठी खास असलेल्या खवातीन मार्केटमध्ये आम्ही आलो. रस्त्यानं जाताना मनात धाकधूक होती, याचं कारण तालिबान्यांनी महिलांनी बाजारहाटात जाऊ नये असे फर्मान काढले होते. बंदी असताना आम्ही मिंगोरा शहरातील चायना मार्केटमध्ये पोहोचलो. या बाजारात फक्त महिला आणि मुलींना लागणाऱ्या वस्तू विक्रीसाठी ठेवलेल्या आहेत. तिथं आम्हाला एक प्रकारची भीतीच वाटली. बाजारात महिला आणि मुलींची गर्दी नव्हती. पूर्वी तिथं फिरताना गर्दीमुळं चालता येत नसे. कधी तर एकमेकींना ढकलत मार्ग काढावा लागायचा. आज सगळीकडं सुनसान होतं. काही दुकानंही बंद होती. दुकानावर पाट्या टांगल्या होत्या. हे दुकान विकणे आहे. जी थोडीफार दुकानं उघडली होती, त्यात पुरेसा मालही नव्हता. जो माल शिल्लक होता तो बराच जुना होता.

□

उपाख्यान : **30** सोमवार**, 23** फेब्रुवारी**, 2009**

शाळा उघडल्या; पण उपस्थिती कमीच

सकाळी जाग आली, आज शाळा आहे या आनंदानं! शाळेत आले. काही मुली गणवेशात आल्या होत्या. साध्या वेशात जास्त मुली होत्या. मुली एकमेकांच्या गळाभेटी करत होत्या. सगळयांच्या चेहऱ्यावर शाळा सुरू झाल्याचा आनंद होता. प्रार्थनेनंतर मुख्याध्यापिका म्हणाल्या, ‘‘तुम्हाला एक महत्त्वाची सूचना आहे. शाळेत येताना बुरखा ओढूनच यायचं. तालिबान्यांनी या अटीवरच मुलींना शाळेत येण्याची परवानगी दिली आहे.’’

आमच्या वर्गातील फक्त बाराच मुली आल्या होत्या. काही मुली कुटुंबासोबत स्वातबाहेर गेल्या होत्या. काहींचे पालक मनातून घाबरले असल्यानं त्यांनी मुलींना शाळेत पाठविलं नसेल. माझ्या चार मैत्रिणी स्वात सोडून आधीच इतरत्र गेल्या होत्या. आज आलेल्यांपैकी एकीने सांगितले, ‘आम्हीही लवकरच रावळपिंडीला राहायला जात आहोत.’’ हे ऐकून मला वाईट वाटलं.

मी तिला म्हणाले, ‘‘अगं, आता इथं शांतता करार झाला आहे. तुम्ही आता इथंच थांबायला हवंय.’’

मैत्रीण यावर म्हणाली, ‘‘अशीच शांतता पुढं राहील यावर आता भरवसा नाही.’’ जवळची मैत्रीणही जाणार या कल्पनेनं मी आणखी अस्वस्थ झाले.

उपाख्यान : **31** बुधवार**, 25** फेब्रुवारी**, 2009**

आम्हाला मदत नको,फझल‌ुल्लाहच्या आत्म्यास शांती मिळू द्या**!**

आई आजारी पडली आहे. बाबा एका बैठकीसाठी स्वातबाहेर गेले आहेत. यामुळे आज सकाळी न्याहारी मीच बनवली व नंतर शाळेत गेले. आज आम्ही सगळयांनी शाळेत खूप

धिंगाणा घातला. पूर्वीसारखे खेळही खेळलो.

आजकाल डोक्यावर पूर्वीसारख्या हेलिकॉप्टरच्या घिरट्या खूप कमी झाल्या आहेत. सैन्य आणि तालिबान यांच्या झटापटीबद्दल बोलणंही आम्ही बंद केलं आहे. संध्याकाळी आईसोबत मी आणि माझी चुलतबहीण बाजारात गेलो. तिघी बुरखा घालून गेलो. पूर्वी मला बुरखा घालायला खूप आवडायचं; पण आता त्याचा वैताग येतो. चालताना अवघडल्यासारखं वाटतं.

अलीकडे आपल्या स्वातमध्ये एका गंभीर किस्सा सांगितला जातोय. एक महिला शटल लॉक बुरखा घालून जात होती. चालताना तिचा पाय अडखळला आणि ती पडली. शेजारी एक जण चालला होता. पडलेल्या भगिनीसाठी त्यानं मदतीसाठी हात पुढं केला. ती म्हणाली, ‘‘नको रे भाऊ! निदान त्या फझलुल्लाह यांच्या मनाला मी पडल्यामुळे शांती लाभेल.’’

आमचं नेहमीचं शॉपिंगचं एक दुकान होतं. त्या ठिकाणी आलो. आम्हाला बघून तो हसत म्हणाला, ‘‘तुम्ही तिघी बुरख्यातल्या बघून मी पहिल्यांदा घाबरलोच. मला वाटलं आत्मघाती तीन बॉम्बच आले आहेत.’’

ते दुकानदार असं का म्हणाले, असं आम्हाला वाटलं नाही. या भागात अशा घटना घडल्या होत्या.

□

उपाख्यान : **32** शुक्रवार, **27** फेब्रुवारी, **2009**

पुन्हापुन्हा गावाची आठवण येते

आज शाळेत दोन मैत्रिणी भेटल्या. त्यांना बघताच खूप आनंद झाला. सैन्याने मोहीम सुरू केली आणि त्या रावळपिंडीला निघून गेल्या होत्या. त्यापैकी एक जण म्हणाली, ‘‘रावळपिंडीत शांतता आहे. बाकी सुखसोईही चांगल्या आहेत; पण आम्हाला घरची आठवण येत होती. स्वातमध्ये शांतता सुरू झाली आणि शाळेकडे पुन्हा आलो.’’

आज आमच्या एक शिक्षिका रस्त्याबद्दल शिकवित होत्या. यावेळी त्या स्वातमधील चहारबाग भागाचं पुन्हा पुन्हा उदाहरण देत होत्या. न राहून मी त्यांना विचारलं, ‘‘मॅडम, चहारबाग या भागाचा आपण पुन्हापुन्हा का उल्लेख करत आहात?’’ त्या हसून म्हणाल्या, ‘‘आम्ही अगोदर त्या भागात राहत होतो. एकदा घरावर तोफांचे गोळे पडले. यानंतर घाबरून आम्ही ते ठिकाण सोडलं आणि मिंगोराला आलो. या आठवणीमुळं ते नाव सारखं तोंडात बसलं आहे.’’ आमच्या शेजारचं एक कुटुंब गाव सोडून गेलं होतं. ते कुटुंब आज परत आलं.

उपाख्यान : **33** सोमवार, **2** मार्च, **2009**

दिवसा मजुरी आणि रात्री तालिबान्यांसोबत कमाई

वर्गातील मुलींची संख्या आता वाढत आहे. हजेरीपटावरील 27 पैकी आज 19 उपस्थित होत्या. नऊ मार्चला परीक्षा सुरू होणार आहे. त्यामुळे आता फक्त अभ्यास करायचा. पुस्तकात डोकं घालायचं.

आज शेजारच्या काही महिलांबरोबर चायना मार्केटमध्ये जाऊन आले. भरपूर खरेदी केली. एका दुकानदाराने दुकान बंद होणार म्हणून पाटी लावली होती. राहिलेल्या वस्तू तो कमी

किमतीत विकू लागला. आजूबाजूची बरीच दुकानं बंद पडली आहेत.
आजकाल गोळीबारांचा आवाज ऐकू येत नाही. यामुळे रात्री मात्र छान झोप येते. असं कानी आलंय, तालिबानी अजूनही काही भागात घातपाताच्या गोष्टी करतच आहेत. बेघर लोकांना मदत म्हणून सरकारने काही सामान पाठविले आहे. ते सामान तालिबानीच हडप करतात.
माझी एक मैत्रीण सांगत होती. तिच्या भावाचा एक मित्र तालिबान्यांसोबत रात्री येणाऱ्याजाणाऱ्या गाड्यांची तपासणी करताना आढळला. त्याचं हे काम बघून धक्का बसला. हा मुलगा पोटापाण्यासाठी मजुरी करतो आणि रात्री मात्र तालिबान्यांसोबत राहतो. या मुलाला याबद्दल मुद्दाम विचारलं, ‘असं का करतो?’ तो म्हणाला, ‘मजुरीतून फारसं काही मिळत नाही. तालिबानी मंडळींसोबत राहिल्यानं आवश्यक तेवढं मिळतंच. यातून घर चालतं आणि खाण्यापिण्याची वरचेवर सोयही होते.’’
□
उपाख्यान : **34 मंगळवार, 3 मार्च, 2009**
शांतता करार म्हणजे युद्धापूर्वीची तात्पुरती शांतताच आहे
माझा छोटा भाऊ शाळेत जायला टाळाटाळ करतो. जाताना रडतो आणि परत येताना मात्र खुशीत हसत येतो. आज मात्र परत येताना रडत आला. आईनं रडण्याचं कारण विचारलं. तो म्हणाला, ‘‘रस्त्यानं एक माणूस माझ्याकडं पाहत होता. मला भीती वाटू लागली की, तो मला पळवून तर नेणार नाही ना?’’
हा भाऊ नेहमी प्रार्थना करतो. हात जोडून अल्लाला विनवणी करून म्हणतो, ‘‘आमच्या स्वातमध्ये शांतता आण. लोक ऐकत नसतील तर अमेरिका आणि चीनच्या लोकांना इथं आण.’’
बऱ्याच दिवसांनी आज तालिबान आणि सैन्यांत चकमक उडाली. काही दिवस छोट्यामोठ्या संघर्षाच्या घटना ऐकू यायच्या; पण आज गोळीबारांचा आवाज कानावर आदळला. शांतता करार मोडणार काय? लोकांच्या मनात भीतीचं भूत उभं राहत आहे. यातून घबराट वाढली. काही जण सांगतात, ‘‘शांतता करार ही काही कायमची गोष्ट नाहीच. युद्धापूर्वीची ती तात्पुरती शांतता आहे.
□
उपाख्यान : **35 बुधवार, 4 मार्च, 2009**
तालिबानचा रेडिओ बंद झाल्याशिवाय शांतता येणार नाही
आज वर्गात मॅडमनी विचारलं, ‘‘तालिबानी एफ. एम. रेडिओ तुमच्यांपैकी कोण कोण ऐकतात?’’ बऱ्याच मुली म्हणाल्या, ‘‘आम्ही आता ऐकत नाही.’’ एकदोन जणांनी कबूल केलं की, आम्ही अजूनही ऐकतो. मुली म्हणू लागल्या, हा एफ. एम. रेडिओ बंद झाल्याशिवाय स्वातमध्ये शांतता निर्माण होणार नाही.
याउलट तालिबानी सांगतात, कुराणातली शिकवणच आम्ही रेडिओवरून सांगत असतो. मौलाना सुरुवातीला थोडे कुराणाबद्दल सांगतात आणि त्यानंतर विरोधकांना धमकी देणं सुरू करतात. यात हल्ला, बदला घेणं, मुडदा पाडणं अशाच घोषणा असतात.
आज आम्ही वर्गाबाहेर पडताना आकाशात आवाज ऐकू आला. एक हेलिकॉप्टर उड्डाण

करत होतं. आमची शाळा अशा मोक्याच्या ठिकाणी होती की, जवळून उड्डाण करणारं हेलिकॉप्टर दिसतं. आज मुलींनी हात हलवून सैनिकांना हाक मारली. त्यांनीही हात हलवून प्रतिसाद दिला. मनात विचार आला, हात हलवून सैनिकांनाही आता कंटाळा आला असेल. गेल्या दोन वर्षांपासून हे सुरू होतं.

□

आईनं सांगितलं, ‘‘इकडंतिकडं तालिबानी दिसतात; पण ते पूर्वीसारख्या गाड्या थांबवून तपासणी करत नाहीत.’’ आज नऊ मार्च! आजपासून परीक्षा सुरू होत आहे. सकाळी जाग आल्यापासून परीक्षेची हुरहुर सुरू झाली. आई-बाबा एका नातेवाइकांकडे गावी गेले. घरगुती कार्यक्रम आहे. त्यामुळे मीच नास्ता केला. लहान भाऊ घरी होता.

विज्ञानाचा पेपर मनासारखा गेला. दहांपैकी आठच प्रश्न सोडवायचे होते. मला दहाही प्रश्नांची उत्तरं येत होती. घरी परतले. आईबाबा अगोदरच परतले होते. त्यांना पाहून आनंद झाला. आई म्हणाली, ‘‘तालिबानचं नियंत्रण असलेल्या मुलखातून आम्ही गावाकडे गेलो होतो. रस्त्यानं तालिबानी दिसले; पण त्यांनी गाड्या तपासल्या नाहीत.’’

□

उपाख्यान : **37** मंगळवार**, 10** मार्च**, 2009**

लोकांनी नियमित नमाज पढावा अन् महिलांनी बुरखा पाळावा

शाळेतून मी परत येत होते. एक मैत्रीण म्हणाली, ‘मलाला डोक्यावरून नीट ओढणी घेत जा. नाही तर रस्त्यावरचे तालिबानी शिक्षा करतील.’ आजही मिंगोरा जवळच्या कदंब भागात सुरक्षादलावर गोळीबार करण्यात आला. तालिबानच्या एफ. एम. रेडिओवर भाषण देणारे मौलाना शाह दुरान कदंबचेच राहणारे आहेत. ते आज त्यांच्या गावी परत आले आहेत, असे समजलं. तालिबाननं लोकांना आवाहन केलं. लोकांनी दररोज नियमित नमाज पढावा. महिलांनी बुरख्याकडं लक्ष द्यावं.

□

उपाख्यान : **38** बुधवार**, 11** मार्च**, 2009**

फार दिवसांनी गाणी ऐकली

आजचा पेपर मनासारखा गेला. उद्या शाळा नाही. त्यामुळे आनंदात आहे. आज छोट्या भावांना बरोबर घेऊन बाजारात आले. कोंबडीची पिल्लं विकत आणली. आम्ही आणलेल्या पिल्लांना थंडी सहन झाली नाही. आजारी पडले. आईनं एका उबदार गोधडीत त्यांना गुंडाळून ठेवलं.

एक दोन ठिकाणी ट्रॅफिकही अडकली. अगोदर अंधार पडला की, लोक भीतीनं दुकानं बंद करत. आता मात्र उशिरापर्यंत उघडी असतात. आज रेडिओ ऑन केला. एक निवेदिका बोलत होती. लोक फोन करून आपल्या आवडीची गाणी ऐकविण्याची सूचना करत होते. हे ऐकून मला आश्चर्य वाटलं.

बाबा म्हणाले, ‘‘हे सरकारी चॅनल आहे.’’

खूप दिवसानंतर मी रेडिओवर मनसोक्त गाणी ऐकली. ऐकणारे दूरदुरून फोन करत होते. दूरच्या बलुचिस्तानातून एका मुलानं फोन केला होता.

□

उपाख्यान : **39 गुरुवार, 12 मार्च, 2009**

स्वर्गातील पऱ्यांना भेटण्यासाठी अनिस आत्मघाती बॉम्ब हल्ला

दोन दिवस झाले माझ्या घशात दुखत आहे. बाबा मला एका डॉक्टरकडं घेऊन गेले. बाहेर दोन स्त्रिया बसल्या होत्या. त्या दोघीही कदंबच्या होत्या. एक जण म्हणाली, ‘‘आमच्या भागात अजूनही तालिबानची हुकमत आहे. न ऐकणाऱ्या माणसांना ते शिक्षाही करतात.’’ तिनं आपल्या मोहल्ल्यातील अनिस नावाच्या मुलाची गोष्ट ऐकवली. ती म्हणाली, ‘‘तो अनिस तालिबानचा सोबती होता. एक दिवस तालिबानी त्याला म्हणाला, ‘मी एक स्वप्न बघितलं. त्या स्वप्नात एक परी भेटली. ती म्हणाली, आम्ही अनिसची वाट बघत आहोत.’ हे ऐकून वेडा अनिस खूश झाला.’’ तो आपल्या आईबाबांना म्हणाला, ‘‘स्वर्गात माझ्या पऱ्या वाट पाहत आहेत. त्यांना भेटायला जायचं. आत्मघाती बॉम्ब बनून ‘शहीद’ झाल्यावर त्यांची भेट होणार.’’ आईवडिलांनी त्या वेड्याला विरोध केला. त्यावर तो म्हणाला, ‘‘मी अफगाणिस्तानला जाऊन जिहाद करणार आहे.’’

अखेर अनिस घर सोडून पळून गेला. काल तालिबान त्याच्या घरच्यांना भेटले. ते म्हणाले, ‘‘तुमचा मुलगा अनिस सुरक्षा दलावरील आत्मघाती हल्ल्यात मारला गेला आहे.’’

❖ ❖ ❖

# गाव सोडणं आणि पुराचा तडाखा

“जेव्हा सगळं जग शांत असतं तेव्हा आतला एकच आवाज शक्तिशाली बनू शकतो.”

गुल मकाईची डायरी बीबीसी उर्दूवरून प्रक्षेपित होऊ लागताच, ही लिहिणारी कोण? असे तर्कवितर्क सुरू झाले. काही जण म्हणत, लहान मुलीच्या नावानं मोठी व्यक्ती हे लिहीत आहे. बीबीसीनं एका मुलीच्या आवाजात ती ऐकविली. मिंगोरा शहरातही डायरीच्या लेखिकेची चर्चा सुरू होती. या डायरीतील काही भाग इंग्रजी वृत्तपत्रात अन् उर्दूतही प्रकाशित होऊ लागला.


मलाला आणि तिच्या मैत्रिणी ती वाचत असत. झियाउद्दीन मुलींच्या शिक्षणासाठी आवाज उठवत आहेत. त्यांची मुलगी मलालानं नुकतीच टी.व्हीवर या संबंधीची जाहीर मुलाखत दिली होती. त्यामुळे या डायरीशी यांचा संबंध असू शकतो असा संशय घेतला जाऊ लागला.

तालिबान यांनी स्वातमधील चारही जिल्ह्यावर ताबा मिळविला होता. या विजयाचा मेळावा मिंगोरात आयोजित केला होता. वसंतऋतूच्या आगमनाबरोबर तालिबान्यांचे प्रमुख सूफी मोहम्मद आता या मेळाव्यात विजयाची घोषणा करतील आणि यापुढे जनतेलाही शांततेची ग्वाही देतील, अशा आशेनं मेळाव्यास दूरदूरची माणसं जमा झाली होती. तीस-चाळीस हजारांच्या समुदायाचा महासागर जमला होता. फेटा बांधलेले जिहादची गाणी गाणारे उन्मादात नाचत होते. मैदानात मोठं स्टेज उभारलं होतं. सूफी मोहम्मद मध्यभागी बसले होते आणि त्यांना मुजरा करणाऱ्यांची मोठी गर्दी लोटली होती.

कुराणातील सूरा पठणानं सभेची सुरुवात झाली. पाचही जिल्ह्यातील तालिबान्यांचे नेते, शासकीय अधिकारी असल्यासारखे बोलले. शेवटी सूफी मोहम्मद उभे राहिले. वय झालेले आणि थकलेले मोहम्मद आता स्वात खोऱ्यातील जनतेला आनंदाचा संदेश देतील असे जमलेल्यांना वाटत होते. ते बोलू लागले. त्यांनी सर्वांचा अपेक्षाभंगच केला. ते म्हणाले, ‘‘इस्लाम लोकशाही पद्धतीला स्वीकारत नाही. आजची पाक न्यायसंस्थाही मुस्लिमांच्या विरुद्ध आहे.’’ भाषणाच्या शेवटी तर त्यांनी ओरडून बॉम्बच टाकला. ‘‘बघा, स्वातवर आम्ही आमची हुकमत स्थापन केली. आता आमचे ध्येय इस्लामाबाद आहे.’’

शांततेचं नाटक संपलं होतं आणि दहशतवाद्यांचा नेहमीचा असली मुखवटा समोर आला होता. वृत्तपत्रात, टी.व्ही.वर ही गर्जना पूर्ण पाकिस्तानात भीतीचं वादळ उठवून गेली. पाकिस्तान सरकारनं धोक्याची सूचना समजून घेऊन सैनिकी कारवाईचा निर्णय घेतला. एप्रिल महिना नुकताच संपला होता आणि उन्हाळयाच्या झळा सुरू होण्याच्या सुमारास पाकिस्तानी सैन्यानं स्वातकडे कूच केलं. मिंगोरा शहरात रणगाडे, हेलिकॉप्टर, गाड्यांची वर्दळ सुरू झाली. तालिबान्यांच्या मगरमिठीतून स्वात खोऱ्याची सुटका करण्यासाठी स्वातकडे जाण्याची कार्यवाही सुरू झाली. सैनिकांनी मिंगोरा शहरात प्रवेश केला त्यावेळी न्यूयार्क टाइम्सचे वार्ताहर आदम एलिक मलालावर आणि स्वातसंबंधी एक वृत्तचित्रपट बनविण्याच्या गडबडीत होते. त्यांचं चित्रीकरणाचं काम संपत आलं होतं आणि सैन्यानं

फर्मान काढलं. जनतेनं कृपया शहर खाली करावं. तालिबान्यांविरुद्ध कारवाई तीव्र करण्यासाठी नागरिकांनी सुरक्षितता म्हणून हे शहर सोडावं.
सैनिकांची गाडी रस्त्यावर फिरून जनतेला सैनिक मेगाफोनवर आवाहन करू लागले. "तुमच्या स्वातंत्र्यासाठी तालिबान्यांविरुद्ध हे अंतिम ऑपरेशन सुरू करायचं आहे. आपण कृपया आपापली घरं खाली करा. शहर सोडून स्वातबाहेर सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करा." यावेळी पहिल्यांदा मलालाने आपला जुना विचार बदलला. मला डॉक्टर व्हायचं, असं ती अगोदर सांगायची. तिच्या मैत्रिणीही डॉक्टर व्हायचं स्वप्नं बघत होते. डॉक्टर होऊन जनतेच्या आरोग्यरक्षणाची सेवा करता येईल, ही त्यांची मनीषा होती. स्वातमधील दिवसेंदिवस ढासळत गेलेली अवस्था, राज्यकर्त्यांची निष्क्रियता, सैन्यांची असहायता बघून, तिने निर्णय घेतला. आपल्या डायरीत तिने लिहिलं, "आता मी नवं स्वप्नं पाहत आहे. मला राजकारणात येऊन माझा देश वाचवायचा आहे. माझ्या देशात अनेक पेचप्रसंग निर्माण झाले आहेत. मला राजकारणात येऊन ते पेचप्रसंग सोडवायचे आहेत."
राहतं घर सोडून बाहेर जायचं! कुठं जायचं आणि किती दिवसासाठी जायचं? याबद्दल काही अंदाज नसल्यानं सर्वत्र गोंधळाचं वातावरण निर्माण झालं. सैनिकांनी पुन्हा खुलासा केला, "दहशतवादी निरपराध लोकांच्या आश्रयानं लपून बसले आहेत. जनतेची ढाल करून ते लढत आहेत. त्यांनी शाळा, दुकानांचाही ताबा घेतला आहे. याविरुद्ध कारवाई करण्यासाठी नागरिकांनी लवकर बाहेर पडावं."
झियाउद्दीन या आदेशानं चिडले. ज्या गावात, ज्या भूमीत शेकडो वर्षं आमची पाळंमुळं रुजलेली आहेत, एका ऑपरेशनच्या निमित्तानं आम्हाला तिच्यापासून तोडणे चूक आहे. घर सोडू नये, असाच त्यांनी निर्धार केला; रात्रभर गोळीबार आणि स्फोटांच्या आवाजानं सगळे जागे होते. सकाळी झियाउद्दीन म्हणाले, "अशा परिस्थितीत इथं थांबणं हा वेडेपणा आणि आत्मघात ठरेल. आपण आशा करू की, सैन्य तालिबानच्या मगरमिठीतून स्वातची मुक्तता करेल आणि पुन्हा आनंदानं घरी आपणास परतता येईल.
मलाला रडू लागली. आईनं तिला धीर दिला. बरोबर घ्यावयाच्या थोड्या सामानांची बांधाबांध सुरू केली. मलालाला तिच्या दप्तराची आणि पुस्तकांची काळजी होती. ती तिने एकत्र केली. निघण्याची वेळ आली. स्वत: वाहून नेता येईल एवढंच आणि अत्यावश्यक सामानच बरोबर घ्यावं, असं आई म्हणाली. ऐनवेळेस अनेक वस्तू घरात सोडाव्या लागल्या. मलाला आपलं दप्तर पोटाशी धरून उभी होती. आई म्हणाली, "बेटा, ते ओझं नेता येणार नाही. आपल्याला पुस्तक वाचायला अन् अभ्यासाला वेळ तरी मिळणार आहे काय?" हे ऐकून मलालाला आईचा राग आला, फणफणत ती बाजूला झाली.
पुस्तकाच्या संगतीशिवाय कसं राहायचं? तिच्यासमोर प्रश्न निर्माण झाला होता.



आईसोबत मलाला

मिंगोराच्या रस्त्यावर माणसांचा महापूर लोटला होता. सर्वत्र पाणी तुंबावं तशी माणसं आणि त्यांच्या पाठीवर, खांद्यावर आणि डोक्यावर झेपेल एवढं सामानाचं बोचकं होत. चेहऱ्यावर सगळ्या जगाची चिंता होती. मोटार, ट्रक, बैलगाडी, छकडा, मोटारसायकल, रिक्षा, सायकल, घोड्यावर आणि पायी माणसांचा लोंढा निघाला होता.

मिंगोरा शहराबाहेर पडायला अनेक रस्ते होते; पण तालिबानींनी अनेक रस्त्याकडेची झाडं तोडून रस्तावाहतूक पूर्वीच बंद केल्यामुळं एकाच मार्गावर बाहेर पडण्यासाठी वाहतुकीची कोंडी झाली होती.

झियाउद्दीन हे एका मित्राच्या गाडीनं निघाले होते; प्रचंड गर्दीनं मुंगीच्या गतीनं वाहनं हलत होती. मलाला आणि तिच्या भावंडांनी असा एकत्र दूरचा प्रवास कधी केला नव्हता त्यामुळं ते खूश होते; पण हा प्रवास कोठे घेऊन जाणार आहे या काळजीनं मोटारीत बसल्याचा आनंदही काळवंडून गेला.

दुपार कलून गेली आणि त्यांनी मलाकंद खिंड ओलांडली. झियाउद्दीन म्हणाले, “स्वातची हद्द आता संपली. आता मारदान शहर येईल. इथं निर्वासितांच्या निवाऱ्याची तात्पुरती सोय केली आहे.” तंबूत राहण्याच्या कल्पनेनं मुलं आनंदली; झियाउद्दीननं पुन्हा विचार बदलला. ते म्हणाले, “इथल्या गैरसोईत राहण्यापेक्षा शांगला गावीच जाऊ या.” रात्रभर मारदानला एका मित्राकडे थांबून सकाळी गावाकडे जायचं ठरलं. रात्री झियाउद्दीन पत्नीस म्हणाले, “मी येथून पेशावरला जातो आणि स्वातमध्ये जी रणधुमाळी सुरू आहे, त्याबद्दल वृत्तपत्र अन् चित्रवाहिन्यांना माहिती देतो. तू मुलांना घेऊन शांगलाला जा. माझं कामं झालं की, मी मागून पोहोचतोच.” मलालाच्या आईला मुलांना बरोबर घेऊन एकटं जाणं धोक्याचं वाटू लागलं; पण नवऱ्याचं मन ती वळवू शकली नाही. ते पेशावरला निघून गेले. रात्री मलाला स्वत:शी पुटपुटली, “मला अगदी बोअर होतंय. त्याचं कारण आता वाचायला पुस्तकंही बरोबर आणली नाहीत.”

मलालाची आई तीन मुलांना घेऊन आडवळणाच्या गावाकडं जायला निघाली. अब्बाट्टाबादला मलालाचे मामा राहत होते. तिथपर्यंत एक वाहन मिळालं. तेथून बेशमला थांबून गावाकडं जायचं होतं. पुढं वाहनांची सोय नसल्यानं पंचवीस किलोमीटर पदयात्रा सुरू झाली. शांगलाला ते पोहोचले तेव्हा घरच्यांना अचंब्यानं धक्का बसला. इथंही तालिबान येण्याची भीती ऐकून ते करशत गावी आले. आईचे भाऊ तिथं राहत होते. घरात बसून काय करायचं म्हणून मलाला तिथल्या शाळेत जाऊ लागली.

झियाउद्दीन अजून आले नव्हते. ते पेशावर, इस्लामाबाद या ठिकाणी पत्रकार परिषदा घेऊन स्वातमधील जनतेवरील अत्याचारांची माहिती जगाला देत होते. दहशतवाद्यांनी सामान्य माणसांना वेठीस धरून त्यांचं जगणं असहाय केलं आहे आणि सरकार याकडे लक्षही देत नाही, अशी टीका वृत्तपत्रात येऊ लागली. झियाउद्दीनला या प्रसार मोहिमेमुळे तालिबानच्या एफएम रेडिओवर धमकी आली. तालिबानच्या बदनामीचे सत्र थांबवा, नाही तर आमच्याशी गाठ आहे. बायका मुलांना रडण्याची वेळ येऊ देऊ नका. खेड्यात मोबाइलची सोय नसल्यानं संपर्कही नव्हता. वडिलांच्या काळजीनं सगळे दिवस मोजू लागले. रेडिओवर स्वातमधील सैन्याच्या कारवाईच्या बातम्यांनी त्यांना धीर येई. तिसऱ्या दिवशी महत्त्वाचे चौक सैन्याच्या ताब्यात आले आणि एके दिवशी झियाउद्दीन

कुटुंबास येऊन भेटले. मलालाच्या कुटुंबीयांना त्या दूरच्या गावी करमत नव्हतं; पण स्वातवर सैनिकांनी ताबा मिळविला या बातमीनं त्यांना हुरूप आला. पाकिस्तानी पंतप्रधानांनी 24 जुलै, 2009ला जनतेला रेडिओवर आवाहन केलं. स्वातमधील रहिवाशांनी परत यावे. तालिबानचा नि:पात केला गेला आहे.
झियाउद्दीन कुटुंबासह परत निघाले होते. तोच त्यांना निरोप आला, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामांचे खास दूत रिचर्ड हॉलब्रुक पाकिस्तानच्या दौऱ्यावर आले आहेत. पाकिस्तान आणि अफगाणमध्ये सामान्यजनांसाठी गावपातळीवर महत्त्वाचं काम करणाऱ्या गटांशी ते चर्चा करणार आहेत. या चर्चेसाठी झियाउद्दीन यांनाही



शाळेत मैत्रिणीसोबत मलाला

बोलावले होते. मिंगोराला निघण्यापूर्वी ते या भेटीसाठी गेले. मलालाही वडिलांसोबत होती. चर्चा चांगली झाली. निघताना मलाला हॉलब्रुक यांना म्हणाली, ''आदरणीय अॅम्बेसडरजी, आपणास आम्हाला मदत करावी असं वाटत असल्यास, आपण मुलांच्या शिक्षणासाठी मदत करा.'' मलालाच्या विनंतीचा विचार करू, असे हॉलब्रुक म्हणाले.
स्वातची सरहद्द लागताच युद्ध संपल्याचे जागोजागीचे अवशेष बघून पुढं काय वाढून ठेवलं असेल, या चिंतेनं झियाउद्दीन ग्रासले. मिंगोरा जसंजसं जवळ आलं तसंतसं पडकी घरं, तुटलेली दारं, बॉम्बस्फोटानं उद्ध्वस्त झालेली कार्यालये दिसू लागली. काळजीने सगळे गप्प होते. त्यांचं घर अन् शाळा सुरक्षित होती; पण आजूबाजूचं उजाड मिंगोरा बघून ते खिन्न झाले.
1 ऑगस्ट, 2009 ला सकाळी शाळेची घंटा वाजू लागली. तीन महिन्यांचा वनवास संपल्याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर दिसू लागला. पाटी, पुस्तक आणि शिक्षकांच्या शिकवण्यासोबत भूतकाळाचं दडपणही दूर होत गेलं. बीबीसीनं तिला डायरी लिहायला संधी दिल्यानं मनात येणारे विचार मलाला वडिलांना सांगे. मैत्रिणीला ऐकवी; पण त्याहीपेक्षा वहीत नोंदवून ठेवणं तिला अधिक सोयीचं वाटू लागलं. तिनं वही उघडून सुरुवात केली, ''शांततेसाठी समाजवादी विचारच सर्व पेचप्रसंगावर उत्तर आहे. मी सर्व बांधवांना विनंती करते की, सामोपचारच यशाची फलश्रुती आहे. यामुळेच फाजील धर्माभिमान आणि शोषणातून आमची सुटका होणार आहे.''
निसर्गसंपन्न स्वात खोरं आणि तिथल्या माणसांना एका मागून एक अशा अनेक संकटांना सामोरं जावं लागत होतं. काही संकटं मानवनिर्मित होती, तर काही संकटं निसर्गाचा कोप होती. अगोदर तालिबानची बंधनं आली. भूकंपानं निरपराध माणसांचा बळी घेतला. तालिबानमुक्त स्वातसाठी सैन्यदलाची ऑपरेशनं झाली. हे सगळं कमी झालं वाटून अवेळी पावसानं झोडपून काढलं. तसा स्वातमध्ये मनासारखा पाऊस फारसा होतच नसतो;

त्यामुळे जुलै महिन्यात आलेल्या पावसानं सगळ्यांना आनंद झाला. आकाशाच्या बाप्पाची कृपा झाली. पीकपाणी येणार असं शेतकऱ्याला समाधान असतं; पण हा पाऊस तसा नव्हता. धुवाधार पावसानं सगळे हादरून गेले. ओढे, नदी, नाले आणि गटारं एक झाले. पाऊस थांबेना, नदीच्या पुलावरून पाणी वाहू लागलं. तुंबलेलं पाणी घरात शिरू लागलं. सर्व घाण आणि चिखलानं दाणादाण झाली.

झियाउद्दीन हताश होऊन निसर्गाच्या रौद्ररूपाकडं पाहत होते. ते म्हणाले, ‘‘स्वातच्या अडीच-तीन हजार वर्षांच्या इतिहासात असं कधी घडलं नाही. माणसंच इथं नियम मोडून वागू लागले. डोंगरावर झाडं राहिली नाहीत. लाकडं विकणारे आणि त्याचं रक्षण करणारेच संगनमतानं जंगलतोड करत आले. माती अन् डोंगराचं आच्छादन आम्ही स्वार्थासाठी विकून खाल्लं. त्याची ही शिक्षाच आहे. अजून तरी आमचे डोळे उघडणार आहेत की नाही?’’

महापुरानं नवनवीन संकटं निर्माण केली. पिण्याचं पाणी, वीज आणि धान्याचं खूप नुकसान झालं. पाऊस थांबल्यानंतर रोगराईनं पाय पसरले. कॉलरा पसरू लागला. माणसांनी आणि निसर्गानं स्वातला झोडपून काढलं.

दैवी आणि भौतिक संकटांना दूर करण्यापेक्षा सर्वसामान्यांना छोट्यामोठ्या संशयाखाली सैनिक त्रास देत होते. प्रत्येकात त्यांना अतिरेकीच दिसत होता आणि मी तसा नाही, हे सिद्ध करायला कोणताही सनदशीर मार्ग नागरिकांजवळ उरलेला नव्हता. त्यामुळे साध्या भाजी विकणाऱ्या लोकांना, कोणत्याही गटाशी संबंध नसणाऱ्या निरपराध लोकांनाही सैनिकी चौकीत अडकवून ठेवलं जाई. त्या संदर्भात तक्रार तरी कोणाकडे करायची? सैन्यानं तालिबानींना स्वातमधून बाहेर काढलं असा दावा सरकार करत होते, मात्र दहशतवाद्यांचा म्होरक्या फझलुल्लाहला ते अटक करू शकले नव्हते.

स्वातमधील अत्याचाराविरुद्ध आवाज उठविणाऱ्या जिरगांनी एक बैठक घेतली. झियाउद्दीन यांनी सरकारच्या बोटचेपेपणाबद्दल कडवट टीका केली. दोन दिवसांनी त्यांना निनावी पत्र दारावर लटकवलेलं आढळलं. दुसरी धमकी आली होती. आमचे लक्ष आहे, विसरू नका.

1 मे, 2011 च्या रात्री झियाउद्दीनचे एक मित्र आले आणि म्हणाले, ‘‘आब्बोट्टाबादला अमेरिकन विशेष पथकानं ओसामा बिन लादेन यांचा खातमा केला.’’ विश्वास बसणार नाही अशी बातमी होती. मलालाची आई म्हणाली, ‘‘गेल्या वर्षी ऑपरेशनच्यावेळी स्वात सोडावं लागलं. आश्रयासाठी गावाकडं जाताना काही दिवस आम्ही आब्बोट्टाबादला थांबलो होतो.

मित्र म्हणाले, ‘‘बातमी अशी आहे. लादेन यांना अमेरिकन पथकानं मारलं, तो बंगला मिलिटरी अकादमीच्याजवळ अगदी सुरक्षित भागात आहे. अमेरिकन पथक लादेनची बॉडी हेलिकॉप्टरमधून घेऊन गेले.’’

रात्रभर याच विषयांवर उलटसुलट चर्चा सुरू होती. याप्रकरणानं अमेरिकनं पाकिस्तान सरकारचा मात्र बुरखा फाडला होता. ही कारवाई पाकिस्तानच्या उच्चाधिकाऱ्यांना माहीतही नव्हती. लादेनचं शव पाकिस्तानबाहेर घेऊन गेल्यानंतर अध्यक्ष झरदारी आणि सैन्यप्रमुख जनरल कयानींना माहिती देण्यात आली.

दक्षिण आफ्रिकेत आर्चबिशप डेस्मंड टूटू हे वर्ण, वर्ग समानतेसाठी कार्य करत होते. सरकारने काळे-गोरे असा भेद न ठेवता मानव कल्याणाचं कार्य केलं पाहिजे यासाठी ते लढा देत होते. माणूसच महत्त्वाचा आहे. धर्म, वर्ग आणि वर्ण या बाह्यभेदांपलीकडे समानतेचं सूत्रच मानव कल्याण करू शकेल, असं ते आग्रहानं मांडत होते. झियाउद्दीनला त्यांचे विचार आणि कृती जवळची वाटायची. स्वातमध्ये ते करत असलेले मुलांच्या शिक्षणाचे कार्य, त्यांच्या आदर्शाचा भाग वाटायचा.

ऑक्टोबर 2011 मध्ये डेस्मंड टूटू यांनी झियाउद्दीन यांना तार केली. अॅमस्टरडॅम येथे बालकांच्या हक्कासाठी कार्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय बालकांसाठी शांततेसाठीचा पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारासाठी त्यांनी मलालाचे नाव सुचविले होते. मलालाची या आंतरराष्ट्रीय बालक पुरस्कारासाठी शिफारस करताना त्यांनी म्हटलं, ‘‘मलाला हिमतीनं उभी राहिली. मला आणि जगातील सर्व मुलींना शाळेत शिकण्याचा हक्क आहे, हे ती राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जनसमुदाय आणि प्रसिद्धिमाध्यमांसमोर सतत धैर्यानं सांगत आहे. शिक्षण या बालकांच्या मूलभूत हक्कासाठी तिचा हा शांततेचा लढा असल्यानं तिच्या नावाची मी शिफारस करीत आहे.’’ ही बातमी ऐकून मलाला शांत राहिली. आईही गप्प होती. मलाला अलीकडे रेडिओ, टी. व्ही. अन् वृत्तपत्रातून आपलं म्हणणं मांडत आहे, हे आईला मनापासून आवडत नव्हतं. याचं कारण आईचं प्रेमच होतं. मलालाची प्रसिद्धी लोकांच्या डोळ्यांत येत होती आणि त्यामुळं नको त्या संकटाची त्यांना काळजी वाटत होती.

पुरस्कार जाहीर झाले. दक्षिण आफ्रिकेच्या मायकेल मायक्रॉफ्ट यांची निवड झाली. मलालाच्या वडिलांना थोडं वाईटही वाटलं; पण त्यांनी विचार केला. मलालाची या पुरस्कारासाठी शिफारस होणे, ही काही लहान गोष्ट नाही. याचं प्रत्यंतर थोड्या दिवसांत आलं. लाहोरला शिक्षणाचा आनंदोत्सव होणार होता. पंजाबचे मुख्यमंत्री शाहबाज शरीफ यांनी मलालाला निमंत्रण दिलं. शिक्षणविषयक कार्यक्रमात जाहीरपणे बोलण्याची पहिली संधी मिळत असल्यानं तिला आनंद झाला. मुख्यमंत्र्यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला मलाला करत असलेल्या मुलीच्या शिक्षणासाठी दहा लक्ष रुपयांची मदत करून तिचा गौरव केला.

शिक्षणाच्या या आनंदोत्सवात मलाला म्हणाली, ‘‘शिक्षण हे हस्तगत करण्याचं शस्त्र आहे. या शस्त्राच्या भीतीमुळंच माझी पुस्तकं आणि माझा पेन जबरदस्तीनं शाळा बंद करून हिसकावून घेतला आहे; पण स्वातच्या डोंगरातील कन्या धीट आहेत. त्या कोणालाही घाबरत नाहीत. आम्ही घरच्या घरी शिक्षण सुरू ठेवलं आहे.’’

मलाला स्वातला परतली. ती बोलत असलेल्या मुलींच्या शिक्षणास एक प्रकारे राजाश्रयच लाभला होता. मिळालेल्या मदतीतून तिची आणि वडिलांची स्वप्नं पूर्ण करण्यासाठी हातभारच लागणार होता. मलालाच्या मैत्रिणींनाही याबद्दल आनंद आणि अभिमान वाटू लागला. शाळा सुटताच पत्रकारांचा घोळका तिची वाट पाहत होता. वेळोवेळी मुलाखतीला ही मंडळी येत असल्यानं तिला विशेष वाटलं नाही.

एक पत्रकार पुढं येत म्हणाला, ‘‘अभिनंदन मलाला दीदी! सरकारनं या वर्षापासून युवकांसाठी शांततेचा राष्ट्रीय पुरस्कार सुरू केला आहे. पहिल्या पुरस्कारासाठी तुझी

निवड झाली आहे. याप्रसंगी तुझी प्रतिक्रिया द्यावी.'' लागोपाठ मिळणारे सन्मान आणि पुरस्कारानं मलाला क्षणभर विचलित झाली. वडिलांनी ऐकविलेली धोक्याची घंटा तिच्या कानात ऐकू येऊ लागली. ते म्हणाले होते, ''हे सन्मान, हे पुरस्कार आपल्या कामाची ऊर्जा मारून तर टाकणार नाहीत ना?'' या विचारानं ती गंभीर झाली. फारसं न बोलता, सरकार या महत्त्वाच्या कामाकडे लक्ष देत आहे, याबद्दल तिनं समाधान व्यक्त केलं.

पंतप्रधान युसूफ रजा गिलानी यांच्या हस्ते 20 डिसेंबर, 2011 ला पुरस्काराचं वितरण रावळपिंडीला होणार होतं. पाच लक्ष रुपयांचा हा पुरस्कार होता. निघण्यापूर्वी रात्रभर मलाला पंतप्रधानासाठी मागण्यांचं पत्र लिहीत होती. तिनं लिहिलं. ''आदरणीय पंतप्रधानजी, बोलून सांगण्यापेक्षा मी पत्रानं काही विनंती करत आहे. स्वातमधील शाळा दहशतवाद्यांनी उद्ध्वस्त टाकल्या आहेत. या शाळा नव्यानं बांधव्यात. मुलींसाठी उच्चशिक्षणाची इथं सोय नाही. आपण हे सगळं कृपया करा.''

पंतप्रधानांच्या हस्ते मलालाला पाकिस्तानचा पहिला राष्ट्रीय युवती शांतता पुरस्कार देताना ते म्हणाले, ''या वर्षापासून हा सन्मान आम्ही सुरू करत आहोत. दरवर्षी अठरा वर्षाखालील मुलांतून यासाठी निवड केली जाणार आहे. पुढच्या वर्षापासून या पुरस्काराचे नाव 'मलाला पुरस्कार' असे राहील. मलाला मुलींच्या शिक्षणासाठी जे काम करत आहे, या तिच्या धैर्याचा आणि कार्याचा हा सन्मान आहे.''

हा पहिला राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारताना मलाला म्हणाली, ''मी कोणत्याही राजकीय पक्षाची बांधिलकी



पाकिस्तान सरकारचा पहिला राष्ट्रीय 'युवा शांतता पुरस्कार'

मानणारी नाही; पण माझं एक स्वप्न आहे. मी एक राष्ट्रीय पक्ष स्थापन करणार आहे. हा पक्ष केवळ शिक्षण प्रसाराचं काम करेल.'' मलालाच्या विनंतीनुसार पंतप्रधानांनी स्वातमध्ये आय. टी. संकुल उभारण्याची आणि मुलींच्या पदवी शिक्षणासाठी महाविद्यालयाची सोय करण्याची संबंधितांना तात्काळ सूचना केली.



आईवडिल व दोन भावांसमवेत मलाला

मलाला पुरस्कार घेऊन स्वातला परतली. गेले काही दिवस वृत्तपत्र आणि टीव्हीवरील

मलालासंबंधीच्या बातम्यांनी तिची आई मनातून खूप घाबरली होती. घरी परतलेल्या मलालाला पोटाशी धरून त्या ओक्साबोक्शी रडू लागल्या. पतीकडे वळून त्या म्हणाल्या, ‘‘आईसाठी पोटचा गोळा महत्त्वाचा आहे. ही बक्षिसं तिच्या मुळावर उठणार तर नाहीत ना, या विचारानं मला रात्ररात्र झोप येत नाही.’’

❖ ❖ ❖

# मलालाचा
# जीवन-मरणाचा संघष

"तालिबान्यांनी बंदुकीची गोळी झाडलेल्या मुलीपेक्षा शिक्षणासाठी लढणारी मुलगी अशीच माझी ओळख व्हावी."

युवकांसाठी असलेला पाकिस्तानचा पहिला शांततेचा पुरस्कार मलालाला मिळाला आणि तिच्याकडं सरकारकडून मदतीचा ओघच सुरू झाला. पंतप्रधानांनी सहाय्य केले तसेच, सिंधप्रांताच्या मुख्यमंत्र्यांनी दहा लाख देऊन ती करत असलेल्या शिक्षणाच्या मागण्यांची पूर्तता करण्याचे आदेश दिले. ती आणि तिच्या वडिलांच्या कामाचा बोलबाला झाल्यानं दहशतवाद्यांना मलालाचा हा नवा व धीट चेहरा धोक्याची घंटा वाटू लागला. यात भर पडली तिला मिळणाऱ्या सन्मानांची.

लढाईतल्या विजयानंतर सैनिकांनी केलेल्या लूटमारींसारखे हे सन्मान तर नाही ना, हा विचार तिच्या मनात डोकावून गेला. वडिलांनी मागं सांगितलेलंही तिच्या मनात रुंजी घालत होतं. ते सांगायचे, बेटा, "सन्मान आणि पुरस्कारांमुळे तुमच्या कार्यक्षमता बोथट होण्याचा धोका असतो." "मला या सन्मानाची भीती वाटतेय" आई घाबरून म्हणू लागली.

यात भर पडली आणखी एका पुरस्काराची! युनायटेड किंग्डमयेथील अॅन फ्रँक ट्रस्टने "शौर्य पुरस्कारासाठी" तिची निवड केली होती. यावेळी तिचे वडील म्हणाले, "तुझी जबाबदारी वाढत आहे बेटा." यावर मलाला म्हणाली, "बाबा, मला अभ्यासाकडं लक्ष द्यायचंय, खूप शिकायचंय. यामुळेच अज्ञानाविरुद्धची लढाई मला जिंकता येईल. आपल्याकडे पैशाच्या रूपानं मदतीचा ओघ सुरू झाला, हा पैसा शिक्षणाच्या कामासाठी देण्यात आलेला आहे. जनतेने दिलेला पैसा, गरजू मुलांच्या शिक्षणासाठीच वापरणं हा पैशाचा सदुपयोग आहे. मी पाकिस्तानमधील आणि जगभरातील शाळा न शिकू शकणाऱ्या मुलांसाठी काम करायचं स्वप्न पाहतेय. त्यासाठी या धनाचा उपयोग करायचा आहे.

मिळालेल्या बक्षिसस्वरूपी धनाचं योग्य व्यवस्थापन होण्यासाठी एज्युकेशन फाउंडेशन सुरू करावं, असं तिच्या मनात आलं आणि मलाला एज्युकेशन फाउंडेशनची स्थापना होऊन तिला मिळणारी मदत, पुरस्कार अन् सन्मानाची रक्कम या फाउंडेशनच्या खात्यात मलाला जमा करू लागली. त्यावेळी तिच्या नजरेसमोर कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून कागद, भंगार, काचेच्या बाटल्या वेचून जगण्याचा संघर्ष करणारी मुलं होती.

युसूफझाईंच्या खुशाल पब्लिक स्कूल आणि मलालाच्या वृत्तमाध्यमातील मुलाखतींची तालिबान्यांनी गंभीर दखल घेतली. युसूफझाईंना धमकीचं आणखी एक पत्र मिळालं. सोबत छापील पत्रकही होतं. पत्र वाचून ते प्रथमच अस्वस्थ झाले -

"पवित्र कुराणातील सर्व शिकवणीच्या विरुद्ध खुशाल पब्लिक स्कूल धर्मविरुद्ध काम करत आहे. हे इस्लामच्या विरुद्ध सुरू असलेले काम आहे. जनतेनं ते बंद करावं, नसता अल्ला ते काम करवून घेईल."

पत्र वाचून युसूफझाई गंभीर झाले. या गंभीर धमकीबद्दल ते घरात बोलले नाहीत.

मलालाचा चौदावा वाढदिवस जवळ आल्यानं ते गप्प होते. तिच्या वाढदिवसाच्या दिवशी युसूफझाईच्या मित्रासंबंधीची धक्कादायक बातमी आली. स्वातमधील शांतता समितीचे सभासद आणि स्वात कॉन्टिनेन्टल हॉटेलच्या मालकाची हत्या झाली. तालिबानची ही नवी सुरुवात होती. शांतता समितीच्या एक-एक सभासदाकडे यापुढे आम्ही लक्ष देणार आहोत, अशी ही धमकावणीच होती.
यावर सुरक्षितता म्हणून स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांना पोलीस संरक्षण देऊ केले. युसूफझाई यांनी संरक्षण घेण्यास नकार दिला. ते म्हणाले, “आज स्वातमध्ये प्रत्येक सामान्य माणूस विनासंरक्षण फिरत असताना मला विशेष संरक्षण नको. ते घेणे म्हणजे दहशतवाद्यांच्या भीतीला शरण जाण्यासारखं होईल. मी ग्लोबल शांतता कमिटीचा अध्यक्ष आहे. शांततेचा प्रसार करत असताना पोलिसांचं संरक्षण आमच्या उद्देशाविरुद्ध होईल.”
मलाला मुलींना शिकवा म्हणून सांगत होती. डायरी लिहिताना तिनं आग्रहानं मांडलं होतं. घरातली स्त्री शिकलेली असली तर सगळं घर पुढं शिकण्यास सुलभ होईल. मात्र तिच्या आईला शिकता आलं नव्हतं. सहाव्या वर्षी ती शाळेत गेली आणि लागलीच तिची शाळा बंद झाली. लग्नानंतर पती शिक्षणप्रसाराचं काम करतो म्हणल्यानंतर या महत्त्वाच्या कामासाठी ती त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली. ती शाळेची छोटीमोठी कामं करायची. सुट्टीत शाळेला रंग देणं, सफाई करून घेणं वगैरे गोष्टी ती जबाबदारीनं करायची.
एके दिवशी युसूफझाई पत्नीला म्हणाले, “आपण मुला-मुलींच्या शिक्षणासाठी काम करत आहोत. स्त्रियांनीही शिकलं पाहिजे. या कामाची सुरुवात आपल्या घरातून करू या. तू शिकणं सुरू कर. शाळेतील एक शिक्षिका तुला अक्षर आणि अंक शिकवील.”
वडिलांचा निर्णय मलालाला आवडला. आईही शिकायला तयार झाली. ऑक्टोबरची परीक्षा सुरू असल्यानं मलाला अभ्यासात बुडून गेली होती. तिची आणि तिच्या मैत्रिणींची वर्गात पहिली येण्याची स्पर्धा असायची. त्यामुळे तिघीही खूप अभ्यास करायच्या. मलालाला वाटायचं, आपण वर्गात दुसरी येऊन चालणार नाही. वडील सांगायचे, प्रथम येण्याचा आनंद दुसऱ्यांच्या वाट्यालाही येऊ दिला पाहिजे. यातून निखळ मैत्री वाढते. प्रत्येकासोबत समाधान वाटून घेता येतं.
मल्का-ई-नूर आणि मलालात आलटूनपालटून पहिल्यादुसऱ्या क्रमांकाची स्पर्धा सुरू होती. परीक्षा सुरू होण्यापूर्वी प्रत्येकीने एकमेकीस शुभेच्छा दिल्या. पदार्थविज्ञानाचा पहिला पेपर होता. मलालाचा आवडता विषय. तिचे बाबा सांगायचे, शिक्षण हे परिवर्तनाचं पहिलं साधन आहे आणि विज्ञान ही प्रगतीची पुढची शिडी आहे. पदार्थविज्ञानाच्या मदतीनं माणसानं अनेक शोध लावले. आजची सगळी प्रगती विज्ञानातील प्रगतीमुळंच होऊ शकली आहे. मलालानं आवडीचा पेपर सोडविला. एक-एक दिवस उलटत होता आणि परीक्षेचं ओझं हलकं होत होतं. आज शेवटचा पेपर इतिहासाचा होता. तो विषय तिला मनापासून आवडायचा नाही. स्वातंत्र्यापूर्वी पाकिस्तान हा भारताचा एक भाग होता. बॅरिस्टर जिना यांच्या आग्रहाखातर स्वतंत्र पाकिस्तान निर्माण झाला. गेली अनेक वर्षं पाकिस्तानातील गट आणि टोळ्यांचा अनेक कारणांनी झगडा सुरू आहे. हे सगळं


अभ्यासताना मलालाला वाटायचं, पाकिस्तान भारतातच राहिला असता तर, आजच्या इतकी परिस्थिती बिघडली नसती. इतिहासाच्या पेपरमध्ये असं लिहिता येत नव्हतं. हा विचार करत ती शाळेत आली. पेपर चांगला गेला. आता परीक्षेचं ओझं संपल्याच्या आनंदात मैत्रिणी वर्गाबाहेर पडल्या.

दररोज शाळा सुटली की, मुलींना घेऊन जाणारी बस तयार असे. पहिल्या बसमध्ये आपला नंबर लागावा, यासाठी बसमध्ये शिरण्याची स्पर्धा सुरू होई. बस ड्रायव्हर शेर मोहम्मद बाबा मुलींना ओरडून सांगायचे, हळू चढा! सगळयांनाच घेऊन जाणार आहोत; पण त्यांचं कोणी ऐकायचं नाही.

शेर बाबानं आजही नेहमीच्या ठिकाणी बस आणून उभी केली. दरवाजा उघडून मुलींची वाट पाहू लागला. परीक्षा संपल्यानं सगळे जण आनंदात होते. उड्या मारत होते. थट्टामस्करी करत होते. एक दुसऱ्याची खोडी काढत होते. नेहमीची वेळ टळून गेली. शेवटी ड्रायव्हरनं बसवरील लाउडस्पीकरवर जाहीर केलं, बस सुटत आहे. आवाज ऐकून मुली बसकडे पळू लागल्या.

मलाला आणि तिची जिवलग मैत्रीण मोनिबा नेहमीच्या मागच्या सीटवर येऊन बसल्या. मागं बसायला त्यांना आवडायचं. समोरच्या सीटवर दोन शिक्षिका बसायच्या. त्यांच्याजवळ दंगामस्ती करायला भीती वाटायची. मागच्या सीटवर मात्र हा धाक नसायचा.

बस सुरू झाली. शाळेचं फाटक ओलांडून रस्त्याला लागली. मलाला आणि मोनिबा बसबाहेर पाहू लागल्या. तीच दररोजची रस्त्यावरची माणसं, रिक्षा, हातगाड्या अन् मोठ्या वाहनांची गर्दी ओळखीची होती. समोरच्या सीटवरची एक मुलगी गाणं म्हणू लागली आणि बाकीचे टाळया वाजवून तिला साथ देऊ लागले. बस गर्दीच्या हाजी बाबा रोडला आली. गर्दीमुळे बसचा वेग मंदावला. आजूबाजूच्या रिक्षाचे हॉर्न, हातगाडीवर माल विकणारी



शाळेची बस

माणसं, कोपऱ्यावर लोखंडावर घण मारणाऱ्या लोहाराचा आवाज अशी सगळी सरमिसळ बसमध्ये ऐकायला येत होती. बस वळते तिथं खाटकाचं दुकानं दिसलं. बोकडाच्या गळयाला दोरी बांधून एक मुलगा त्याला ओढत होता आणि आता थोड्या वेळात मानेवर सुरी चालणार या भीतीनं ते चारही पाय जमिनीत रोवून ताठरलेल्या अंगानं भेसूर ओरडत मागं सरकत होतं. या दृश्यानं मलालानं मोनिबाला विचारलं, “मरण्यापूर्वी त्या बोकडाच्या मनात काय विचार येत असतील?”

मलालाचे असे प्रश्न आले की, मोनिबाला कौतुक वाटायचं. यावर ती नेहमी मनसोक्त हसून

काही तरी जोक सांगायची; पण आज ती गप्प झाली. रस्त्यानं जातायेता कोंबडी अन् बोकड कापताना तिनं बरेचदा बघितलं होतं. खाटकानं मान उडवली की, आवाजापेक्षा रक्ताच्या लालभडक चिळकांडीनं ती अस्वस्थ होई. चिकन, मटण खायला मजा येते; पण मरणाऱ्याचा आवाज ऐकायला नको वाटायचा.

बस हळू चालली होती. आजूबाजूचे तऱ्हेतऱ्हेचे वास बसमध्ये शिरू लागले. डिझेल गाड्यांचा धूर, आजूबाजूला कुजलेली घाण, रस्त्यावर वाहणारं सांडपाणी या सगळया दुर्गंधीची सरमिसळ झाली होती. मलालाला कचऱ्याच्या ढिगावरून बाहेर आलेली मुलगीच डोळयासमोर दिसू लागली.

मुख्य रस्त्याला सैनिकांचा तपासणी नाका दिसू लागला. शाळेत जाताना आणि परतताना तो दिसायचा. नाका ओलांडला आणि बस उजवीकडे वळली. कोपऱ्यावर भलंमोठं पोस्टर दिसू लागलं. काळया कपड्यानं चेहरा झाकलेली माणसं बंदुका रोखून उभी होती. पोस्टरच्या कोपऱ्यात तालिबानचे म्होरके फजलुल्लाह येणाऱ्याकडे रागानं पाहत होते. खाली मोठ्या अक्षरात लिहिलेलं होतं, धर्मासाठी जीवावर उदार होणारे तरुण हवे आहेत!

मलालाच्या मनात विचार आला, किती दिवस हे सुरू राहणार? सरकार म्हणतं, सैनिकांनी स्वातमधून दहशतवाद्यांना पळवून लावलं आणि भरचौकात येणाऱ्याजाणाऱ्यावर बंदुका रोखून उभ्या असलेल्या पोस्टरचं काय? स्वातमध्ये शांतता आहे, असं सरकार सांगत आहे; पण शहरातील इमारतीवर, चौकात शस्त्रधारी सैनिकांची हजेरी काय दर्शविते? या प्रश्नांनी ती भांबावून गेली. मधेच तिला आईची आठवण झाली. ती मोनिबाला म्हणाली, ‘‘आजपासून आई शाळेत जाऊ लागली. आपली परीक्षा संपली तेव्हा ती शिकण्यासाठी शाळेत आली आहे. आपली बस शाळेबाहेर पडताना मी तिला शाळेत येताना पाहिलं आहे.’’

बसमध्ये गाणं म्हणणाऱ्या मुली आज आनंदानं गात होत्या आणि बाकीच्या टाळया वाजवून त्यांना साथ देत असल्यानं नुसता गोंधळ सुरू होता. बस ड्रायव्हरनं एकदम ब्रेक मारल्यानं बस थांबली. बससमोर एखादं जनावर आलं किंवा रिक्षावाला आला की, असं घडायचं. त्यामुळे त्याकडं कोणाचं लक्ष नव्हतं. बसच्या दारावर खटखट ऐकू आली. बस मदतनीस उस्मानभाईनं दार उघडलं.

दोन तरुण बसमध्ये चढले. एकाच्या हातात बंदूक आणि दुसऱ्याच्या हातात पिस्तूल होतं. दोघांपैकी एकानं ओरडून विचारलं, ‘‘मलाला कोण आहे?’’ बसमध्ये भीतीचा सन्नाटा पसरला. कोणीही तोंडातून शब्द उच्चारिना; पण सगळयांच्या नजरा मागच्या सीटवर बसलेल्या मलालाकडे वळल्या. ते दोघं दोन पावलं पुढं आले. मी मलाला आहे, हे सांगण्याची संधी देण्याअगोदर पिस्तुलातली पहिली गोळी सुटली. मलाला कोसळली. दुसऱ्या आणि तिसऱ्या गोळीनं कैनात आणि शाझियाचा वेध घेतला. हा हल्ला 9 ऑक्टोबर 2012ला झाला. हल्ला करणारे ते दोन्ही दहशतवादी खाली उतरून पसार झाले.



*या स्कूलबसमध्ये बसलेल्या मलालावर गोळी झाडण्यात आली*

हल्लेखोर पळून गेले. बस सहायक उस्मानभाईनं ड्रायव्हरला दवाखान्याकडे बस वळविण्यास सांगितली. बसमधील मुली भीतीनं ओरडू लागल्या. मलाला मोनिबाच्या मांडीवर कोसळली होती. डोक्याच्या डाव्याबाजूनं कानापासून रक्त वाहू लागलं. बस स्वात सेंट्रल हॉस्पिटलमध्ये पोहोचताच मलालावरच्या हल्ल्याची बातमी मंगोरा शहरात वाऱ्यासारखी पसरली. पत्रकार, वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी दवाखान्यात धडकले. माणसांचा पूर दवाखान्याकडे वाहू लागला.

मलालाचे वडील स्वात प्रेस क्लबच्या कार्यक्रमात भाषण करत होते. स्वातमधील खाजगी शाळाप्रमुखांच्या संस्थांची एक बैठक आयोजित केली होती. झियाउद्दीन या असोसिएशनचे अध्यक्ष होते आणि अध्यक्षीय भाषण करत असताना त्यांचा मोबाईल फोन वाजला. स्वत: फोन न घेता शेजारच्या मित्राकडं देऊन पुन्हा बोलू लागले. मित्रानं मोबाईल घेतला, दोन शब्द बोलला आणि पटकन झियाउद्दीनजवळ येऊन त्यांच्या कानात सांगितलं, ‘‘आपल्या शाळेच्या बसवर गोळीबार झाला.’’

ही बातमी ऐकताच झियाउद्दीनचा चेहरा काळजीनं काळवंडला. क्षणभर वाटलं बोलणं थांबवून तिकडं पळावं. दुसऱ्या क्षणी त्यांनी विचार केला, आपण आजच्या बैठकीचे आयोजक आणि अध्यक्ष असताना अर्धवट सोडून जाणं ठीक नाही. ते पुन्हा भाषण देऊ लागले; पण सगळी काळजी घटनेकडे टांगलेली. बसमध्ये कोण असेल? या प्रश्नानं त्यांच्या मनाचा थरकाप उडाला. पुन्हा त्यांनी स्वत:ला सावरलं. बोलणं आवरतं घेतलं. कोणालाही अधिक न सांगता दवाखान्याकडं निघाले. तोपर्यंत मलालावर गोळीबार झाला या बातम्या टीव्हीवर सुरू झाल्या होत्या.

अल्लाचा धावा करत ते म्हणाले, तूच करता आणि करविता आहेस! मलाला तर माझ्या काळजाचा तुकडा आहे. धडधडत्या काळजानं ते दवाखान्यात पोहोचले. पलंगावर पडलेली मलाला बघून त्यांनी दाताखाली ओठ दाबून आपलं दु:ख गिळलं. तिच्या डोक्याला पट्टी बांधलेली होती. दु:खावेगानं ते मलालाकडे बघून म्हणाले, ‘‘बेटा, तू माझं सर्वस्व आहेस. तुझी हिम्मत हीच माझ्या जगण्याची प्रेरणा होती आणि तुझी ही अवस्था बघून...’’ त्यांच्या खांद्यावर हात ठेवत डॉक्टर म्हणाले, ‘‘आम्ही तिचा सीटी स्कॅन केला. मेंदूला गोळीनं इजा झाली नाही.’’ हे ऐकून झियाउद्दीन यांनी अल्लाचे आभार मानले. मंगोरा शहरात बातमी पसरली. मलालाला आराम पडावा म्हणून प्रार्थना सुरू झाल्या.

झियाउद्दीनच्या मोबाइलची रिंग ऐकू येऊ लागली. जड अंत:करणानं त्यांनी फोन कानाला लावला. ‘‘मलालाला



जखमी मलालाला पेशावरला नेताना

पेशावरच्या सैनिकी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेण्याची व्यवस्था करत आहोत. आपण काळजी करू नका.'' मुख्यमंत्री फोनवर बोलत होते. पुढे ते म्हणाले, ''आम्ही तुमच्यासोबत आहोत.''

थोड्या वेळात स्वात सैनिकप्रमुख दवाखान्यात पोहोचले. हेलिकॉप्टरने मलालाला पेशावरला घेऊन जायचं आहे. बाहेर अॅम्ब्युलन्स तयार आहे. झियाउद्दीनला काही सुचत नव्हते. तेवढ्यात शिक्षिका मॅडम मरियम तिथं पोहोचल्या. सैनिक कमांडर म्हणाले, ''मलालासोबत आणखी दोघांना हेलिकॉप्टरमधून नेता येईल.'' झियाउद्दीन विचारात पडले. मलालाची आई घरी होती. मलालाला अॅम्ब्युलन्समध्ये ठेवले. वडिलांसोबत मॅडम मरियमही अॅम्ब्युलन्समध्ये शिरल्या. आपल्या आवडत्या विद्यार्थिनीची अवस्था बघून त्यांनी हंबरडा फोडला; पण ही रडण्याची वेळ नाही हे ओळखून त्या मलालाशेजारी गप्प बसल्या.

सैनिकी तळावर हेलिकॉप्टर तयार होते. मलाला, झियाउद्दीन आणि मॅडम मरियमला घेऊन हेलिकॉप्टरने उड्डाण केले. मलालाला घेऊन हेलिकॉप्टरनं पेशावरला निघालो, हे झियाउद्दीन यांनी पत्नीला फोनवरून कळविल्यानं सगळे घराच्या गच्चीवर जमा झाले होते. डोक्यावरून उडणारं हेलिकॉप्टर बघून मलालाच्या आईनं आकाशातल्या देवासमोर पदर पसरून प्रार्थना केली, ''अल्ला, ती तुझीच मुलगी आहे. तूच तिला सांभाळ आता.''

पेशावरच्या सैनिकी हॉस्पिटलमध्ये मलाला पोहोचली त्यावेळी सायंकाळचे पाच वाजले होते. कर्नल जुनैद यांनी तिला तपासले. अर्धवट शुद्धीत तरीही ग्लानीनं शब्दही न बोलणाऱ्या मलालाचा सीटीस्कॅनचा अहवाल बघून त्यांना क्षणभर आश्चर्य वाटले. गोळी सीटीस्कॅनमध्ये दिसत नव्हती. डॉक्टरांनी पुन्हा सीटीस्कॅन केले. डाव्या डोळयाच्या बाजूनं गालातून गोळी डाव्या खांद्यात अडकली होती. हल्लेखोराने जेव्हा गोळी झाडली तेव्हा तिनं मान उजवीकडं वाकविल्यानं गोळी डोक्याऐवजी कानापासून घुसून बाहेर पडून खांद्यात अडकली होती. नशिबानं साथ दिली आणि मेंदूला इजा झालेली दिसत नाही. तीन तासांचं ऑपरेशन करून डाव्या खांद्यातील गोळी बाहेर काढली.

रात्री उशिरा मलालाची आई आणि छोटा भाऊ अटल पेशावरला पोहोचले. आईची भीती खरी ठरली होती. मलाला करत असलेल्या कामाची प्रसिद्धी बघून तिची आई झियाउद्दीन यांना विचारायची,

ही प्रसिद्धीच माझ्या मुलीच्या मुळावर तर उठणार नाही ना?

ती भीती खरी ठरली होती. मलालाला भेटण्यापूर्वी झियाउद्दीनने पत्नीला समजावलं. छातीवर धोंडा ठेवून या प्रसंगाला सामोरी जा. तू रडली, आक्रोश केला तर हिम्मतवान

मुलीचं काळीजही फुटून जाईल.
मन घट्ट करून आई आत आली; मुलीची अवस्था बघून अनावर झालेला हुंदका तोंडात रुमाल कोंबत तसाच दाबला. तोंडातून शब्द न काढता हृदयातील वेदनांना डोळयांतील आसवांनी वाट करून दिली. घट्ट मनानं डोळे पुसून त्यांनी पतीला विचारलं, ‘‘डॉक्टर काय म्हणतात?’’
‘‘स्वातला डॉक्टर म्हणाले होते, गंभीर इजा नाही. इथले डॉक्टरही म्हणाले, मेंदूला इजा झाली नाही. डाव्या खांद्यात गोळी रुतून आहे. ते ऑपरेशन करावं लागेल.’’ झियाउद्दीनने पत्नीला धीर दिला.
दवाखान्याबाहेर मलालाच्या प्रकृतीबद्दल चौकशी करणाऱ्या माणसांची गर्दी जमू लागली. पेशावरचे गव्हर्नर, मंत्री, अधिकारी येऊन मलालाच्या वडिलांना धीर देऊ लागले. टीव्ही चॅनेलवर हाच विषय सुरू होता. या प्रसिद्धीमुळे झियाउद्दीनला आणखी काळजी वाटू लागली.
झियाउद्दीन मलालाजवळ आयसीयूमध्ये बसून होते. बरीच रात्र उलटलेली होती. मलालाची देखभाल करणारे कर्नल जुनैद आले. त्यांच्या हातात कागद होते. झियाउद्दीनला घेऊन ते आयसीयूबाहेर आले आणि म्हणाले, ‘‘चेहऱ्याच्या हाडाला फ्रॅक्चर झाल्याने हाडाचा एखादा तुकडा मेंदूत गेला असावा, त्यामुळे मेंदूतील सूज वाढत आहे. डोक्याच्या कवटीचा काही भाग कापून काढावा लागेल. यामुळं मेंदूच्या सुजेसाठी जागा मिळू शकेल हे केले नाही तर...’’ ते बोलायचे थांबले. मलालाला वाचविण्यासाठी काहीही करायला तयार असल्यानं त्यांनी डॉक्टरांना तात्काळ संमती दिली.
रात्री 1.30 ची वेळ होती. डॉक्टरांनी ऑपरेशन सुरू केले. मलालाचे आईबाबा ऑपरेशन थिएटरबाहेर अल्लाचा धावा करू लागले. सूर्योदयाच्या सुमारास ऑपरेशन संपले. काळरात्र संपली होती आणि आशेची किरणं मातापित्यांच्या मनाला धीर देत होती.
11 ऑक्टोबर, 2012 ला सकाळी पाकिस्तानी डॉक्टर आणि त्यांच्यासोबत दोन ब्रिटिश डॉक्टर रावळपिंडीहून आले. आदल्या दिवशी जनरल कयानी मलालाला बघायला येऊन गेले होते. ते तिच्या वडिलांशी बोलले. त्यांच्या सूचनेनुसार रावळपिंडीहून तज्ज्ञ डॉक्टरांचं पथक आलं होतं.
पाकिस्तानी डॉक्टर्स आणि ब्रिटिश डॉक्टरांनी मलालाचे रिपोर्ट आणि प्रकृती बघून तिला रावळपिंडीच्या सैनिकी रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला. आंतरप्रांतीयमंत्री रेहमान मलिक म्हणाले, ‘‘मलालाला उपचारासाठी जर्मनीला न्या. तिथं तिला योग्य ते उपचार तात्काळ करता येतील. प्रवासात आपल्या डॉक्टरांचं पथक मदतीला असेल. तिचा सर्व खर्च पाकिस्तान सरकार करेल.’’
ब्रिटिश डॉक्टर डॉ. जावेद आणि डॉ. फियोना यांनी मलालाला रावळपिंडीला हलविण्याचा सल्ला दिल्यानं सैनिकी हेलिकॉप्टरनं तेथे नेण्यात आले. डॉ. फियोना या लंडनच्या बर्मिंगहॅम हॉस्पिटलच्या तज्ज्ञ होत्या. त्यांनी सल्ला दिला. मलालाचे आतापर्यंतचे उपचार ठीक आहेत; पण शस्त्रक्रियेनंतर तिची काळजी घेणे त्याहूनही जास्त गरजेचे आहे. नसता प्रकृतीत गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता आहे. फियोना या बालरोगतज्ज्ञ होत्या आणि मलाला, तिचं काम बघताना त्यांच्यातील आईचं हृदय पुढील

धोके स्वीकारायला तयार नव्हतं.



डॉ. फियोना

डॉ. फियोना यांनी जनरल कयानींना सुचविलं, "मलालाला परदेशातील चांगल्या हॉस्पिटलमध्ये हलवावं असं माझं स्पष्ट मत आहे." याच सुमारास अमेरिका व युनोच्या जनरल सेक्रेटरींनीसुद्धा मलालाच्या प्रकृतीसंबंधी काळजी व्यक्त केली.

डॉ. फियोनांना मलालात आपली मुलगीच दिसू लागल्यानं त्या म्हणाल्या, "मी तिला लंडनच्या क्वीन एलिझाबेथ हॉस्पिटलमध्ये घेऊन जाते." प्रश्न निर्माण झाला, मलालाला लंडनला कसे न्यायचे? तो खर्च कोण करणार? झियाउद्दीनही पत्नी आणि मुलांना पाकिस्तानात एकटे ठेवून मलालासोबत जायला नाखूश होते. आपल्या पश्चात पत्नी आणि मुलांचं भवितव्य संकटात सोडायला ते तयार नव्हते. ब्रिटिश डॉक्टरांना ब्रिटिश सरकारला परिस्थिती कळविली. या बातम्या वृत्तपत्रात संभ्रम निर्माण करत होत्या. युनायटेड अरब अमिराती सरकारनं मदतीचा हात पुढे केला. त्यांनी आपलं सुसज्ज विमान यासाठी देऊ केलं. डॉ. फियोना डॉक्टर्स, नर्सच्या मदतीने मलालाला घेऊन 15 ऑक्टोबरला लंडनला आल्या. मलाला आता डॉ. फियोनाचीच मुलगी झाली होती. क्वीन एलिझाबेथ हॉस्पिटलमध्ये तिच्यावर उपचार सुरू झाले. मरणाशी झुंजणाऱ्या पोटच्या गोळयाला डॉक्टरांच्या स्वाधीन करताना झियाउद्दीन यांच्यापुढं अंधार दाटला होता. त्यांनी अल्लाची करुणा भाकली, तूच तिचं रक्षण करणारा आहेस.

मलालाला लंडनच्या क्वीन एलिझाबेथ हॉस्पिटलमध्ये दाखल केल्याची बातमी समजताताच ब्रिटनचे माजी पंतप्रधान गॉर्डन ब्राऊन तात्काळ दवाखान्यात आले. युनोच्या जागतिक शिक्षणाचे ते विशेष राजदूत होते. ते मान्यवर लेखक असून त्यांनी अनेक ग्रंथ लिहिलेले होते. मलाला करत असलेल्या कामाबद्दल त्यांना अभिमान होता. त्यांनी मलालावर उपचार करणाऱ्या डॉ. फियोनाशी चर्चा केली. युनायटेड किंगडमच्या पंतप्रधानांनी लगोलग जाहीर केलेल्या प्रसिद्धीपत्रकात सांगितले की, "आम्ही आज मलालासाठी प्रार्थनादिवस जाहीर करत आहोत. मी मलाला आहे, ही आमची घोषणा असणार! मलालाची मुलींच्या शिक्षणासाठी शांततेची जी लढाई सुरू आहे, तिला या घोषणेने आम्ही पाठिंबा देत आहोत." आमची घोषणा आहे की, 2015 पर्यंत एकही बालक शाळेशिवाय राहणार नाही. मलालासारख्या जगातील सर्व मुलींना त्यांचा शिक्षणाचा मूलभूत अधिकार मिळावा, असे आमचे प्रयत्न राहणार आहेत. पाकिस्तानच्या पंतप्रधानांना मी हे आवाहन सादर करणार आहे. यात तीन प्रमुख मागण्या आहेत. पाकिस्तानने प्रत्येक मूल शाळेत जाईल याकरिता तात्काळ आराखडा आखावा. जगातील सर्व देशांना आम्ही आवाहन करत आहोत, मुलगी आणि मुलगा असा शिक्षणात भेदाभेद करू नका. शिक्षणासाठी काम करणाऱ्या जगभरातील संघटनांना आमची विनंती आहे, त्यांनी

शाळेबाहेर राहिलेले 6 कोटी बालक 2015 च्या आत शाळेत जातील, असा प्रयत्न करावा.”
मलालाला लंडनच्या हॉस्पिटलमध्ये दाखल केले त्याच्या दुसऱ्या दिवशी प्रकाशकिरणांनी तिची खोली उजळली होती. तिच्यावर गोळया झाडल्या त्या दिवसापासून ती बेशुद्धावस्थेतच होती. डॉक्टरांनी उत्तम उपचारांचे प्रयत्न केले होते आणि जगाच्या कल्याणाचं स्वप्न पाहणाऱ्या परीची काळजी जगन्नियंत्याला होती. तो परमेश्वर कधी अल्ला असतो, जिझस असतो, गौतम बुद्ध असतो, तर कधी महावीर असतो. निसर्गचक्र आणि काम करणाऱ्या प्रत्येक लेकराची त्यालाच काळजी असल्याने सोळा ऑक्टोबरला चमत्कार घडला.
मलालाने डोळे उघडले. प्रदीर्घ झोपेतून जणू ती जागी झाली. बेशुद्धी आणि शुद्धीवर या सीमारेषांवरचं हिंदोळणं सुरू झालं. प्रथमच तिला आठवण झाली बसमध्ये शिरलेल्या हत्यारबंद हल्लेखोरांची! दुसऱ्याक्षणी तिनं अल्लाचे आभार मानले. आपण स्वप्नात तर नाही ना! ती स्वत:ला विचारू लागली.
मलाला शुद्धीवर आल्याची खबर डॉ. फियोना यांना कळताच त्या लगबगीनं आल्या. मलालाला बघताच त्यांचे आईचं हृदय प्रेमानं भरून आलं. आईला धर्म नसतो, रंग नसतो, असतो मातृप्रेमानं ओसंडून वाहणारा फक्त प्रेमाचं झरा. डोळयांत साठलेलं पाणी कर्तव्यभावनेनं त्यांनी टिपलं. हातातील बाहुली मलालाला देत त्या हसल्या. भगवान येशूनं त्यांच्या हाताला यश दिल्यानं त्यांनी मनोमन आभार मानले.
मलालाची प्रकृती हळूहळू सुधारू लागली. एके दिवशी डॉक्टरांनी तिला गोड बातमी ऐकवली. लवकरच तुझे बाबा, आई आणि भाऊ तुला भेटायला येत आहेत. या बातमीनं मलालाला खूप आनंद झाला. तो तिच्या चेहऱ्यावर दिसू लागला.
मलाला ही परमेश्वराचं लाडकं बाळ आहे. तोच सर्वांचं रक्षण करतो आणि तोच संकटातून बाहेरही काढतो. हे मलालावर ओढावलेल्या जीवघेण्या संकटातून दिसून आलं. कोण लंडनची एक माता डॉक्टररूपाने पेशावरला येते. मुलींच्या शिक्षणाचं स्वप्न पाहणारी दुसरी मदर तेरेसाच तिला मलालाच्या रूपानं दिसू लागावी, हा योगायोग समजावा की अदृश्य शक्तीची ही किमया म्हणावी? डॉ. फियोनाच्या रूपानं मलालास आणखी एक आई लाभली. जन्मदाती आई दूर पाकिस्तानात असताना लंडनच्या या मातेनं या बालिकेची काळजी घेत येशूला साकडं घातलं.
दीर्घकाळाच्या बेशुद्धावस्थेतून मलाला बाहेर आली. डॉक्टरी उपचारास ती चांगला प्रतिसादही देऊ लागली. मलाला पूर्णत: बरी होईल, हा आशावाद बळावला. या एवढ्या अपघातात मलालाच्या मेंदूला धक्का पोहोचला नव्हता, ही विधात्याचीच कृपा म्हणायची. एकविसाव्या दिवशी मलाला उठून बसली.
झियाउद्दीन पत्नी-मुलांसह लंडनला पोहोचले. आपल्या मुलीला बघून त्यांनी आकाशाकडे बघत अल्लाची प्रार्थना केली. आईबाबा आणि भावास बघताना मलालाच्या मनात पहिला विचार येऊन गेला, माझ्या या अपघाताच्या खर्च बाबांनी कसा केला असेल?



क्वीन एलिझाबेथ हॉस्पिटल, बर्मिंगहॅममध्ये कुटुंबीयांसोबत मलाला

जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात दवाखान्यातून सुट्टी मिळाली. पाकिस्तान सरकारनं झियाउद्दीनला ब्रिटिश वकालतीत नोकरी देऊन राहण्याची सोय केल्यानं ते पश्चिम मिडलँडमध्ये राहायला आले. दोन फेब्रुवारीला दवाखान्यात तपासणीसाठी बोलवण्यात आले. त्या दिवशी पाच तासाचे ऑपरेशन होऊन कवटीचा भाग पूर्ववत बसविण्यात आला. ऐकता यावं म्हणून डाव्या कानाजवळ ऐकण्याचं यंत्र ऑपरेशन करून बसविलं. यानंतर तिची प्रकृती पूर्ववत होत गेली.

मलालाची डॉक्टर आई, डॉ. फियोना मलालाला म्हणाली, ‘‘जगभरातील हजारो माणसांनी, मुलांनी तू लवकर बरी व्हावीस म्हणून शुभेच्छा पत्रं पाठविली आहेत. अनेक पुष्पगुच्छ पाठविलेत. जगातील हे सर्व लोक तुझ्यासाठी प्रार्थना करत होते.’’ मलालाला जाणवले, या सर्वांमुळेच मला हा पुनर्जन्म लाभला. यात सर्व डॉक्टरांचे प्रयत्नही महत्त्वाचे आहेत.

मलालाला शाळा आणि पाटीपुस्तकांची आठवण होऊ लागली. मार्च महिना सुरू झाला. झियाउद्दीन यांनी बर्मिंगहॅमच्या एडगबस्टॅन हायस्कूलमध्ये मलालाचे नाव घातले. नवी शाळा, नव्या वातावरणात ती पुन्हा रमली; पण तिच्या मनात विचार आले. आपल्यावर गोळी झाडणाऱ्या माणसांना सांगायचं राहून गेलंय –



मलालासाठी जगभरात प्रार्थना

**तुम्ही तुमच्या घरी बहीण आणि मुलीला शिकवा. शिक्षणापासून त्यांना दूर ठेवू नका; कारण शिक्षण घेणं हा मुलींचा अधिकार आहे.**

मलालाच्या हल्ल्याचे जगभरात उलटसुलट प्रतिसाद उमटू लागले. मलालाबद्दल सहानुभूती आणि हल्लेखोरासंबंधीचा रागही यातून व्यक्त केला जाऊ लागला. पाकिस्तानातील अनेक शहरात या विरुद्ध निषेध आणि निदर्शनं होऊ लागली. वीस लक्ष लोकांनी जाहीरनाम्यावर सह्या करून मुलींना शिक्षणाचा अधिकार द्या, अशी मागणी केली. पाकिस्तान सरकारवर या दबावाचा परिणाम होऊन शिक्षण अधिकार कायदा पास करण्यात आला.

हल्लेखोरांची माहिती पुरविणाऱ्यास एक कोटी रुपयांचे बक्षीस सरकारने जाहीर केलं.

लंडनच्या ओव्हर ऑफिसमध्ये बराक ओबामा, मिशेल ओबामा आणि त्यांची कन्या मालिया यांनी मलालाची भेट घेऊन सांगितलं, ‘‘आम्ही तुमच्याबरोबर आहोत. हे कृत्य दोषार्ह, किळस उत्पन्न करणारं आणि शोकांतिकेची परिसीमा आहे.’’ यावेळी झियाउद्दीन म्हणाले, ‘‘मलालाला इथं उपचारासाठी आणण्यात आलं तेव्हा आम्ही पाकिस्तान सोडण्याचा विचार केला नाही. माझी मुलगी मृत्यूशी झगडत होती, तेव्हाही पाकिस्तानात शांतता नांदावी, हाच विचार मी करत होतो. तालिबानी माणसं त्यांच्या बंदुकीच्या गोळयाच्या धाकानं स्वातंत्र्याचा आवाज बंद करू शकणार नाहीत.’’

यूएनओ सेक्रेटरी जनरल बान-की-मून मलालावरील हल्ल्याचा तीव्र निषेध करत म्हणाले, ‘‘अत्यंत दुष्टपणाचे आणि भ्याडपणाचे कृत्य आहे.’’ अमेरिकेच्या सेक्रेटरी ऑफ स्टेट हिलरी क्लिंटन मलालाचं कौतुक करत म्हणाल्या, ‘‘मुलींच्या शिक्षणासाठी हिमतीनं उभी राहिलेली ती वीरबाला आहे. ब्रिटनचे परदेश सचिव विल्यम हेग म्हणाले, ‘‘हे रानटी कृत्य आहे. केवळ पाकिस्तानच नव्हे तर जगातील सगळयांना या जंगलीकृत्यानं धक्का बसला आहे.’’

मलालावर हल्ला झाला त्या दिवशी प्रसिद्ध अमेरिकन गायिका मॅडोनाचा कार्यक्रम सुरू होता. ही धक्कादायक बातमी ऐकताच तिनं गाणं थांबवून मलालासाठी प्रार्थना करून आपलं ‘मानवी शक्ती’ हे गाणं तिच्या प्रकृतिस्वास्थ्यासाठी अर्पण केलं.

जगभरातून मलालावरच्या हल्ल्याचे निषेध होत असताना पाकिस्तानातील तालिबान संघटनेचा प्रवक्ता आपली प्रतिक्रिया देत म्हणाले, ‘‘मलाला ही कोणत्याही धर्मावर श्रद्धा नसलेली आणि बीभत्सतेची प्रतीक आहे. जर ती या हल्ल्यातून पुढं बचावली तर आम्ही पुन्हा तिला सोडणार नाही.’’ दुसऱ्या एका संघटनेनं आरोप केला - पाश्चिमात्यानं ब्रेनवॉशिंग केलेली ती बाहुली आहे. आम्ही तिच्या वडिलांना वारंवार सूचना दिल्या होत्या. ती धर्माबद्दल जी गलिच्छ भाषा वापरते ते बंद करा. इस्लामविरुद्ध अपप्रचार करणाऱ्यांना मारणं हीच धर्माची शिक्षा आहे. शरियत असं सांगतं, जर एखादं मुलंही इस्लामविरुद्ध प्रचार करत असेल तर त्याला संपवलं पाहिजे.

यासारखा उलटसुलट प्रतिक्रिया प्रसारित होत होत्या.

12 ऑक्टोबर, 2012 ला पन्नास मुस्लिम धर्मपंडितांनी एक फतवा जाहीर केला.

तालिबान्यांनी मलाला हिला ठार मारण्याचा प्रयत्न करणं, हे इस्लामच्या शिकणुकीविरुद्धचं कृत्य आहे. सुन्नी पंथांच्या मुस्लिम पंडितांनीही या भेकड हल्ल्याचा निषेध केला. यासोबत पाकिस्तानातील एक गट हळू आवाजात म्हणत होता, हे दुसरे तिसरे काही नसून अमेरिकन सीआयए या गुप्तचर संघटनेचं कारस्थान आहे.

कॅनडाचे पंतप्रधान स्टीफन हार्पर यांनी मलालाला शांततेचं नोबेल पारितोषिक मिळावं, अशी पुरस्कार समितीकडे शिफारस केली. यापूर्वी दक्षिण आफ्रिकेतील आर्चबिशफ डेस्मंड टूटू यांनी डच येथील मुलांसाठीच्या शांततेच्या पुरस्कारासाठी 2011 ला शिफारस केली होती.

शांततेच्या नोबेल पुरस्काराची जेव्हा चर्चा सुरू झाली तेव्हा मलाला नम्रपणे म्हणाली, ‘‘पुरस्कार आणि बक्षिसांच्या रकमापेक्षा, मला दुसऱ्यास मदत करायची आहे. मी देवाकडं नेहमी हीच प्रार्थना करते की, या कामासाठी मला शक्ती देऊन मदत कर.’’

❖ ❖ ❖

# सन्मान आणि
# पुरस्कारांची रेलचेल

“दहशतवादी शिक्षणाच्या ताकदीला आणि स्त्रियांना घाबरतात. त्यांना पेन आणि पुस्तकांची भीती वाटते.”

कामाचं कौतुक आणि प्रोत्साहन हे काम करणाऱ्या माणसात आणखी काम करण्याची ऊर्जा निर्माण करीत असतं. ही ऊर्जाच त्याच्या पुढील प्रवासाचं इंधन ठरत असतं. योग्य वयात असं प्रोत्साहन आणि कौतुक वाट्याला आलं की, सर्जनशीलतेचा फुलोरा फुलत जातो.

मलाला हे मानवकल्याणाचा ध्यास घेतलेलं एक जिवंत स्वप्न आहे. हे स्वप्न सर्वव्यापी आहे. सगळ्या धर्मांनी, संतांनी, युगपुरुषांनी समानतेचा संदेश देत अज्ञानरूपी अंधकाराला दूर करण्यासाठी शिक्षण हे एकमेव शस्त्र आहे असं सांगितलं आहे. मानवाचं कल्याण परिवर्तनाच्या मार्गाने शिक्षणच करू शकेल, असं सगळे सांगत आले आहेत. विश्वबंधुत्व आणि स्त्री-पुरुष समानता हाच तो मार्ग आहे. त्याकरिता मुलीला शिक्षण देणं, हे अत्यावश्यक आहे. त्यासाठी बालवयात जबाबदारीनं काम करणाऱ्या मलालाच्या या कामाची दखल जगभरातील महत्त्वाच्या संस्थांनी वेळीच घेऊन तिला अनेक महत्त्वाच्या सन्मानांनी आणि पुरस्कारांनी गौरविण्यात आलं.

वर्षभरात जगभरातील अनेक पुरस्कारानं आणि गौरवानं तिला सन्मानित करण्यात आलं. या निमित्तानं मिळालेली रक्कम तिनं मलाला फंडात जमा करून पाकिस्तान आणि जगभरातील शाळा न शिकू शकणाऱ्या मुलींच्या शिक्षणासाठी देण्याची जबाबदारीही स्वीकारली. नुकतेच तिला शांततेचे नोबल पारितोषिकही विभागून मिळाले आहे. या सर्व पुरस्कारांची नावे, देणाऱ्या संस्थेच्या नावांची यादी परिशिष्टात जोडली आहे.

हॉर्वर्ड विद्यापीठात नऊशे प्रेक्षकांसमोर 13 ऑक्टोबर, 2013 ला बोलताना मलाला म्हणाली, “माझ्यावर गोळीबार झाला म्हणून मी आपला पाठिंबा मुळीच मागत नाही. मुलींच्या शिक्षणासाठी आणि शांततेसाठी तुमचा पाठिंबा हवा आहे. मुलींच्या शिक्षणाच्या हक्कासाठी लढा देत अल्पावधीत जागतिक स्त्री शिक्षणाची आयकॉन ठरलेल्या मलालाला जगप्रसिद्ध हॉर्वर्ड विद्यापीठानं मानवतावादी पुरस्कारानं गौरविले. तालिबान्यांच्या धमकीनंतरही मुलींच्या शिक्षणाचा वसा घेतलेली ही पाकची शांतिदूत जगभर कौतुकाचा विषय ठरली. अल्पवयातील तिची प्रगल्भता आणि धाडसाची दखल घेत तिला अनेक मानाचे पुरस्कार प्रदान केले जात आहेत. हॉर्वर्ड विद्यापीठात पुरस्कार स्वीकारताना ती म्हणाली, “महिलांच्या हक्कासाठी जागतिक समुदायानं एकत्र येण्याची गरज आहे. मला पूर्वी डॉक्टर व्हावं वाटायचं; पण आता मला राजकारणात यायचं आहे. राजकारणी मंडळींचा समाजावर प्रभाव असल्याने, यांचं हे क्षेत्र मी निवडणार आहे. मी आज ब्रिटनमध्ये राहत आहे. दूरवरच्या स्वातमधील माझ्या घराची मला आठवण येत आहे.”



हॉर्वर्ड विद्यापीठात मलाला

पाकिस्ताननं 2011 चा आंतरराष्ट्रीय मुलांसाठीचा शांततेचा पुरस्कार मलालाला जाहीर केला. यावेळी तिने शांतता आणि बालकांच्या शिक्षणाचा हक्क हिरावून घेऊ नका, अशी सरकारला विनंती केली होती. ती म्हणाली, ‘‘शिक्षण हीच प्रगती आणि परिवर्तनाची गुरुकिल्ली आहे. मुलींच्या शाळा दहशतवादी बंद करतात, मोडतोड करतात. त्यांना मला एकच सांगायचं आहे. तुमची मुलगी, तुमच्या बहिणीला तुम्ही शिकवणार आहात की नाही?’’

नेदरलँडच्या बालकांच्या हक्कांबद्दल कार्य करणारी नेदरलँडची संस्था आंतरराष्ट्रीय शांततेचा पुरस्कार मुलांना देत असते. 2013 च्या पुरस्कारासाठी मलालाची निवड करण्यात आली. 2011 चे शांततेचे नोबेल पुरस्कार विजेते तवक्कल करमान यांच्या हस्ते मलालाला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार समितीचे अध्यक्ष मार्क डुल्लार्ट म्हणाले, ‘‘मलालाचं कार्य हे मुलांसाठी आणि मोठ्यांसाठी प्रेरणा देणारे आहे. जगभरातील शाळा न शिकू शकणाऱ्या बालकांना शिकवा, या तिच्या मागणीनं जगभरानं लक्ष वेधलं. बालकांचा आवाज दाबू नका, ही महत्त्वाची मागणी आहे. जीवघेण्या हल्ल्यानंतरही तिनं शांततेच्या मार्गानं दाखविलेलं तिचं धैर्य फार महत्त्वाचं आहे. मलालाचं नाव 2014 च्या शांततेच्या नोबेल पारितोषिकासाठी सुचविलं गेलं आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे.’’ यावेळी उत्तर देताना ती आवर्जून म्हणाली, ‘‘माझी ही शिफारस फार लवकर होतेय, असं माझं प्रामाणिक मत आहे. मला अजून खूप काम करायचं आहे. एक मात्र मी प्रामाणिकपणे कबूल करते - या शिफारशीमुळे जगभरातील शाळा न शिकू शकणाऱ्या मुलांच्या प्रश्नाकडं सगळे गंभीरपणे पाहू लागले आहेत.’’



आंतरराष्ट्रीय शांतता पुरस्कार

टाइम्स मॅगझीननं 2012 च्या जगभरातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची यादी जाहीर केली. यात राजकारण, समाजकारण, उद्योग, विज्ञानक्षेत्रातील लक्षणीय काम करणारी मंडळी होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा, इजिप्तचे अध्यक्ष मोहम्मद मोरसी, मानवकल्याणासाठी झटणारे बिल आणि हिलरी क्लिंटन, मारिसा मेअर वटिम कूक हे उद्योगपती, दिग्ज बॉसन वैज्ञानिकांसोबत मलालाचीही निवड करण्यात आली.

सामाजिक, न्यायासाठीच्या मदर तेरेसा आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठीही मलालाची निवड करण्यात आली. मलाला दवाखान्यात असल्यानं स्वत: या पुरस्कारास उपस्थित राहू शकली नाही. तिच्या वडिलांनी पुरस्काराबद्दल समितीला कृतज्ञापूर्वक कळविलं, ''आमच्या अडचणीच्या आणि संकटाच्या काळात या सन्मानानं आम्हाला बळ मिळालं. मी मलालाजवळ असल्यानं येऊ शकलो नाही. मलालानंही सर्व भारतीय मित्रांचे आभार मानले.

इटाली सरकारनं मलालाला सन्माननीय नागरिकत्व बहाल करून, 2011 चा रोमची सन्माननीय नागरिक सन्मान मलालाला जाहीर केला. इटालीतील मानवी हक्कासाठी लढा देणाऱ्या अँजेला स्टिएना म्हणाल्या, ''मलाला आता एकटी नाहीये! आम्ही सगळे तिच्या सोबत आहोत.''

फ्रान्सच्या महिलांच्या स्वातंत्र्यासाठीचा सिमॉन - दे - बॉदलेअर 2013 चा पुरस्कार मलालाला जाहीर झाला. मानवी हक्क आणि विशेषत: मुलींच्या शिक्षण अधिकारासाठी काम करण्याचा हा सन्मान आहे, असं समितीनं गौरवानं म्हटलंय. मलालाच्या बाबांनी तिच्यातर्फे हा पुरस्कार स्वीकारला. पुरस्कार समितीनं आवर्जून सांगितलं, ''स्त्री शक्तीच्या हक्कासाठी आणि हिंसेविरुद्ध शांततेनं संघर्षाचा हा सन्मान आहे.''


नॅशनल युनियन ऑफ टीचर्सच्या दि फ्रेड अॅण्ड अॅन जार्विस सन्मानासाठी मलालाची निवड करताना जनरल सेक्रेटरी ख्रिस्टिनी ब्लोवर म्हणाले, ''मलालानं जगभरातील मुलांना शिकवा हे जे आवाहन केलं त्यानं आम्ही हेलावून गेलो. जगभरातील अनेक देशातील मुलांना शिक्षण घेताना अनेक अडचणी आणि संघर्षांना तोंड द्यावं लागत आहे. मुलींना शिकवा या मलालाच्या हाकेनं आम्हाला जागं केलं. अनेक वर्षं या प्रश्नाकडं जगाचं लक्ष नव्हतं. मलालानं सगळ्यांच्या डोळ्यात अंजन घातलं आहे.''

वॉशिंग्टन येथे वायटेल व्हायसेस ग्लोबल लीडरशिप ही संस्था कार्य करते. डी. सी. क्लिंटन यांनी संस्थेची स्थापना केली आहे. जगभरातील स्त्रीशक्ती वाढविण्यासाठी, त्यांना आर्थिक संधी उपलब्ध करून देऊन मानवी हक्कासाठी कार्य करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांचा सन्मान ग्लोबल लीडरशिप पुरस्कारानं केला जातो. 2013 साली मलालाची निवड करण्यात आली.

आयर्लंडचा अॅम्नेस्टी टॉप मानवाधिकार पुरस्कार मलाला आणि शाऐंशी वर्षांचे मि. बेलाफोन्टे यांना जाहीर झाला. बेलाफोन्टे पुरस्कार स्वीकारताना म्हणाले, ''आजच्या काळातील नायिका असलेल्या मलालासोबत माझा सन्मान होतोय, याचं मला खूप समाधान आहे. तिच्या आतापर्यंतच्या कामानं मी थक्क झालोय. अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध लढण्याचा संदेश तिनं जगाला दिला. तिच्यासोबत माझा सन्मान होतोय, याबद्दल मी कृतज्ञ आहे.'' मुलींच्या शिक्षणासाठी अल्पायुष्यात लक्षणीय काम करत असलेल्या मलालाचा अद्वितीय असा हा गौरव आहे.

युनायटेड किंगडमच्या अॅन फ्रँक ट्रस्टनं 2012 च्या नैतिक ध्यैर्यासाठी दिल्या जाणाऱ्या सन्मानासाठी मलालाची निवड केली. अॅन फ्रँक ट्रस्टचे कार्यकारी संचालक गिलियन वॉलनेस तिच्याबद्दल म्हणाले, ''मलाला ही आजच्या काळात अद्भुत काम करणारी बहादूर बालिका आहे. ती लहान असली तरी अॅन फ्रँकसारखी प्रेरणा देणारी शिक्षण

प्रसारक आहे.”
मलालाला स्वीडनच्या वर्ल्ड चिल्ड्रेन संस्थेकडून ‘बाल नोबेल पुरस्कारा’नं सन्मानित केलं गेलं. पाकिस्तानातील मुलींना शिक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी 11 व्या वर्षांपासून धैर्याने लढा देणाऱ्या मलाला युसूफजाईला तिच्या शौर्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याचं संस्थेनं म्हटलं आहे. पन्नास हजार डॉलर व सन्मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. पुरस्काराची रक्कम मलालानं इस्राइल पॅलेस्टाइन संघर्षात उद्ध्वस्त झालेल्या गाझापट्टीतील शाळांच्या पुनर्बांधणीसाठी संयुक्त राष्ट्राला दान दिली. “पॅलेस्टाइनमधील मुलामुलींसह जगातील प्रत्येक बालकाला सुरक्षित वातावरणात चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे, यासाठी तुमच्या माझ्यासह सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची गरज आहे,” असं पुरस्कार घेताना ती म्हणाली.
युरोपियन संघाच्या संसदेनं ‘सॅकॅरोव्ह मानवाधिकार’ पुरस्कारासाठी मलालाची निवड केली. “अल्पवयीन मलाला ही एक आदर्श मानवाधिकार कार्यकर्ती आहे. तिच्या धैर्याचा गौरव म्हणून आम्ही हा सन्मान तिला देत आहोत. तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी आमच्या खूप खूप शुभेच्छा आहेत.” पुरस्कार समितीनं तिच्याबद्दल उद्गार काढले. याच सुमारास शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी मलालाचं नामांकन झाल्याची बातमी आली. यावर मलाला नम्रपणे म्हणाली, “शांततेच्या नोबेल पुरस्काराचे खरे मानकरी असलेल्या अनेक व्यक्ती या जगात वेगवेगळ्या क्षेत्रात काम करत आहेत. त्यांचं कर्तृत्व महान आहे. अगोदर त्यांना हा पुरस्कार मिळावयास हवा. त्यांच्यासमोर माझे काम काहीच नसल्यानं या पुरस्कारासाठी मी अजिबात पात्र नाही. मी नुकतेच कामाला सुरुवात केली असून अजून बराच दूरचा पल्ला गाठावयाचा आहे.”



नोबेल पुरस्कार जाहीर झाल्यानंतर प्रतिक्रिया देताना

मलाला लंडनमधील तिच्या शाळेत होती. जीवशास्त्राचा तास सुरू होता. बाहेरून एक शिक्षक आले आणि म्हणाले, “मलालाचं अभिनंदन करावयाचं आहे!” मलालाला अलीकडे वेगवेगळे पुरस्कार मिळत असल्यानं असाच कोणतातरी पुरस्कार असावा, असं तिला वाटलं. शिक्षक आनंदानं म्हणाले, “मलाला शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार तुला नुकताच जाहीर झाला आहे, असा फोन आला आहे! अर्धा तासात टी. व्ही. व वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना मुलाखत आणि तुझी प्रतिक्रिया द्यायची असते, असा नोबेल पुरस्कार समितीचा नियम आहे.
“पुरस्काराच्या बातमीबद्दल धन्यवाद सर, आता चालू वर्ग सोडून मी मुलाखतीसाठी येऊ शकत नाही. माफ करा, शाळा सुटल्यानंतर मी त्यांच्याशी बोलेन.” मलाला नोबल पुरस्कार मिळाल्याचा निरोप घेऊन येणाऱ्या शिक्षकास शांतपणे म्हणाली. बायोलॉजीच्या शिक्षकानं आपला पाठ शिकविणं सुरू केलं. शाळा सुटेपर्यंत मलाला वर्गातून बाहेर आली

नाही.

❖ ❖ ❖

# संयुक्त राष्ट्र संघाचा
# मलाला दिन

"बलाढ्य देश युद्धांसाठी बंदुका देऊ शकतात; पण पुस्तकं का देऊ शकत नाहीत?"
जगभरातल्या मुलींना शिक्षण मिळालं पाहिजे असं सांगणारी धैर्यशाली मलाला ही आज सगळयांसाठी एक आश्चर्य झाली आहे. तिच्या तर्कनिष्ठ व धीरोदात्त भूमिकेमुळे चिडलेल्या तालिबान्यांनी फतवा काढला - मुलींच्या शाळा बंद करा. या फतव्याविरुद्ध आवाज उठवून प्रत्यक्षकृती करणाऱ्या मलाला आणि तिच्या सोबतच्या दोन मैत्रिणींवर निर्घृण हल्ला झाला; परंतु राखेतून फीनिक्स पक्षी उभा राहावा याप्रमाणे मलाला शांततेचा संदेश देत पुन्हा उभी राहिली. शाळेत जाऊ लागली. मुलींच्या शिक्षणाच्या हक्कासाठी आपला शांततेचा यज्ञ तिनं पुन्हा सुरू केला.

या जगात शांततेचा संदेश देणारे भगवान गौतमबुद्ध, येशू ख्रिस्त, महंमद पैगंबर, मार्टिन ल्यूथर किंग, महात्मा गांधी या शांतिपुरुषांचा संदर्भ देत कोवळ्या वयाची मलाला बालशिक्षणासाठीचा संघर्ष करत होती. तिचं बोलणं, तिचं वागणं आणि तिची क्षमाशील वृत्ती ही विश्व मानवतेचा पुरस्कार करणारी होती. वाईट वागणाऱ्या विरुद्ध तिच्या मनात अपार करुणाच दाटून येत असे. चुकीचे कृत्य करणाऱ्यास कळत नाही आपण काय करतो, त्यामुळे हे अल्ला-भगवान त्यांना माफ कर. आपली चूक त्यांना उमजेल असं शहाणपण येऊ दे. मला त्यांच्याहीपेक्षा त्यांच्या घरच्या बालकांची काळजी वाटते. ती मुलं शिक्षणापासून वंचित आहेत. वर्षानुवर्षे अज्ञानामुळे त्यांचा अंधारयात्रेतील दारिद्र्याचा प्रवास सुरू आहे. या बालकांच्या जीवनात शिक्षणाची प्रकाशकिरणं एकदा डोकावली की, त्यांच्या मनातील दुष्टप्रवृत्तीचे मळभ हळूहळू दूर होईल. माझा लढा या हजारो मुलांच्या शिक्षणासाठीचा आहे. विशेषत: मुलींच्या शिक्षणासाठीचा! मी निराशावादी मुळीच नाही. काळोख्या रात्रीनंतर पहाटेची लाली अन् नंतर प्रकाशाची उधळण ही निसर्गाची किमया आहेच ना! आजच्या अडचणींवर हाच माझा आशावाद आहे.

मलालाचा हा जबरदस्त आशावाद जगभरातील संवेदनशील मंडळींच्या मनात चैतन्याची लाट निर्माण करू लागला. संयुक्त राष्ट्रसंघाचं मलालाच्या जबाबदारीच्या कामाकडे लक्ष होतंच. तिच्या मानवतेच्या संघर्षानं जगभरातील मानवतावाद्यांचं लक्ष वेधून घेतलं होतं. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली.

12 जुलै, 2013 ला मलालाचा सोळावा वाढदिवस येणार होता. तिचा वाढदिवस हा 'मलाला दिवस' म्हणून युनोनं साजरा करण्याचा निर्णय झाला. जगभरातील तरुणांसाठी मलालाचं कार्य हा एक महत्त्वाचा संदेश होता. एका बारा वर्षांच्या मुलीनं जगभरातील मुलांच्या शिक्षणासाठी कार्य करण्याचा आदर्शपाठ जगापुढं आणला होता.

युनायटेड नेशन्सचं मुख्यालय अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात आहे. 12 जुलैला मलालाला सन्मानानं या ठिकाणी बोलावलं गेलं. राष्ट्रसंघाचे जनरल सेक्रेटरी बान-की-मून यांनी मलालाचा सत्कार केला. तिच्या कामाचा गौरव करताना जनरल सेक्रेटरी बान म्हणाले, "सर्वांना शिक्षण द्या, या मलालाच्या धैर्यशाली मागणीसाठी युनायटेड नेशन्स तिचा गौरव करत आहे.

“मलाला बेटी, तू आता एकटी नाहीस. आम्ही सगळे तुझ्यासोबत आहोत, नव्हे तुझ्या पाठीमागं उभे आहोत.”



संयुक्त राष्ट्रसंघात बान-की-मून यांच्यासोबत

जगभरातील एक हजारांहून अधिक तरुण कार्यकर्ते या समारंभास उपस्थित होते. इंग्लंडचे माजी पंतप्रधान गॉर्डन ब्राऊन हे युनोचे जागतिक शिक्षण संयोजक म्हणून आले होते. जगभरातील राष्ट्रांचे प्रतिनिधी सोळा वर्षांच्या या मुलीच्या कर्तृत्वाचा गौरव बघू लागले. मलाला जगभरातील तरुण-तरुणींना प्रोत्साहन देणारी (ग्लोबल आयकॉन फॉर गर्ल्स एज्युकेशन) मुलींच्या शिक्षणाची ‘विश्वनायिका’ ठरली होती. याचं उदाहरण देत जनरल सेक्रेटरी बून पुढं म्हणाले, ‘‘मी तरुणांना मलालाचं उदाहरण देऊन सांगत आहे - मित्र-मैत्रिणींनो, तुम्ही अन्यायाविरुद्ध आवाज उठवा! अज्ञानाविरुद्ध ज्ञानानंच मात करता येते आणि याकरिता मुलींच्या शिक्षणासाठी तुम्ही जगभर एक दबाव गट निर्माण करा. मलालाच्या निमित्तानं जगभर एक चांगला संदेश गेला आहे. हा संदेश आशेचा आहे, स्वावलंबी बनण्यासाठी हक्क बहाल करण्याचा आहे. आत्मसन्मान आणि स्वयंपूर्ण होण्यासाठी हा संदेश फार महत्त्वाचा आहे. इथं जमलेली हजारांहून अधिक तरुण नेते मंडळी या संदेशाचं स्वागत करणारी पहिली आघाडी आहे.’’

‘‘संयुक्त राष्ट्रसंघाचे आदरणीय जनरल सेक्रेटरी बान की मून, संयुक्त सभेचे अध्यक्ष माननीय यूक जेरिमिक, यूएनओ सर्वांसाठी शिक्षणाचे प्रमुख मा. गोरडॉन ब्राऊन, आदरणीय सर्व ज्येष्ठ आणि बंधू आणि भगिनींनो! आपणा सर्वांना सलाम आलेकूम.

मध्यंतराच्या दीर्घकाळाच्या खंडानंतर मी आज आपल्यासमोर बोलण्यासाठी उभी आहे, हा मी माझा सन्मान समजते. आपल्या आदरणीय व्यक्तींच्या सोबत असण्याचा हा माझ्या आयुष्यातील सर्वांत मोठा क्षण समजते. मोहतरमा बेनझीर भुट्टो यांची मायेची शाल माझ्या खांद्यावर आज आहे, मी माझा मायेचा आधार समजते.

माझ्या बोलण्याची सुरुवात कुठून करावी, हे मला आज सुचत नाही. श्रोते माझ्याकडून काय ऐकण्याची अपेक्षा धरून आहेत, याचीही मला कल्पना नाही; पण सर्वप्रथम मी त्या कृपावंत परमेश्वराचे आभार मानते. त्याच्यासमोर आपण सगळे एकच आहोत. त्यानंतर मी आपल्या प्रत्येकाचे अंत:करणापासून आभार मानते. आपल्या सर्वांच्या प्रार्थनेने आणि आशीर्वादाने मी संकटातून लवकर बाहेर आले. माझ्यासाठी हा नवा जन्मच झाला आहे. जगभरातील सगळयांनी माझ्याबद्दल दाखवलेली मायेची मी कल्पनाही करू शकत नाही. जगाच्या कानाकोपऱ्यातून माझ्यावर शुभेच्छांचा वर्षाव झाला, भेट वस्तूंतून आपल्या प्रेमाची ऊब मिळाली. या सगळयांबद्दल आपले आभार कसे मानावे?

जगभरातील मित्र-मैत्रिणींच्या निरागस शब्दांनी मला या संकटातून बाहेर पडण्यासाठी

बळ दिलं. वडीलधाऱ्यांच्या प्रार्थनेतून मला पूर्वीची शक्ती परत मिळाली. पाकिस्तान, युनायटेड अरब, इंग्लंड; तसेच अमिरातीतील दवाखान्यात माझ्यासाठी झगडलेल्या परिचारिका, डॉक्टर्स आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांमुळेच मी आज तुमच्यापुढं उभी आहे. सर्वांसाठी फक्त नम्र आभार एवढेच शब्द आहेत.
युनोचे जनरल सेक्रेटरी माननीय बान की मून आणि गॉर्डन बाऊन यांनी सर्वांसाठी शिक्षण हा आज जो महत्त्वपूर्ण संकल्प करत आहेत, त्या सर्वांचं मी जगातील शिक्षणापासून वंचित असणाऱ्या बालकांच्यावतीनं जाहीर आभार मानते. हे काम करण्यासाठी सर्वांना प्रेरणा मिळत आहे. त्यांनी आम्हाला असंच मार्गदर्शन करावे.
प्रिय बंधू आणि भगिनींनो युनोनं आज मलाला दिवस साजरा करण्याचं ठरविलं आहे, कृपया आपण एक गोष्ट ध्यानात ठेवा. हा मलाला दिवस माझा नाही.



सोळाव्या वाढदिवशी संयुक्त राष्ट्रसंघात भाषण करताना

आपल्या हक्कासाठी आवाज उठविलेल्या जगातील प्रत्येक स्त्रीचा, मुलाचा आणि मुलीचा तो दिवस आहे. समानता, शांतता आणि सर्वांना शिक्षण या मानवी हक्कासाठी शेकडो कार्यकर्ते फक्त बोलतच नाही तर त्याच्यासाठी त्यांचा अखंड संघर्ष सुरू आहे. दहशतवाद्यांनी हजारो निरपराध लोकांचा बळी घेतला आणि शेकडोंना जायबंदी केलं. यातील मीही एकजण आहे. अनेक जायबंदी मुलींची एक प्रतिनिधी म्हणून तुमच्या समोर मी उभी आहे.
आज मला माझ्याबद्दल काही सांगायचं नाही; पण अनेक न बोलू शकलेल्या निरपराध लोकांचा आवाज तुमच्या कानी आज मी घालत आहे. काय होता त्यांचा मानवी हक्काचा संघर्ष? आम्हाला शांततेनं जगू द्या. आमच्या मागण्यांकडं रुमानानं बघा. सगळ्यांना समानतेची संधी मिळू द्या आणि आमचा शिकण्याचा मार्ग मोकळा करा.
मित्रांनो, 9 ऑक्टोबर 2012 ला तालिबानी हल्लेखोरांनी माझ्या कपाळाच्या डाव्या बाजूनं गोळी झाडली. माझ्याबरोबरच्या मैत्रिणींवरही गोळया झाडल्या. त्यांना वाटलं त्या गोळयांनी आमचा आवाज शांत होईल; पण त्यांना यश मिळालं नाही; पण त्या शांततेमधून जगभरातून हजारो शब्दांची आम्हाला साथ लाभली. दहशवाद्यांना वाटलं, त्यांच्या कृतीनं माझं ध्येय खुडलं जाईल, आकांक्षांना लगाम बसेल. माझ्यातील पूर्वीची भीती, कमकुवतपणा आणि निराशा त्या घटनेनंतर नष्ट पावली आहे. याबरोबर जोश, शक्ती अन् एका धाडसानं माझ्या आत नव्यानं जन्म घेतला आहे. मी पूर्वीचीच मलाला आहे. माझ्या त्याच महत्त्वाकांक्षा आहेत. माझी आशा आणि स्वप्नंही तीच आहेत.
प्रिय बंधू आणि भगिनींनो,
खरं सांगू का! मी कोणाच्याच विरोधात नाही. आज मी तुमच्या पुढं जे बोलत आहे यात कुणाबद्दलही माझ्या मनात बदल्याची भावना नाही. कोणाही दहशतवादी गटाबद्दल माझी हीच आंतरिक भावना आहे. जगातील प्रत्येक बालकाला शिक्षण मिळालं पाहिजे.

शिक्षण मिळवणं प्रत्येकाचा मानवी हक्क आहे. तालिबान आणि दहशतवादी मित्रांच्या मुलांना/मुलींना शिक्षण दिलं पाहिजे, अशी माझी कळकळ आहे. माझ्यावर गोळी झाडलेल्या तालिबानविषयी माझ्या मनात द्वेषाचा लवलेशही नाही.
माझ्या हातात बंदूक असली आणि तो जर माझ्यासमोर उभा राहिला तरी मी त्याच्यावर गोळी झाडणार नाही. महंमद पैगंबर, ईश्वराचा प्रेषित येशू ख्रिस्त आणि गौतम बुद्धांकडून मी शिकलेली ही कणव आहे. हाच वारसा मी मार्टिन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला आणि मोहम्मद जिनांकडून घेतला आहे. महात्मा गांधी, बादशहा खान आणि मदर तेरेसांकडून शिकलेले अहिंसेचे हे तत्त्वज्ञान आहे. हे क्षमाशीलवृत्तीचं बाळकडू मी माझ्या जन्मदात्या आईवडिलांकडून आत्मसात केलंय. माझ्या आत्म्याचा आवाज मला एकच गोष्ट वारंवार सांगत आहे. शांत रहा आणि प्रत्येकावर प्रेमाचा वर्षाव कर!
मित्रांनो, जेव्हा काळोखाचे साम्राज्य असतं तेव्हाच मिणमिणत्या प्रकाशज्योतीचं अस्तित्व जाणवतं. तसंच जेव्हा आम्ही शांत असू तेव्हाच आमच्या कोंडलेल्या आवाजाची जाणीवही होते. अगदी असाच अनुभव आम्ही राहत असलेल्या स्वात भागात घेत आलोय. जेव्हा जेव्हा आमच्या आजूबाजूला बंदुकी आणि संगिनी दिसू लागल्या, तेव्हा आम्हाला पेन-पुस्तकांची तीव्रतेनं गरज वाटू लागली. एक सुवचन आहे.
तलवारीहून लेखणीची ताकद अधिक बलशाली आहे.
हेच खरं आहे. जहालमतवाद्यांना पुस्तकं आणि पेनांची भीती वाटते आहे. शिक्षणाच्या शक्तीमुळं त्यांचा थरकाप होतो आहे. त्यांना निष्पाप महिलांची व मुलींची भीती वाटत आहे. स्त्रीशक्तीच्या आवाजानं त्यांना धडकी भरली आहे. यावर त्यांनी काय केलं? क्वेटा येथे निरागस चौदा विद्यार्थ्यांवर भ्याड हल्ला करून त्यांना ठार केलं. मुलांना शिकविणाऱ्या महिला शिक्षकांना ते ठार करीत आहेत. शिक्षणामुळं समाजात समानतेचं वारं वाहू लागेल. या बदलाच्या भीतीनं ते शाळाच उडवून देत आहेत. मला चांगलं आठवतंय. आमच्या शाळेत एका पत्रकारानं एका मुलाला विचारलं, "मुलांना शिकविण्याविरुद्ध हे तालिबान का आहेत?" पुस्तकाकडं बोट दाखवित त्या मुलानं सहज उत्तर दिलं, "पुस्तकात काय लिहिलेलं आहे, हे दहशतवाद्यांना माहीत नाही."
ते जुन्या विचारांचे बंदूकधारी अल्ला अन् परमेश्वरास क्षुल्लक समजून शाळात जाणाऱ्यांच्या डोक्यावर बंदुकीची निशाणी धरू पाहत आहेत. ते दहशतवादी पवित्र इस्लाम धर्माचा दुरुपयोग त्यांच्या स्वार्थासाठी करत आहेत. पाकिस्तान हा शांतता आणि लोकशाहीच्या मार्गाने जाणारा देश आहे. पश्तुनी मंडळींना त्यांच्या मुलामुलींना शिकवायची इच्छा आहे. इस्लाम हा शांतता, मानवता आणि विश्वबंधुत्व मानणारा धर्म आहे. इथल्या प्रत्येक मुलामुलीस शिक्षण मिळणं हा हक्क आहे आणि शिक्षण देणं हे इथल्या सरकारचं कर्तव्य आहे, असा धर्मच सांगतो. शिक्षणासाठी शांतता हवी. जगातील अनेक भागात विशेषत: पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये दहशतवाद, लढाया आणि दंगेधोपे सुरू असल्याने मुलांना शाळेत जाणे अवघड झाले आहे. त्यांची शाळाच बंद झाली आहे. खरे तर, आम्ही सगळे या लढायानं बेजार झालो आहोत. जगातील अनेक भागात या अत्याचारांमुळे मुलं आणि स्त्रियांना खूप अवहेलना सहन करावी लागत आहे.
आमच्या शेजारच्या भारतात गरीब निरागस मुलांचा बालकामगार म्हणून बळी जात

आहे. नायजेरियातील अनेक शाळा उद्ध्वस्त केल्या गेल्या आहेत. अतिरेक्यांच्या अत्याचाराने अफगाणिस्तानची जनता जेरीस आली आहे. बालकांना कामगार म्हणून मजुरीच्या कामांना जुंपले जात आहे, एवढेच नाही तर बालविवाह करून त्यांच्या मानेवर अकाली प्रौढत्वाचे अन् संसाराचे जू ठेवले जात आहे. दारिद्य्र, अज्ञान, अन्याय, जातिभेद आणि मूलभूत हक्कांपासून ही सगळी मुलं वंचित आहेत.

आज मी स्त्रियांचा मुख्य अधिकार आणि त्यांच्या शिक्षणासंबंधी बोलणार आहे. या दोन गोष्टींच्या बाबतीत त्यांच्यावर खूप अन्याय होत आहे. एक काळ असा होता, त्यावेळी महिला पुरुषांना विनंती करायच्या की, त्यांच्या हक्कासाठी आवाज उठवा; पण आज आम्हालाच आमच्या प्रश्नांबद्दल आवाज वाढवावा लागणार आहे. अन्यायाविरुद्ध आम्हालाच उभं राहावं लागणार आहे. याचा अर्थ असा नाही की, पुरुषांनी स्त्रियांच्या अन्यायाविरुद्ध बोलूच नये. त्यांची मदत आम्हाला हवीच आहे; पण स्त्रियांनी आत्मसन्मान आणि आपल्या हक्कांसाठी स्वत:च लढा देण्याशिवाय दुसरा सन्मानाचा मार्ग नाही. म्हणून माझ्या बंधूंनो आणि भगिनींनो, हीच वेळ आहे आपला आवाज वाढविण्याची! आज आपण सर्वांना शांततेच्या मार्गानं समृद्धीचा ध्यास घ्या असे आवाहन करू या. द्रष्ट्या राजकर्त्यांना आपण विनंती करू की, त्यांनी हे करत असताना महिला आणि बालकांच्या हक्कांचं संरक्षण कसं करता येईल याकडं लक्षपूर्वक ध्यान द्यावं. महिलांच्या हक्कांचं उल्लंघन होत असेल तर त्याचा स्वीकार केला जाणार नाही.

आम्ही जगातील सर्व सरकारांना नम्र आवाहन करतो की, त्यांनी प्रत्येक मुलास मोफत व सक्तीचं शिक्षण दिलं पाहिजे. हिंसा आणि दहशतवादाविरुद्ध सर्वांनी लढा द्यावा. बालकांवर होणारा अमानुष अत्याचार आणि बालकामगार म्हणून त्यांचे होणारे शोषण थांबले पाहिजे. जगातील प्रगतशील राष्ट्रांना मी विनंती करते की, त्यांनी अप्रगत देशांतील मुलींच्या शिक्षणासाठी सढळ हातानं मदत करावी. जात, पात, वर्ग, धर्म, वर्ण या भेदांचे ग्रह मनात न बाळगता सर्वांनी मानवता ही एकच सर्वसमावेशक भावना वाढीस लावली पाहिजे. यातूनच स्त्रियांसाठी समता आणि स्वातंत्र्य मूल्यांची वाढ होऊ शकेल. आमचे काही बांधव मागे राहिले तर आमची कधीच प्रगती होऊ शकणार नाही. जगभरातील माझ्या भगिनींना मी हाक देते की, तुम्ही हिम्मत दाखवा, तुमच्यातील आत्मशक्तीला आलिंगन द्या, यानंतर तुम्हाला तुमच्यातील पूर्ण नैसर्गिक शक्तीचं दर्शन घडेल.

बंधूनो आणि भगिनींनो, बालकांचे उज्ज्वल भविष्य घडवू शकणारं शिक्षण देण्यासाठी आम्हाला शाळा हव्या आहेत. आमचं ध्येय केवळ शिक्षणच आहे. या ध्येयाच्या पूर्तीसाठी आमचा शांततेच्या मार्गानं हा प्रवास चालू राहणार आहे. जगातील कोणतीही शक्ती या कामापासून आम्हाला रोखू शकणार नाही. आमच्या या हक्कांसाठी आम्ही बोलतच राहणार आणि या मागणीतून आमच्या शब्दांना बळ येईल. शब्दसामर्थ्य आणि शब्दांची शक्ती यावर आमचा विश्वास आहे. शिक्षण या एकाच ध्येयानं आपण सर्वजण एकत्र आलो तर! शब्द सामर्थ्यानं जग बदलू शकतो! हे ध्येय जर आम्हाला साध्य करावयाचं असेल तर, ज्ञानरूपी शस्त्रानं आम्ही तयार झालं पाहिजे. हे काम करताना तोंड द्याव्या लागणाऱ्या संकटांना सगळयांना बरोबर घेऊन चालणारी एकीची ही ढालच कामी येणार आहे.

प्रिय बंधूंनो आणि भगिनींनो, जगातील आमचे कोट्यवधी बांधव, दारिद्य्र, अन्याय आणि

अज्ञानामुळं दु:खद अंधारमय जीवन जगत आहेत, हे विसरता कामा नये. आपण हेही लक्षात ठेवलं पाहिजे की, आमच्या कोट्यवधी बालकांनी शाळांचा उंबराही ओलांडला नाही. हजारो भाऊबहिणी सूर्योदयाच्या तेजस्वी; परंतु शांततामय भविष्यकाळाकडे डोळे लावून वाट बघताहेत हेही आपल्याला ध्यानात घ्यावे लागेल.

तर चला, आपण भयाण निरक्षरता, दारिद्र्य आणि मानवास अस्थिर करणाऱ्या दहशतवादाविरुद्ध सन्मानाच्या लढाईचे रणशिंग फुंकू या! चला, आपण हाती पेन आणि पुस्तक घेऊ या. तेच आजचे शक्तिशाली हत्यार आहे. बालक, शिकविणारा शिक्षक, पुस्तक आणि लेखणीनं या जगाचा कायापालट होऊ शकतो. शिक्षण हा एकच बदलाचा आणि परिवर्तनाचा मार्ग आहे. आपणा सर्वांचे याप्रसंगी खूप खूप आभार.''

वीस मिनिटांच्या भाषणानंतर सभागृहात चैतन्याची लाटच पसरली. सगळं सभागृह नि:शब्द उभं राहिलं.

❖ ❖ ❖

# परिशिष्ट : 1

# नोबेल पारितोषिक स्वीकारल्यानंतरचं मलालाचं भाषण

“बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम” सर्वशक्तिमान आणि दयाळू परमेश्वर श्रीमंत राजे साहेब, नोबेल समितीचे नॉर्वेतील मान्यवर सदस्य, प्रिय भगिनी आणि बंधूंनो! आजचा माझ्यासाठी आनंदाचा दिवस आहे. नोबेल समितीनं माझी या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड केली, याबद्दल मी नम्रपणे आपले आभार मानते.




भाषण करताना मलाला

आपल्या प्रत्येकाचं प्रेम आणि आधार मला मिळत आल्यानं मी प्रथम आपल्याबद्दल आभार व्यक्त करते. जगभरातून मात्र आजही पत्रं आणि पाठिंबा मिळतोय, त्याबद्दल सर्वांची कृतज्ञता व्यक्त करते. तुमच्या प्रेमळ शब्दांनी मला शक्ती मिळाली. प्रोत्साहन मिळाले.
माझ्या पालकाच्या अलौकिक प्रेमाबद्दलही त्यांचे आभार मानते. माझ्या कल्पनेच्या पंखांना जखडून न ठेवता त्यांनी मला मुक्त छंदानं उडण्याचं स्वातंत्र्य दिलं, याबद्दल त्यांचे विशेष आभार. सतत सत्याची कास धर, संकटातही शांत रहा याची पाठ देणारी माझी आई आहे. तिचे मी आभार मानते; कारण तिची शिकवण हाच आमच्या इस्लामचा खरा संदेश आहे.
जगातील कमी वयाची, पाकिस्तानातील पश्तूनची पहिली पुरस्कार मिळविणारीही मुलगी मी असल्याचा मला अभिमान आहे. आपल्या लहान भावाशी मी अजून भांडते. आपल्या भावांशी भांडणारी आणि नोबेल पुरस्कार मिळवणारी मी पहिली आहे. मला वाटते जगात सर्वत्र शांतता असावी; मी आणि माझ्या भावाचं घरी भांडण्याचं काम सुरूच असतं.
बालकांच्या हक्कासाठी अनेक वर्षं फार महत्त्वाचे कार्य करणारे कैलाश सत्यार्थी यांच्यासोबत मला पुरस्कार मिळाला यात मी माझा सन्मान समजते. दोनदा मी मरणाच्या दारातून परत आले आणि आज त्यांच्यासोबत उभी आहे. याचा मला खूप आनंद आहे. ते आणि मी एकत्र उभे राहून जगाला दाखवून दिलं आहे की, भारत आणि पाकिस्तान शांतता आणि मैत्रीनं नांदू शकतात. बालकांच्या हक्कासाठी एकत्र काम करू शकतात.
प्रिय बंधूंनो आणि मैत्रिणींनो!
पश्तूनची जॉन ऑफ आर्क म्हणून मैवांडची मलालाची प्रेरणादायी कथा प्रसिद्ध आहे.

तिच्या नावावरून माझं नाव मलाला ठेवलं. मलालाचा अर्थ दु:ख; पण माझे आजोबा मात्र मलाला म्हणजे जगातील आनंदी मुलगी, असे म्हणत. मला आनंद आहे की, आज मी बालकांच्या शिक्षणाच्या महत्त्वाच्या प्रश्नाबद्दल आपणापुढं उभी आहे.
हा पुरस्कार माझा एकटीचा नाही. शिक्षण घेऊ न शकलेल्या मुलांचा हा सन्मान आहे. जी मुलं अन्याय अत्याचारानं घाबरलेली असून शांतता मिळावी अशी अपेक्षा करतात, त्यांचा हा गौरव आहे. ज्या बालकांचा आवाजच बंद केला आहे आणि ती बालकं परिवर्तनाची वाट पाहतात, त्यांच्यासाठी मी हा पुरस्कार स्वीकारला आहे.
या मुलांच्या हक्कासाठीच मी उभी आहे. त्यांचा आवाज तुमच्यापर्यंत पोहोचावा हा माझा प्रयत्न आहे. त्यांच्याबद्दल दया दाखवू नका, त्यांच्यासाठी सर्जनशील कृती करून दाखवा. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलांना संधी देणं, हा त्यांचा हक्क आहे.
लोक माझा अनेक प्रकारे उल्लेख करत असतात.
काहीजण तालिबानींनी गोळी झाडलेली मुलगी, असे म्हणतात.
आपल्या हक्कासाठी संघर्ष करणारी मुलगी, असे काही म्हणतात.
आता काहीजण नोबेल पारितोषिक विजेती, असेही म्हणतील.
माझं विचारलं तर मी मनापासून निर्धार केलाय. प्रत्येक बालकास चांगलं शिक्षण मिळालं पाहिजे, यासाठी मी खंबीरपणे उभी आहे. महिलांना समानतेचे अधिकार दिले पाहिजे आणि जगातल्या प्रत्येक कोपऱ्यात शांतता नांदली पाहिजे.
शिक्षण हा माणसास आयुष्यात मिळणारा एक मोठा आशीर्वाद आहे. ते जगण्याचं एक महत्त्वाचं साधन आहे. गेल्या सतरा वर्षांच्या आयुष्याचा तो माझा अनुभव आहे. उत्तर पाकिस्तानातील स्वातमधील शाळेत मला नवनव्या गोष्टी शिकण्यात खूप आनंद मिळाला. काहीप्रसंगी मी, माझ्या मैत्रिणी हातावर मेहंदीने नक्षी, फुलं किंवा आकृत्या न काढता गणिताची सूत्रं आणि भूमितीच्या आकृत्याच गोंदवायचो.
आम्हाला शिक्षणाची तहान लागली होती; कारण आम्हाला आमचं उद्याचं भविष्य वर्गातच दिसतं. आम्ही एकत्र बसून वाचत असतो. शाळेचा स्वच्छ गणवेश घालून आम्ही मोठमोठी स्वप्नं पाहतो. आमच्या अभ्यासानं, कृतीनं आम्ही दाखवून देतो आणि याबद्दल आमच्या पालकांनाही आमचा अभिमान वाटतो. आमच्या या प्रयत्नातून आम्ही मुलांच्या बरोबरीनं शिक्षणात प्रावीण्य मिळवू शकतो.
आजूबाजूच्या गोष्टी सारख्या बदलत आहेत. मी जेव्हा दहा वर्षांची होते तेव्हा आमचे स्वात खोरे हे एक निसर्गसुंदर पर्यटनस्थळ होतं. आज ते दहशतवाद्यांचं ठिकाण झालं आहे. चारशेहून अधिक शाळा नष्ट झाल्या. मुलींना शाळेत जाण्याला बंदी आली. महिलांना चाबकानं फटके मारले जातात. निरपराध माणसं मारली जातात. आमची सगळी फरफट सुरू आहे. आमची सगळी सुंदर स्वप्नं आता दु:स्वप्नं झाली आहेत.
शिक्षण हा आमचा हक्क आहे; पण ते मागणं गुन्हा झाला आहे. शिक्षणानं जगण्याचा मार्ग बदलला आणि माझा अग्रक्रमही बदलला.
माझ्यासमोर दोन पर्यायही होते. एक होता शांत बसून सहन करायचं आणि मरणाची वाट पहायची. दुसरा मार्ग होता, आवाज वाढवायचा. बोलत राहायचं. शेवटी यातही मरणाची भीती होतीच. मी दुसऱ्या मार्गाची जबाबदारीनं निवड केली. मी निर्धार केला, आपण

आवाज उठवायचा!
दहशतवाद्यांनी आमचा आवाज थांबविण्याचा प्रयत्न केला. माझ्यावर आणि माझ्या मैत्रिणींवर हल्ला केला. तो 9 ऑक्टोबर, 2012 चा दिवस होता; पण त्यांच्या गोळया जिंकल्या नाहीत.
आम्हाला जीवदान मिळाले आणि त्या दिवसापासून आमचे आवाज अधिकाधिक मोठे होत गेले.
मी माझी गोष्ट लिहिली. ती जगावेगळी आहे म्हणून सांगितली नाही. ती अनेक मुलींची गोष्ट आहे.
आज मी त्यांची गोष्ट सांगत आहे. ओस्लो येथील आजच्या कार्यक्रमासाठी पाकिस्तान, नायजेरिया, सिरिया येथील काही मैत्रिणी हजर आहेत. माझ्यासोबत हल्ला झालेल्या स्वातमधील बहादूर भगिनी शाझिया आणि कैनात रियाझ उपस्थित आहेत. या दोघींनी खूप त्रास सहन केलाय. पाकिस्तानातील कैनात सोमरो या बहिणीनं तर अन्याय, अत्याचाराशी हिमतीनं झुंज दिली. ती आज आमच्यात आहे. दुर्दैवानं तिचा भाऊ तिच्या डोळ्यासमोर मारला गेला होता.
आणखी माझ्या बहिणी मुद्दाम आल्या आहेत. मलाला फंडासाठी मी प्रयत्न करत होते. यावेळी 16 वर्षांची मेझॉन सिरियात भेटली. ती आता जॉर्डनमध्ये निर्वासितांच्या तंबूतील मुलांना शिकविण्याचं काम करते. नायजेरियात शाळेत जाणाऱ्या मुलांना पळवून नेतात. या मुलांसाठी काम करणारी अमिना आज आमच्यात आहे.
मी पाच फूट दोन इंच उंचीची मुलगी वाटते. माझा एकटीचा आवाज नाही. या जगभरातील सगळया मैत्रिणींचा हा आवाज आहे. मी शाझिया-कैनात रियाझ, मी कैनात सोमरो, मी मेझॉन आणि मीच अमिनाही आहे. जगभरातील 66 मिलियन मुली शाळेबाहेर आहेत, मी तीच आहे. मुलींसाठी शिक्षणाचं काय महत्त्व आहे, अशी माणसं मला सारखे विचारतात. माझं यावरच उत्तरही तेच असतं.
पवित्र कुराणाच्या पहिल्या दोन प्रकरणांतून मी एक महत्त्वाची गोष्ट शिकले आहे. कुराणात इक्रा (पवित्र कुराण - 96 : 1) शब्द आहे. याचा अर्थ वाचा असा आहे. दुसरा शब्द आहे नून वल्क्लम. याचा अर्थ लेखणीची शपथ (पवित्र कुराण - 68 : 1).
यामुळेच गेल्या वर्षी संयुक्त राष्ट्र संघाच्या भाषणात मी म्हणाले होते, ''एक मूल, एक शिक्षक, एक लेखणी आणि एक पुस्तक हे जग बदलू शकतं.''
आज अर्ध्या जगात जलद प्रगती, आधुनिकीकरण दिसते. त्याचबरोबर अशी अनेक देश आहेत जेथे उपासमार, गरिबी, अन्याय आणि संघर्षांच्या जीवनानं होरपळून जात आहेत.



नोबेल पारितोषिक स्वीकारल्यानंतर मलाला
व भारताचे कैलाश सत्यार्थी

शंभर वर्षांपूर्वी पहिले जागतिक महायुद्ध झाले. युद्धामुळे होरपळलेल्या कोट्यवधी

लोकांची प्राणहानी होऊनही इतक्या वर्षांत आम्ही यापासून काही धडा घेतला नाही. सर्वत्र आज संघर्ष, उद्रेक, उठाव सुरू आहेत. यात हजारो निरपराध माणसांचा बळी जात आहे. सिरिया, गाझा, इराकमध्ये शेकडो कुटुंबं निराधार बनली आहेत. नायजेरियातील उत्तर भागात आजही मुलींना शाळेत जाण्याचे स्वातंत्र्य नाही. पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये तर निरपराध माणसंच बॉम्बस्फोटात आणि मानवीबॉम्ब हल्ल्यात मारली जात आहेत.

दारिद्र्यामुळे आफ्रिकेतील अनेक बालकांना शाळेची पायरी चढता येत नाही. भारत आणि पाकिस्तानातही काही समाजात मुलांच्या शिक्षणास मनाई असून ती बालकं बालकामगार म्हणून बळी पडत आहेत आणि बालविवाहाचे शिकार बनत आहेत.

माझ्या एका चांगल्या मैत्रिणीची दु:खद गोष्ट सांगते. माझ्या वयाची हिंमतबहादर मुलगी होती. डॉक्टर होण्याचं स्वप्न पहायची; पण तिचं स्वप्न हे अधुरं स्वप्नच राहिलं. घरच्यांनी बाराव्या वर्षी जबरदस्तीनं तिचं लग्न केलं. चौदाव्या वर्षी ती आई बनली. मला मात्र खात्री होती. माझी ही मैत्रीण एक चांगली डॉक्टर झाली असती; पण हे झालं नाही; कारण ती एक मुलगी होती. तिच्या या गोष्टीमुळंच मी माझ्या नोबेल पारितोषिकाची रक्कम ‘मलाला फंडास’ अर्पण करीत आहे. तिच्यासारख्या मुलींच्या चांगल्या शिक्षणासाठी या पैशाचा उपयोग व्हावा.

मी जगभरातील नेत्यांना आवाहन करते, आमच्या या कामासाठी मला, मेझून, अमिना या सगळयांना आपण मदत करा. माझ्या या पारितोषिकाच्या रकमेतून मी माझ्या खेड्यागावातील शाळा व स्वातमधील शाळा बांधणार आहे.

माझ्या गावी आजही मुलींसाठी माध्यमिक शाळा नाही. माझ्या मैत्रिणींसाठी मी ती बांधणार आहे. यामुळे त्यांची शिक्षणासंबंधीची स्वप्नं पूर्ण होऊ शकतील.

ही माझी सुरुवात असेल; एवढ्यावरच मी थांबणार नाही. प्रत्येक मूल शाळेत गेलं पाहिजे, इथंपर्यंत हे काम सुरू राहणार आहे. माझ्यावर झालेल्या हल्ल्यानंतर माझी हिंमत वाढली असं मला वाटू लागलं. माझ्या आतला आवाज मला सांगत आहे की, या कामापासून कोणीही मला, आम्हाला थांबवू शकणार नाही. याचं कारण आज हजारो माणसं या कामासाठी एकत्र आली आहेत.

प्रिय बंधू आणि भगिनींनो, मार्टिन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला, मदर तेरेसा, ऑंग सान सू केईसारख्या महान व्यक्तींनीही परिवर्तनातून बदल घडवून आणला आहे. या थोर व्यक्ती या व्यासपीठावर येऊन गेल्या आहेत. आदरणीय कैलाश सत्यार्थी आणि माझा हा जो प्रवास आहे त्यामुळेही दीर्घकाळ टिकणारा बदल घडून येणार आहे.

माझी मनापासूनची ही कळकळ आहे. आपल्या मुलाच्या शिक्षणासाठीची ही शेवटची लढाई आपण लढावी. आपण सर्वांनी एकत्र येऊन या कार्यास मदत करावी. यातूनच सगळयांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटू शकेल.

मुलांच्या शिक्षण हक्काविषयी आम्ही काही पावलं चाललो आहोत; पण आता त्याकरिता झेप घेण्याची आवश्यकता आहे. जगातल्या सर्व नेत्यांना शिक्षणाचं महत्त्व सांगण्याची ही वेळ नाही; कारण त्यांना हे नम्र आवाहन आहे की, त्यांनी आता सर्वांच्या शिक्षणासाठी कृती करावी.

जगभरातील नेत्यांना विनंती आहे की, एक व्हा आणि शिक्षणासाठी अग्रक्रम द्या. पंधरा वर्षांपूर्वी जगभरातील प्रमुख नेते एकत्र आले. ग्लोबल गोल्ससंबंधी निर्णय घेतला. गेल्या काही वर्षांत याची प्रगती झाल्याचे दिसून आले. शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांसाठीचे काम सुरू झाले; पण पुढे अर्धेच राहिले. प्राथमिक शिक्षणाने सार्वत्रिकीकरणावर भर दिला गेल्यानं, शिक्षणातील प्रगती सर्वांपर्यंत पोहोचू शकली नाही.

येत्या वर्षात, 2015 साली शिक्षणासाठी कार्य करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाचे कार्यकर्ते भेटत आहेत. चिरंतन प्रगतीचं लक्ष्य गाठण्यासाठी चर्चा करणार आहेत. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या जगातील नव्या पिढीच्या भवितव्यांचा ते आराखडा तयार करणार आहेत. या क्षेत्रातील नेत्यांना आवाहन आहे की, त्यांनी जगभरातील मुलांसाठी दर्जेदार मोफत प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

याबद्दल काहीजण म्हणतील, हे अशक्य कोटीतलं आहे, खर्चीक आहे आणि त्याहूनही अवघड काम आहे; पण हीच वेळ आहे, जगानं मोठी झेप घेण्याचा विचार केला पाहिजे.

प्रिय बंधू आणि भगिनींनो,

मोठ्या माणसांच्या लक्षात येत असेल; पण आमच्यासारख्या मुलांना मोठ्या माणसांचं वागणं समजत नाही. शक्तिशाली देश युद्ध व्हावेत म्हणून प्रयत्न करताना दिसत आहेत; पण भांडणाऱ्या देशांत शांतता नांदावी म्हणून काहीच का करत नाहीत? बंदुका, बॉम्ब देण्यापेक्षा पुस्तकं देणं त्यांना अवघड का वाटतं? रणगाडे बांधणं त्यांना सोपं वाटावं, मात्र शाळा बांधणं कठीण व्हावं?

आम्ही एकविसाव्या शतकात राहतो. हे आधुनिक जग आहे. आमचा विश्वास आहे की, या काळात कोणतीही गोष्ट अशक्य कोटीतली नाही. आम्ही चंद्रावर पोहोचत आहोत. लवकरच दुसऱ्या ग्रहावर उतरू. अशा एकविसाव्या शतकात आम्ही निर्धार करावयास हवा की, सर्वांसाठी चांगल्या शिक्षणाचे आमचं स्वप्न साकार होऊ शकेल.

याकरिता समता, न्याय आणि शांतता सर्वांना मिळो. यात राजकीय व्यक्ती, सर्व क्षेत्रातील नेते यांचा सहभागाचा वाटा असणार आहे. यात मी, तुम्ही असणार आहात आणि आपणा सर्वांचं ते कर्तव्य आहे.

चला तर बंधूंनो, आपण सुरू करू या. आता वाट बघायची नाही. जगभरातील माझ्या भाऊ-बहीण असलेल्या मुलांना हाक देते. उठा! तयार व्हा! आणि कामाला लागा!

या गोष्टींचा होवो शेवट :

प्रिय भगिनी आणि बंधूंनो,<br>
उद्याच्या इमारतींच्या पायाचा<br>
आपण पहिला चिरा होऊ या ॥<br>
मुलं नसलेले वर्ग रिकामे<br>
बालपण हरवून गेलेली बालके<br>
सर्रास पायी तुडवली सर्जनशीलता<br>
या गोष्टींचा होवो शेवट ॥<br>
मुला-मुलींचं बालपण<br>
बालकामगार म्हणून न संपो

कोवळ्या वयातली लग्नबेडी
बालपणाची बनली होळी,
या गोष्टींचा होवो शेवट ॥
निरागस बालकांची आहुती
युद्ध माणसांची खुमखुमी
बालके चैतन्याची गुढी,
भीती वर्ग रिकामे पाडी,
या गोष्टींचा होवो शेवट ॥
पोरी बाळांना नाही शिकवण
कोणत्या काळाची गुन्ह्याची खूण
शाळेविना बालक नियतीचा फेरा
न शिकणं मातेचं दूध न तोडी
या गोष्टींचा होवो शेवट ॥
चला त्यांना शाळेत घालू या
उज्ज्वल भविष्याची गुढी उभारू या
या गोष्टींचा शेवट करूया
आता नव्याने सुरुवात करूया ॥
उद्याच्या इमारतींच्या पायाचा
आपण पहिला चिरा होऊ या
आपणच पहिला चिरा होऊ या॥

❖ ❖ ❖

# परिशिष्ट : 2

# मलालाला मिळालेले पुरस्कार आणि सन्मान

☐ मुलांसाठीचे आंतरराष्ट्रीय शांतता पारितोषिक 2011 (नामांकन)
☐राष्ट्रीय शांतता युवक पुरस्कार 2011
☐ नैतिक धैर्यासाठीचा अॅन फ्रँक पुरस्कार, जानेवारी 2012
☐ ‘सितारा-ए-शुजात’ हा पाकिस्तानमधील तिसऱ्या क्रमांकाचा नागरी शौर्य पुरस्कार, ऑक्टोबर 2012
☐ ‘फॉरेन पॉलिसी मॅगझीन’च्या 100 जागतिक विचारवंतांमध्ये समावेश, नोव्हेंबर 2012
☐ टाइम मॅगझीनच्या ‘पर्सन ऑफ द इयर’ या यादीत समावेश
☐ सामाजिक न्यायासाठी ‘मदर तेरेसा मेमोरियल’ पुरस्कार, नोव्हेंबर 2012
☐ रोम प्राइझ फॉर पीस अॅण्ड ह्यूमॅनिटेरियन अॅक्शन, डिसेंबर 2012
☐ 2012 च्या ‘अॅन्यूअल सर्व्हे ऑफ ग्लोबल इंग्लिश’ मध्ये सर्वोच्च स्थान
☐ सिमोन - दे - बॉदलेअर पुरस्कार, जानेवारी 2013
☐ मेमिंजर फ्रेइट्स्प्रेईस 1525, मार्च 2013 (7 डिसेंबर, 2013 रोजी ऑक्स्फर्ड येथे प्रदान)
☐ इन्डेक्स ऑन सेन्सॉरशिपचा ड्राउटी स्ट्रीट अॅडव्होकसी पुरस्कार, 2013
☐ यूके नॅशनल युनियन ऑफ टीचर्सचा फ्रेड अॅण्ड अॅन जार्विस पुरस्कार, मार्च 2013
☐ ग्लोबल ट्रेलब्लेझरचा व्हायटल व्हॉइसेस ग्लोबल लीडरशिप पुरस्कार, एप्रिल 2013
☐ वन ऑफ टाइम्सच्या ‘100 मोस्ट इन्फ्यूएन्शियल पीपल इन द वर्ल्ड’ मध्ये समावेश, एप्रिल 2013
☐ प्रेमी इंटरनॅशनल कॅटाल्यून्या अवॉर्ड ऑफ कॅटालोनिया, मे 2013
☐ डेव्हलपमेंट ऑफ द ओपीईसी फंड फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट (ध्इघ्) चा वार्षिक पुरस्कार जून 2013
☐ इंटरनॅशनल कँपेनर ऑफ द इयर, 2013 ऑब्झर्व्हर इथिकल अवॉर्ड्स, जून 2013
☐ 2012 टिपेररी इंटरनॅशनल पीस अवॉर्ड, आयर्लंड टिपेररी पीस कनव्हेंशन, ऑगस्ट 2013
☐ इंटरनॅशनल चिल्ड्रन्स पीस प्राइझ, किड्स राइट्स, 2013
☐ नॅशनल पोर्ट्रेट गॅलरी, लंडन येथे 2013 मध्ये जोनाथन येवो यांनी काढलेले ‘पोर्ट्रेट ऑफ युसूफझाई’ प्रदर्शित
☐ अॅम्नेस्टी इंटरनॅशनल तर्फे अॅम्बेसिडर ऑफ कॉन्शन्स अवॉर्ड
☐ क्लिंटन फाउंडेशनतर्फे क्लिंटन ग्लोबल सिटिझन अवॉर्ड, 2013
☐ हॉर्वर्ड विद्यापीठातर्फे दिले जाणारे हॉर्वर्ड फाउंडेशनचा ‘पीटर गेम्स ह्यूमॅनिटेरियन अवॉर्ड’

☐ **2013** अॅना पोलित्कोव्हस्काया अवॉर्ड - रीच ऑल विमेन इन वॉर
☐ 2013 रिफलेक्शन्स ऑफ होप अवॉर्ड - ओक्लाहोमा सीटी नॅशनल मेमोरियल अॅण्ड म्यूझियम
☐ 2013 सॅकॅरोव्ह प्राइझ फॉर फ्रीडम ऑफ थॉट- युरोपियन पार्लमेंट पुरस्कृत
☐ एडिनबरो विद्यापीठातर्फे ऑनररी मास्टर ऑफ आर्ट्स 2013
☐ प्राइड ऑफ ब्रिटन, ऑक्टोबर 2013
☐ ग्लॅमर मॅगझीनतर्फे वुमन ऑफ द इयर 2013
☐ उउ2 लीडरशिप अवॉर्डस्मध्ये उउ2 हॅमर अवॉर्ड, नोव्हेंबर 2013
☐ इंटरनॅशनल प्राइझ फॉर इक्वॅलिटी अॅण्ड नॉन-डिस्क्रिमिनेशन 2013
☐ 2014 चिल्ड्रेन्स नोबेल प्राइझसाठी नामांकन
☐ स्कोल ग्लोबल ट्रेश्श्यर अवॉर्ड 2014
☐ युनिव्हर्सिटी ऑफ किंग्ज कॉलेज, हॅलिफॅक्स, नोव्हा स्कोशिया, कॅनडाची ‘ऑनररी डॉक्टर ऑफ सिव्हल लॉ’ ही पदवी 2014
☐ कैलाश सत्यार्थीसमवेत नोबेल शांतता पुरस्कार 10 डिसेंबर 2014

❖ ❖ ❖

# संदर्भ साहित्य –

☐ मलालाची डायरी – Diary of pakistani schoolgiri, BBC blog
☐ मलालाचे नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतरचे भाषण - nobleprize.org (Official website of Nobelprize)
☐ मलालाला मिळालेल्या विविध पुरस्कारांची माहिती – Wikipedia, Malala Yousafzai
☐ संयुक्त राष्ट्रसंघाचा मलाला दिन विषयक मचकूर – Wikipedia BBC News
☐ मलाला व इतर व्यक्तींची छायाचित्रे – www.google.com व nobelprize.org
☐ विविध वृत्तपत्रे व मासिकांमधील लेखांचा संदर्भ -
दैनिक लोकसत्ता, दै. लोकमत, दै. दिव्य मराठी, दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. पुण्यनगरी, दै. सकाळ, The Times of India ही वृत्तपत्रे व काही मासिके. India Today
☐ www.malala.org, Malala fund, Malala for the Nobel Prize Maalala Prizewikipedia. Malala : सर्व संदर्भ
☐I am Malala : मलालाचे किस्तिना लॅम्बसोबतची आत्मकथा.
☐ www.wikipedia : हिंदी

❖ ❖ ❖